
बाबूराव अनंतराव कदम
तांडव
एका सैनिकाचे
आत्मकथन
शब्दांकनः यशवंत बाबुराव कदम

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

## एका सैनिकाचे आत्मकथन

# तांडव

कै. बाबूराव अनंतराव कदम

शब्दांकन- ॲड. यशवंत कदम

# तांडव

## कै. बाबूराव अनंतराव कदम

## शब्दांकन- ॲड. यशवंत कदम

टेरव, चिपळूण

फोन नंबर : 9892046868

ई. मेल : suhasssane@yahoo.com

मुखपृष्ठ- विनायक जाधव

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक:

# ई साहित्य प्रतिष्ठान

ईलेवन्थ फ़्लोअर,
ईटर्निटी,
ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

या पुस्तकाचे ई प्रकाशन करण्याची प्रवानगी दिल्याबद्दल आम्ही कोमल प्रकाशन, नालासोपारा यांचे आभारी आहोत.

## प्रकाशन : १० मार्च २०२५

©esahity Pratishthan®2025

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# शब्दांकनकर्ता परिचय

**यशवंत बाबुराव कदम**

बी.ए., एलएल.बी. ॲडव्होकेट-हायकोर्ट, मुंबई

जन्मतारीख - १४ ऑगस्ट १९४८

प्राथमिक शिक्षण : मु. पो. टेरव, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी

माध्यमिक शिक्षण- : मु. पो. पेढांबे (आजोळ)

महाविद्यालयीन शिक्षण:: ज्ञानेश्वर विद्यालय, वडाळा, मुंबई

रुईया महाविद्यालय, मुंबई न्यू लॉ कॉलेज, माटुंगा, मुंबई.

नोकरी व्यवसाय- : आयकर खाते (मुंबई) येथून अधिकारी म्हणून निवृत्त सध्या - मुंबई उच्च न्यायालयात वकिली खालील साहित्य संस्थांशी स्थापनेपासून सहभाग काव्यमंच, मुंबई कोकण मराठी साहित्य परिषद.

मराठी, हिंदी व इंग्रजी काव्यलेखन

प्रकाशित साहित्य

१. सद्गुरू दत्तात्रय शिंदे महाराजांचे जीवन परिचय १९७५

२. फुलोरा प्रातिनिधिक काव्यसंग्रह २००८

३. घे भरारी (प्रातिनिधिक काव्यसंग्रह) २०११

४. जीवनगाणे (काव्यसंग्रह) ५-६-२०१०

५. अंतरंग (काव्यसंग्रह) २८-२-२०११

६. भक्तिरंग (काव्यसंग्रह) २०१२

७. बोलविता धनी वेगळाची (काव्यसंग्रह) ११-१-२०१३

८. तांडव (चरित्र) ११-१-२०१३

# मनोगत



कै. बाबूराव अनंतराव कदम
(स्वित्झरलॅंडमध्ये असताना घेतलेला फोटो)

हे असे काही लिखाण घडेल याची सुतराम शक्यता नव्हती. मी तर अनाडी, अक्षरवैरी असा एक रांगडा सैनिक. अशा रांगड्या, सैनिकाचे ज्याने पुरे जीवन 'संघर्षमय परिस्थितीत' व्यतीत केले. त्याने जीवनाबद्दल, घडलेल्या घटनांबद्दल काही लिहावे हा विचारच मनात येण्यासारखा नव्हता. हे सारे घडले त्याला खरेतर अलौकिक असेच म्हणायला हवे. माझी नजर अधु झाली होती. गेली पाच वर्षे मी चाचपडत अशाच अवस्थेत वयाच्या पंच्याहत्तरीकडे चाललो होतो. त्यात माझ्या पत्नीच्या निधनामुळे निर्माण झालेली प्रचंड पोकळी. असे दिवसांमागून दिवस जात होते. गेले वर्षभर मी स्वतःला सावरण्याचा प्रयत्न करीत होतो. माझ्या जीवनाची, माझ्या मनाची सारी उभारीच संपून गेली होती. जगायचे कशासाठी? कोणासाठी? यातून मृत्युच समोर सतत दिसायचा. अगदी दिवास्वप्नासारखा.

पण माझ्या मुलाच्या, यशवंतच्या अट्टाहासातून त्यांने जबरदस्तीने माझे डोळ्याचे ऑपरेशन बॉम्बे हॉस्पिटलमध्ये करुन घेतले. इंप्लांटेशन केले. त्यातून

मला नवी दृष्टी प्राप्त झाली. गावात आल्यावर प्रथमच मी धोकट्याचा डोंगर पहात होतो. खूप आनंद झाला. गाडीतून उतरून माझ्या मायभूमीचे चुंबन घेतले. काहीतरी हरवलेले गवसले आहे असा भास झाला. घरी मी आता स्वतंत्रपणे वावरू शकत होतो.

मला गुंतविण्यासाठी माझ्या मुलाने मला माझ्या जीवनात घडलेल्या अनेक कडू-गोड घटनांबद्दल प्रकर्षाने व कुतुहलाने विचारले व बोलते केले. दुसऱ्या महायुद्धाबद्दलच्या घटनांबद्दल मी लिहावे असे तो मला सतत सांगू लागला. मला एक वही आणून दिली. आणि लिहायला बसलो. खरोखरच मला सूर सापडला. असंख्य घटना स्मृतिचित्राच्या रूपात चित्रपटासारख्या माझ्या डोळयासमोर सरकू लागल्या. प्रचंड उत्साह वाटला व मी लिहू लागलो. यशवंत दर पंधरा दिवसानी गावाला यायचा, माझ्या लिखाणाची आत्मियतेने विचारपूस करायचा. त्यातून हा लेखन प्रपंच घडला. त्याच्याबरोबर अनेक प्रसंगाबद्दल, घटनाबद्दल खूप चर्चा झाली. त्याने विचारलेल्या अनेक प्रश्नांना मी माझ्या लिखाणातून उत्तरे देत गेलो. नंतर माझे लिहिणे जवळ जवळ थांबले होते. हात चालेनात. मी हे सारे लिहिलेले वाचून त्यांने त्याला साहित्यिक भाषा देण्याचा प्रयत्न केला. जे जे सारे लिहिले, सांगितले ते सारे सत्य आहे. त्याच्या परिश्रमातून माझ्या स्मृतिंना हे अक्षररूप दिले यातून ही कलाकृती उभी राहिली.

ही माझी कलाकृती मला जीवनभर साथ देण्याऱ्या माझी दिवंगत पत्नी कै. लक्ष्मीबाई हिस अर्पण करीत आहे.

**कै. बाबूराव अनंतराव कदम**



मला जीवनभर साथ देणारी माझी दिवंगत पत्नी

**कै. लक्ष्मीबाई** हिला

# अर्पण....

# लेखाजोखा जीवनाचा

हे सारे लिहावयाचे मनात आले, आणि मनात अनेक प्रश्न उभे राहि कसे लिहावयाचे? काय लिहावयाचे? कशासाठी आणि कोणासाठी लिहावयाचे? आणि या सगळ्याचा उपयोग तरी काय? पण हे सर्व प्रश्न बाजूला ठेवून, बरीच वर्षे मनात दाबलेली असंख्य घटनाची उबळ एकदाच काढून मोकळे व्हावे यासाठी हा प्रपंच आहे.

जन्माला येणे हे खर तरं परमेश्वराचे देणे आहे आणि त्याबरोबर जे लाभले ते सारे प्रारब्धाप्रमाणे लाभले, माझ्या पूर्व संचिताप्रमाणे ते सारे मला लाभले, ज्या आईवडिलांच्या पोटी मी जन्म घेतला, ज्या घराण्याचे कवच मला लाभले, तेथील सारे सगे-सोयरे, माझे नातेवाईक, भावंडे आणि त्यांच्या प्रेमाची घट्ट वीण आणि माझ्या वाट्याला आलेली गरीबी तसेच माझ्या घराण्यांच्या पूर्व इतिहासाची श्रीमंती हे सारे मला लाभले ते माझ्य प्रारब्धाप्रमाणे. मी जन्मापासून ज्या वातावरणात वाढलो, माझ्या भावडांत बागडलो, आई-वडिलांची मायेची घट्ट गोधडी पांघरून लहानाचा मोठं झालो. पुढे नोकरी-प्रपंच त्याचे चटके आणि गरीबीतून पुढे जात असताना त्या तांडवाला सामोरे जाण्याच्या अनुभवातून जे जे काही शिकलो, दुसऱ्या महायुद्धातील भयावह अग्निवर्षावाला सामोरा गेलो, त्याच बरोबर लाभलेला अनेक वर्षाचा तुरुंगवास व त्यातले भयावह जगणे, या साऱ्याला धीराने तोंड दिले, आणि पुढे त्यातून वाचून सहिसलामत परत आल्यावर इथल्या ब्रिटीश सरकारचे विक्षिप्त वागणे त्यात झालेला मनस्ताप

आणि त्यानंतरचे पोलिस खात्यातील नोकरी, निवृत्ती व त्यानंतरचा वार्धक्याचा भयावह ताप, काही समाधानाचे, आनंदाचे क्षण, गोड, आबंट घटना या साऱ्या सोबत परमेश्वराने माझ्यावर केलेली अनंत कृपा त्याची शेवटच्या श्वासापर्यंत लाभलेली मायेची साथ हे सारे अनुभवत असताना हे जीवनाचे तारू अनेक वादळांना सामोरे गेले आणि हे सारे तांडव शब्दात मांडणे कठीण. पण धोपटपणे जसे जमेल तसे लिहित गेलो. वेळ फार कमी होता. बुद्धीला खूप ताण देऊन हे सारे आठवण्याचा प्रयत्न करीत जे जसे जमले तसतसे लिहित गेलो, सांगत गेलो. भवताली मृत्युचे तांडव चालू होते आणि अशा अवस्थेत वरील सर्व प्रश्नांना बाजूला सारून आयुष्याचा लेखाजोखा मांडण्याचा प्रयत्न जमेल तेवढा स्वतः व मुलांच्या मदतीने करण्याचे ठरवले व हे अक्षरब्रह्म साकारले या पुस्तकाच्या रूपात....

# मागोवा इतिहासाचा

सह्याद्री पर्वताच्या कुशीत वसलेले माझे गाव 'टेरव', एक मराठमोळी अत्यंत सुसंस्कृत श्रीमंतीची परंपरा लाभलेल्या, संस्कृतीची घट्ट वीण जपणाऱ्या माझ्या मराठमोळ्या 'टेरव' गावचा समाज आणि त्या बरोबर गावातील मराठा, कुणबी, सोनार, सुतार, कुंभार, तेली व बौद्ध या साऱ्या समाजाला बरोबर घेऊन बंधुत्वाची व सलोख्याची परंपरा हे गाव जपत आले आहे. हा एक आश्चर्याचा भाग म्हणायला हवा. सर्व समाजात दिसणारे एकोपा, प्रेम, माया, शेजारधर्म या साऱ्याची जोड बालपणात लाभली. त्यात खूप बागडलो. मित्रमंडळी, भावंडे, बहिणी सोबतीला आजी-आजोबा व कुटुंबातील सर्व माणसे याचा खूप मोठा गोतावळा मला अनुभवायला मिळाला आणि मी घडत गेलो.

माझ्या पूर्वजांपासून या गावातील माझी तेरावी पिढी. माझ्या घराण्याचे पहिले पूर्वज जे ह्या टेरव गावात आले ते साधरणतः इ.स. १५१० ते १२ या दरम्यान. त्यांचे नाव दुर्गोजीराव कदम, एक लढवय्या शूर सरदार. त्यांनी पहिली वस्ती केली ती चिंचघरी या गावात. आजही त्या गावात त्यांच्या घराचे अवशेष आहेत. हे त्यांना लाभलेल्या आठ गावांच्या इमानी जहागिरीचे गाव. पण हे तसे सुरक्षित नव्हते. म्हणून त्यांनी आपला कुटुंब कबिला व सैनिक तिथूनच वर टेकडीवर असलेल्या 'टेरव' गावच्या सपाट प्रदेशात स्थलांतर केले. हे गाव साधारणतः १५०० फूट उंचावर असून चारीही बाजूंनी निबिड, अरण्य व अवघड चढ, अशा निसर्गाचे संरक्षित कवच लाभलेला हा गाव त्यांनी आपल्या

कायम वसाहतीसाठी निवडला. मुसलमान राजवटीचा सतत असणारा शत्रुचा ससेमिरा, त्यापासून आपले कुटुंब, सैन्य व आपली प्रजा यांच्या संरक्षणासाठी हे नैसर्गिक कवच लाभलेले गाव निवडले. दक्षिणेला धोकट्याचा उंच सुळका, उत्तरेला चिपळूणचा दऱ्यांनी वेढलेला भाग, पूर्वेला चिंचघरी अडरेगाव व पश्चिमेला कामथ्याचा डोंगर अशा या संरक्षित भिंतींमध्ये सुरक्षित असा टेरव गाव त्यांनी का निवडला याचे उत्तर त्याच्या निसर्गाच्या श्रीमंतीत दिसून येते. येथे येऊन त्यांनी आपला गाव बसवला, शेतीवाडीसाठी जागा सपाटीकरण करून भातशेती, नाचणी, वरी, कांग इत्यादी बहुमोल धान्यांची उपज येथे केली. या साऱ्या शेतीसाठी त्यांनी बारा बलुतेदार गावात वसवले. त्यात कुणबी, कुंभार, सुतार, सोनार, बौद्ध इत्यादींचा समावेश केला व आपल्या सरंजामीचा उपभोग घेऊ लागले.

आमचे पूर्वज सरदार दुर्गोजीराव कदम हे शहाण्णव कुळी कुलवंत मराठा शूर वंशापैकी होते. विजापूरच्या आदिलशाही तक्ताचे ते एक मातब्बर शूर सरदार होते. आमचे मुळ हे तुळजा भवानी मंदिराच्या परिसरातील तुळाजापूरचे कदम घराण्याचे. भवानी देवी ही आमची कुलस्वामीनी. आजही तुळजापूरच्या भवानी मंदिराचे मुख्य पुजारी कदम घराण्यापैकीच आहेत. त्यांचा भवानी मंदिराचा पूजेचा पिढीजात पहिला मान आहे.

या टेरव गावात जेव्हा आमचे पूर्वज आले, तेव्हा त्यांनी येताना आपली कुलस्वामीनी भवानी या गावात आणली आणि तिची प्रतिष्ठापना ग्रामदेवता

वाघजाई देवीसह, भैरी, केदार, काळकाईमाता व कोल्हापूरची महालक्ष्मी माता या देवतांसह केली. सुरुवातीला या ठिकाणी दोन मंदिरे बांधली. एका मंदिरात कुलस्वामीनी भवानी व दुसऱ्या मंदिरात वाघजाई माता अशी दोन मंदिरे आहेत. त्यांच्या पूजेची व्यवस्था गावातील गुरव समाजाकडे दिली आणि त्यांच्यामार्फत आपले सर्व कुळाचार व परंपरेने देवीचे सगळे उत्सव आपल्या अधिपत्याखाली सगळ्या समाजाला बरोबर घेऊन पार पाडत होते. ही परंपरा आजही चालू आहे. त्यात मराठा समाजाचा प्रथम मान आहे. कोणताही विधी करण्यापूर्वी मराठा समाजाची परवानगी घेतली जाते व मराठा समाजातील पहिल्या व दुसऱ्या मानकऱ्यांच्या हस्ते प्रथम पूजा करून सर्व कार्यक्रमाची सुरुवात होते त्यांना 'कारका' असे म्हणतात. आजही ही परंपरा चालू आहे.

आदिलशाहीच्या पदरी असलेले शिंदे व कदम सरदार अत्यंत शूर आणि लढवय्ये होते. अनेक लढाया त्यांनी मारल्या होत्या. अनेक मोहिमा यशस्वी केल्या होत्या, अशा या शिंदे, कदम सरदारांना आदिलशाहीत मानमरातब होता. कोकणातील बारराव कोळी यांचा पुंडावा फार वाढला होता, त्या दुर्गम परिसरावर आणि मोक्याच्या प्रदेशावर आपले अधिराज्य असावे अशी आदिलशाहाची इच्छा होती. तो प्रदेश अत्यंत सुरक्षित असा असून व्यापार उदिमासाठी अत्यंत उपयुक्त असा हा प्रदेश होता. पेढांबे गावातील बारवई या किल्ल्यावर बारराव कोळयांची राजधानी होती. ही जागा उंच डोंगरावर असून तेथून संपूर्ण परिसरावर नजर ठेवता येत असे. कोकणात आपले राज्य वाढावे अशी आदिलशहाची इच्छा होती. त्यांनी अनेक सरदार पाठवून या बारराव

कोळयांचा पाडाव करण्याचा प्रयत्न अनेक वेळा केला पण यश आले नाही. हे आदिलशहाचे दुःख त्यांनी दरबारात बोलून दाखविले व त्यांचा पाडाव करण्याचा विडा शिंदे, कदम सरदारांनी उचलला. कदम हे शिंदे सरदारांचे जावई, अशा या सासरे-जावयांनी आपल्या सैन्यासह बारराव कोळयांचा बंदोबस्त करण्यासाठी मोहीम आखली. या धाडशी निर्णयाचे बादशाहने स्वागत केले व सर्वतोपरी मदत देण्याचे कबूल केले. ही लढाई जिंकण्यासाठी मोठा मुत्सद्दीपणा दाखविला. गनिमीकाव्याने बारराव कोळयाचा निःपात केला व चिपळूण विभागावर आपले अधिराज्य प्रस्थापित केले.

या पराक्रमाबद्दल खूश होऊन आदिलशहाने या कदम, शिंदे सरदारांना अठ्ठावीस गावांची जाहागिरी वतन म्हणून दिली. त्यापैकी वीस गावे शिंदे व आठ गावे कदम यांना मोकासा म्हणून देण्याचे फरमान आदिलशहाने दिले. यानंतरच्या शिवाजी महाराजांच्या काळात व त्यांच्या पश्चातही ही जहागिरी चालू होती. सन १७५१ साली ताराराणी भोसले यांनी सनदाची आज्ञापत्रे देऊन ते कायम केले. त्यानंतरचे आज्ञापत्र ३१-१-१७५५ सालचे असून त्यानुसार कदम, शिंदे सरदारांची सेवा शिवाजी महाराजांच्या वारसाच्या नधिपत्याखाली चालू होती. यानुसार मौजे टेरव, मौजे अडरे, मौजे अनारी, मौजे कापसाळ, मौजे धामणवने, मौजे भेले, मौजे मुंडे व मजरे मांडवखरी ही वे म्हणजे वाशिष्ठी नदीच्या पश्चिमेचा भाग कदम सरदारांना जहागिरी हणून दिला व पूर्वेकडचा भाग शिंदे सरदाराना जहागिरी म्हणून दिला त्याला सपटी विभाग असे आज म्हटले जाते.

आपला टेरव गाव वसवण्यापूर्वी शिंदे, कदम यांनी मजरे, दादर येथे श्री मवरदायिनी देवीची स्थापना केली. आजही कदमांना तेथे मानाचे स्थान हे. साधाणरतः ८०-९० वर्षापूर्वी चैत्रपौर्णिमेच्या यात्रेमध्ये काही मानापमानावरून मतभेद झाले. रामवरदायिनी मंदिरामध्ये टेरवच्या कदमांची बसण्याची एक मानाची ठराविक जागा होती. त्यावर्षी आमचे पूर्वज काही परिहार्य कारणामुळे मंदिरात उशीरा पोहचले. त्यावेळी त्या जागेवर क्टोलकर शिंदे बसले होते. ते उठायला तयार नव्हते. या अपमानातून बामच्या पूर्वजांनी असा निर्णय घेतला की आपण आपल्या टेरव गावी पाऊन चैत्र पौर्णिमा आपल्या भवानी देवी मंदिरात जाऊन साजरी करावी वाणि त्याप्रमाणे त्यांनी ती सुरू केली. ती परंपरेने चैत्र पौर्णिमा आजही चालू नाहे. असा हा इतिहासाचा थोडासा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## माझे टेरव गाव

असा हे माझे टेरव गाव चिपळूण तालुक्यातील शूर सैनिकांचा वारसा जपणारा आहे. हे एक सुंदर निसर्गरम्य, हवेशीर ठिकाण आहे. कुलस्वामीनी भवानी मातेच्या पदस्पर्शाने अशा या पावन भूमीत शहाण्णव कुळी मराठा समाजाबरोबर अठरा पगड बलुतेदार प्रेमाने, सलोख्याने व एकोप्याने गेली साडेचारशे वर्ष गुण्यागोविंदाने नांदत आहेत.

आमचे पूर्वज दुर्गोजीराव यांना दोन मुलगे पैकी, यशवंतराव हे टेरव येथे स्थायिक झाले व बाळाजीराव यांनी अडरे मुक्कामी जाऊन आपला गाव वसवला. गेली साडेचारशे वर्ष या गावात कदम घराण्याचे वासरदार गुण्यागोविंदाने नांदत आहेत. प्रथम आमचे पूर्वज आले ते चिंचघरी या गावात स्थायिक झाले. त्या गावात त्यांच्या घरांचे घरटे अजूनही आहे. त्या नंतर, तेथून ते टेरव येथे येऊन स्थायिक झाले. चिंचघरीतून आल्यावर टेरव गावातील तळेवाडी येथील देवरहाटीत राहवयास आले. आजही त्या ठिकाणी त्यांच्या घरांचे घरटे आहेत. त्या ठिकाणी त्यांनी वापरलेली दगडी घंगाळे, जाती, व्हायन, पाटे-वरंवटे आढळतात.

या गावाच्या दोन तक्षीमा. पहिल्या तक्षीमेत तळेवाडी, घाणेवाटले (आताची राधाकृष्णवाडी), तांबड तक्षीम (आताची लिंगेश्वरवाडी) आणि भिसेवाडी (आताची दत्तवाडी) हा विभाग आला तसेच दुसऱ्या तक्षीमेत उर्वरित निम्मेगाव आले.

पूर्वीच्या केलेल्या व्यवस्थेप्रमाणे या प्रत्येक वाडीला शेतीच्या कामासाठी व इतर कामासाठी कुणब्याच्या वाड्यांची ठरवलेली व्यवस्था होती. आजही आहे. पण बदलत्या काळानुसार थोडाफार बदल झालेला दिसतो आहे. पण तरीही आजही गावात एकोपा आहे, अत्यंत प्रेमाचे असे संबंध या समाजबांधवांसोबत आहेत. भवानी मातेच्या मंदिरात संपूर्ण मराठा समाजाची बसण्याची व्यवस्था आहे. पूर्वीचा महार समाज (आताचा बौद्ध समाज) त्यावेळी राखणदाराचे व निरोप्याचे काम करीत असे. त्याकाळी अस्पृश्यता पाळली जायची. पण आज परिस्थिती बदलली आहे. शिवाशिव संपली आहे. आमच्या भवानी मातेच्या देवळातला एक भाग पूर्वपार त्या समाजासाठी राखून ठेवलेला होता. त्यांना चांगला मान होता. सरदाराचा अधिक विश्वास या समाजावर होता हे यातून दिसून येते. लष्करातही महार रेजिमेट विश्वासार्ह होती. भवानी देवीच्या समोरच असलेल्या वाघजाई -

काळकाई मंदिरामध्ये इतर सर्व समाजाची बसण्याची व्यवस्था आहे. सारे निर्णय भवानी मंदिरातच होत व नंतर गावांला विदित केले जात.

पूर्वी आमच्या पूर्वजांनी या देवळांच्या पूजेचे काम गुरव समाजास दिले होते. पण काही अनुचित घटनांमुळे साधारणता ६०/७० वर्षा पूर्वी हे पूजेचे काम पूर्णपणे कुंभार समाजाकडे दिले व आजही ते चालू आहे.

या माझ्या टेरव गावात मराठा समाज जवळजवळ ४५ टक्के आहे व इतर सर्व समाज मिळून ५५ टक्के आहे. त्यामध्ये कुंभार, कुणबी, सुतार, बौद्ध, मुसलमान इत्यादी समावेश होतो. गावात जवळ जवळ चारशे उंबरा आहे. बहुतेक घरात एकत्र कुटुंबपद्धती होती. कुटुंबातील सर्व लोक मिळून शेती करत

असत व त्यावरच त्यांची गुजराण होत असे. नोकरी धंद्यासाठी फारच कमी लोक शहरात जात. जास्तीत जास्त लोक मिलिटरी, पोलीस व इतर सरकारी खात्यातचनोकरी करताना दिसत. मिलमध्येही काही लोक काम करीत असत, पण हे फार कमी प्रमाणात. बहुतांश लोक शेती व्यवसाय व मोलमजुरी करूनच आपले पोट भरत.

गावातले बहुतेक तंटे हे सामंजस्याने व गावच्या पंचायतीच्या माध्यमातून सोडवले जात. फारच कमी कज्ने कोर्टात जात असत. त्यावेळी ब्रिटीशांचे राज्य होते. लोकांना कायद्याचा वचक होता. त्यावेळच्या फौजदारांचा गावात दरारा होता, चोरी मारी होत नसे. त्यामध्ये कै. मुरारराव कदम व श्री. धोंडजीराव कदम, या त्या काळातील फौजादाराचा उल्लेख करायला हवा.

गावात पायाभूत सुविधा पूर्वी काहीच नव्हत्या. बाजारहाटासाठी चिपळूण ही एकमेव बाजारपेठ होती. लोक पायवाटेने टेरवातून खेडीं आणि पागेच्या वाटेने चिपळूणात जात असत. वाडीवाडीवर जायला छोट्या पायवाटा होत्या. १९६८ साली गावात वीज आली. गावात पाण्याची व्यवस्था फार अपुरी होती. विहिरी हे एकमेव पाणी पुरवठ्याचे साधन होते. गावासाठी पाणी योजना १९७१ साली सुरू झाली पण ती अपुरी असल्याने नंतर अनारी धरणाचे पाणी, भास्कर जाधव आमदार असताना कार्यान्वीत झाले. आमच्या तळेवाडीत मात्र मुबलक पाणी असे आणि आजही आहे. १९८१ साली कामथे-टेरव-दत्तवाडी हा रस्ता झाला व गावात एसटी सुरू झाले. १९८४ ला दत्तवाडी येथपर्यंत ती जाऊ लागली.

बहुतेक कुणबी समाज हा शेती करून मजुरीवरच गुजराण करायचा. त्यामुळे शेतीला मुबलक मनुष्यबळ उपलब्ध होत असे. अत्यंत गरिबी होती. मजुरी ही तुटपुंजी होती. पण त्यातही लोक समाधानी होते.

आमच्या बहुतेक जमिनी भिसेवाडी म्हणजे आताची दत्तवाडी व थोड्याफार गावात होत्या. भिसेवाडीत जाताना खूप चालावे लागे. गुरांना चरण्यासाठी जंगल त्या ठिकाणीच होते. प्रत्येक घरात त्याकाळी गाई, बैल, म्हैस इत्यादी जनावरे असत. दुध-दुभते मुबलक होते. आमच्याकडे मालण नावाची एक गाय होती. तिने बरीच वर्षे आमच्या कुटुंबाला साथ दिली.

गावामध्ये बलुतेदार पद्धत चालू होती. पैशाचा व्यवहार फारच कमी होता. बहुतेक शेतकरी लोक सुतारांना, कुंभारांना वार्षिक धान्य देत असत. त्या बदल्यात त्यांच्याकडून नांगर दुरुस्तीची सगळी कामे सुतार करीत. देवळात काम करणारे कुंभारही वर्षाला दोन पायली ह्या हिशेबांनी घरपट भात जमा करीत असत. ही पद्धत आजही चालू आहे.

पूर्वीपासून आमच्या गावातील कुलस्वामिनी भवानी वाघजाई देवीची पालखी होळीच्या दिवशी संध्याकाळी छबिन्यासाठी जात असे. ती एका ठराविक मार्गाने पुन्हा देवळात येत असे. माझ्या ऐकीव माहितीत असे समजले की आमच्या आजीने मुलगा व्हावा यासाठी एक 'शरण' आमच्या वाडीत पुरून ठेवले होते. त्याकाळी आमच्या तळेवाडीत होळीच्या दिवशी छबिन्याची पालखी येत नसे. पण हे शरण काढण्यासाठी पालखी तळेवाडीत आली. आणि तेव्हापासून ती तळेवाडीत यायला सुरू झाली. त्यानंतर माझे वडील सद्गुरू अनंतराव महाराज यांचा जन्म झाला.

होळीनंतर गावच्या देवीची पालखी पहिल्या पाच दिवसामध्ये मराठ्याची घरे घेऊन रंगपंचमीनंतर इतर समाजाची घरे घेते. प्रथम पालखी पहिल्या मानकऱ्याकडे, जो मान आमच्या घराण्याकडे आहे, सखारामराव कदम यांच्या घरात येते व नंतर ती पालखी निम्मेगावातील दुसऱ्या मानकऱ्याकडे जाते व त्यादिवशी त्या वाडीतील घरे पूर्ण करून दुसऱ्या दिवसापासून फेरपाळी पद्धतीने राधाकृष्ण वाडी, तांबड तक्षीम तळेवाडी तसेच दत्तवाडी याप्रमाणे घरे घेते. घरोघर देवीच्या ओट्या भरल्या जातात.

देवीला आरज लावला जातो. त्याला गाऱ्हाणे असे म्हणतात. अशा तऱ्हेने परंपरेने घालून दिलेल्या चाकोरीतूनच गावचा सगळा व्यवहार होत आहे. मराठ्यांची घरे घेतल्यानंतर म्हणजे पंचमीचे शिपणे केल्यानंतर पालखी रयतेची सर्व घरे घेत आहे. ही परंपरा आजही चालू आहे. गुढीपाडव्यापूर्वी ही घरे घेण्याचे पूर्ण होत असे.

## त्या काळातील सामाजिक परिस्थिती

माझा 'टेरव' गाव हा एक निसर्गरम्य, शेतीप्रधान गाव आहे. बहुसंख्य शेतकरी स्वतः शेती करून आपल्या उदर निर्वाहासाठी लागणारे धान्य मुख्यतः भात शेती पिकवितात. पण सगळयांकडेच जमीन कमी असल्यामुळे शेती व्यतिरिक्त रोजगाराशिवाय पर्याय नव्हता. त्याकाळी मजुरीही नगण्य असे. बहुतेक काम करणारे कुणबी समाजातील लोक दोन वेळ जेऊन मजुरीवर काम करीत असत. शहरात म्हणजे पुणे-मुंबईकडे नोकरीसाठी जाणारे हाताच्या बोटावर मोजण्या इतकेच होते.

सुतार हे भाताच्या स्वरूपातच आपली मजुरी घेत असत. वर्षाकाठी त्यांची मजुरी (बलुती) ते घेऊन जात असत. त्या बदल्यात वर्षभर त्या शेतकऱ्यांसाठी लागणाऱ्या अवजारांची दुरुस्ती ते करून देत असत. आजही ही परंपरा काही प्रमाणात चालू आहे. आज मुळात शेती करणारे शेतकरीच कमी होत आहेत. बरीचशी शेती ओसाडच आहे. हा गाव शेतीप्रधान असून मनुष्यबळाची गरज त्यांच्या एकत्रित कुटुंब पद्धतीतून पूर्ण होते.

त्याकाळी गावात रस्तेही नव्हतेच. वाडी-वाडींना जोडणाऱ्या वाटा होत्या. पाण्याचीही व्यवस्था चांगली नव्हती. विहिरी हाच एक पाणी मिळवण्याचा मार्ग होता.

बहुतेक लोक गरीब. त्यांची घरेही केंबळारी होती. क्वचित कौलारू घरे होती. गावात गौर-गणपती, होळी, दसऱ्याला खूप मजा येई. होळीच्या ठिकाणी आम्ही हुतूतू, आट्यापाट्या हे खेळ खेळत असू. खूप मजा येई.

गुढी पाडव्याच्या दिवशी घरा-घरासमोर गुढ्या उभारल्या जात. घरात गोडधोड होई. त्याच चैत्र महिन्यात चैत्र पौर्णिमेला देवीची यात्रा होत असते. त्या दिवशी चिंचघरी आणि कामथे या गावातील पालख्या आमच्या देवीच्या भेटीला येतात. तो पालख्या भेटण्याचा सोहळा अवर्णनीय असतो. तो प्रसंग पाहून मन भरून येते व डोळयात पाणी उभे राहते. आम्ही मुले त्या जत्रेत खूप हुंदडत असू. त्या दिवशी देवीच्या वस्त्रांचा लिलाव केला जाई.

गणपतीच्या काळामध्ये माझ्या लहानपणी आम्ही मुले भिंतीवर सुंदर कुड रंगवत असू. खूप चांगली चित्रे मी काढीत असे. त्यासाठी हळद, पिंजर, कोळसा इत्यादीचे रंग वापरले जात. सूर्य, चंद्र यांची चित्रे आम्ही काढत असू. कोणी कोणी शंकरपार्वती, गणपती यांचीही चित्रे काढत असत.

आमच्या गावात मानाच्या परशुरामाच्या मंदिराच्या संस्थानातून छोटे छोटे गणपती येत. त्यांचीच पूजा होई आणि हे सर्व गणपती कुंभार घराघरात देत असत. आता ही प्रथा बंद झाली. लोक बाजारातून किंवा गावात गणपती बनवणाऱ्या कारागिरांकडून गणपतीच्या मुर्ती आणतात. त्याच छान सुबक असतात. आता घराघरात सर्व मुंबईकर मंडळी गणपतीला येतात. वाडीही अगदी गजबजलेली असते.

त्या काळात न्यायनिवाड्याचे बहुतेक कामे गावातच गाव पंचायतीत केली जात. गावच्या गावसयांमध्ये ते तंटे सामंजस्याने मिटविले जात. न्याय निवडामध्ये मराठा समाजातील मातब्बर मंडळी भाग घेत. त्याकाळी कै. मुरारराव कदम आणि श्री. धोंडजीराव सखारामराव कदम हे मातब्बर पोलीस पाटील होऊन गेले. त्यांचा खूप मोठा दरारा होता.

आमच्या देवळाच्या पुजेसाठी नेमलेल्या कुंभारांना घरपट प्रत्येक वर्षाला एक पायली भात दिले जात असे कालांतराने एका पायलीचे दोन पायली करण्यात आले किंवा रुपये तीस व तो ते भातकापणीनंतर घेऊन जात असे. ज्यांची शेती नसे ते लोक पैशाच्या स्वरूपात त्याची किंमत कुंभारांना देत असत. याचा निर्णय गावच्या गावसईमध्ये सर्वांनुमुखे घेतला जातो. ही बलुतेपद्धत आजही चालू आहे. या बदल्यात त्या कुंभारांना, ज्यांचा उल्लेख कामगार म्हणूनही केला जातो, त्यांनी वर्षभर गावच्या देवळातल्या देवांची पुजा करणे तसेच देवांच्या बारा कारकांचे काम करणे, देवळाच्या संदर्भात गावात दवंडी देणे किंवा व्यवस्थापन कमिटीला माहिती देणे. गावातील पालखीच्या भोवनीच्यावेळी ओट्यांचे हिशेब व देवीला आलेले पासोडे, दागिने यांची नोंद संबंधीत गावातील लोकांना देणे ही कामे करावी लागतात. दसऱ्याच्या १० दिवसामध्ये मानकऱ्यांच्या आणि ज्या ज्या घरी घट बसतात तेथे देवीचा दिवा फिरविणे हे कुंभारांचे काम होते. आजही ते चालू आहे.

माझ्या गावातील आमची कुलस्वामिनी भवानी माता, वाघजाई माता आणि इतर दैवते यांचे वर्षभराचे देवळातील १२ कारकांचे कार्यक्रम देवळात पार पाडतात. त्यापैकी गुढीपाडवा, चैत्रपौर्णिमा, होळी, तीन वर्षातून एकदा येणारा 'समा', दसऱ्याला लावली जाणारी रूपी व घटस्थापना त्यानंतर दसरा, दिवाळी व वार्षिक राखणा हे सर्व कार्यक्रम गावातील मराठा समाजाच्या आदेशानुसार व दोन मानकऱ्यांच्या हस्ते पूजा अर्चा करून पार पाडले जातात. ही परंपरा आजही सातत्याने चालू आहे.

गावात कुंभार समाज मोठा आहे. तो गावातील पाण्याचे काम करतो. पूर्वी तेली लोक तेलाचा घाणा लावत असत. आता ही प्रथा बंद झाली आहे. पूर्वी महार समाज गावाचे संरक्षणाचे काम बघत असे. पण त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतर ही सगळी कामे त्यांनी सोडून दिली. पण तरीही सील मजुरी करणे हे चालूच आहे. गावात एक सामंजस्याचे वातावरण आहे. एकसंघता आहे. हे प्रामुख्याने सांगावे लागेल,

गावातील मराठा समाज त्या मानाने सुशिक्षित, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व सांस्कृतिक श्रीमंतीचा आहे. आपल्या परंपरा जपत, सण साजरे करीत, इतर समाजांना बरोबर घेऊन आपले जीवन जगत आहेत, त्यांच्याकडे काम करणाऱ्या प्रामुख्याने कुणबी समाजाला अत्यंत सन्मानाने वागविले जाते. त्यामुळे गावात एकोप्याचे वातावरण आहे. गावातील नेतृत्वाचं काम प्रामुख्याने मराठा समाज आजच्या घडीला सांभाळत आहे. त्यात कै. शंकरराव कदम, श्री. प्रभाकरराव कदम यांनी सरपंच म्हणून उत्तम काम केले. मी मात्र या सगळ्यापासून वेगळा राहुन शाळेतील कामामध्येच प्रामुख्याने स्वतःला गुंतवून घेतले. कोणत्याही राजकारणात न उतरता आपण भले आपले काम भले या स्वतंत्रवृत्तीने मी जगत आहे. माझ्याकडे कामासाठी येणाऱ्या बौद्ध समाजाच्या लोकांना सन्मानाची वागणूक देत आलो आहे. परमेश्वराने निर्माण केलेला माणूस ही एक अत्यंत महत्त्वाची परमेश्वरीय घटना असून त्याकडे सर्वांनी मानवतावादी दृष्टीने पहावे असे मला वाटते. दुजाभाव, शिवाशीव अशा अत्यंत हिन विचारसरणीपासून म्हणजे अस्पृश्यतारहीत अशी समाजाची बांधणी करून नव्या दिशेने गेला पाहिजे, प्रगतीपथाकडे गेला पाहिजे असे मला वाटते.

# माझे बालपण

क्षत्रिय परंपरा असलेल्या शहाण्णव कुळी मराठा कुटुंबात १९१९ साली माझा जन्म झाला. आमचे टेरव गाव हे मराठा कदम घराण्याला मिळालेले वतन होते. साधारणतः साडेचारशे वर्षापूर्वी आमचे पूर्वज या गावी येवून स्थायिक झाले.

तळेवाडी येथील आमचे पूर्वीचे घर आमच्या आमराईमध्ये होते. त्या ठिकाणी माझे आजोबा-आजी, माझे वडिल अनंतराव व त्यांचे दोन बंधू नारायणराव व बाबाजीराव असे एकत्र कुटुंब राहत होते. माझ्या आजोबाच्या पश्चात त्या घराची दोन घरे झाले. माझ्या वडिलांनी आता जिथे घर आहे त्या जागेत घर बांधले. ते केंबळारी होते त्यावेळी आमच्या वाडीतील कौलारू घरे फक्त महादेवराव, बजाजीराव, केशवराव व गोपाळराव यांचीच होती, बाकी सर्व घरे केंबळारीच होती. त्या घरात माझ्या वडीलांनी आपला संसार थाटला.

माझी आई उंचीने फार लहान होती. साधारणतः पाच फुट होती. तिचे नाव धोंडी असे होते. पण माझे वडील हे मात्र साडेसहा फुट उंचीचे तगडे पुरूष होते. गोरेपान अंगयष्टीचे होते. माझी आई अत्यंत कष्टाळू, खूप काम करायची दिवसभर, शेतीच्या कामाव्यतिरिक्त ती आजूबाजूच्या घरामध्ये दळण-कांडणाचेही काम करायची आणि तेथून आणलेल्या कणकुटावर आमचा उदरनिर्वाह व्हायचा. घरची अत्यंत गरिबी त्यामुळे मिळेल ते खाऊन आम्ही दिवस काढत होतो. पण त्यातही कष्ट केल्याने आणि अशा कोंडामांड्याच्या खाण्याने माझी प्रकृतीमात्र धडधाकट होती. त्या उलट माझे बंधू नारायण उर्फ

भिकाजी यांची प्रकृती मात्र तोळामासाची होती. ते माझ्यापेक्षा आठ-नऊ वर्षाने मोठे होते. त्यांचे शिक्षण तिसरी-चौथीपर्यंत झाले होते. पण मध्येच शिक्षण सोडून मुंबईला आमचे मामा पोमेंडकर विचारे यांच्या घरी गेले. आमच्या मामीने त्यांना नोकरीसाठी मुंबईला बोलावून घेतले. नोकरी लावतो असे सांगून त्याला नोकरी न लावताच घरात धुणी- भांडी करण्याच्या कामास लावले. त्यांची खानावळ होती. त्यात त्याला दिवसभर राबावे लागे. त्यांचे खाण्याचे हाल होत होते हे नंतर मला मुंबईला आल्यावर समजले.

ते आमचे जुने केंबळारी घर अत्यंत लहान होते, दोन पडव्या, एक माजघर व एक ओटा. वडिलोपार्जित मिळकतीचा फारच थोडासा भाग माझ्या वडिलांच्या वाट्याला आला होता. त्या काळी आमचा नांगर नव्हता त्यामुळे आमचे शेत लावण्यासाठी माझ्या आईला व त्यानंतर माझ्या पत्नीला डाल्यामध्ये काम करावे लागायचे. त्यातून आमच्या शेतीची मशागत व्हायची, आमच्या शेतात पिकणारे धान्य देखील वर्षभर पुरणे कठीण होत असे. घरात गरीबी होती, आम्ही चार भावंडे त्यापैकी दोन बहिणी कृष्णी आणि नानी व माझ्या अगोदरचा भाऊ त्यांचे नाव नारायण उर्फ भिकाजी. घरात गरीबी इतकी होती की, माझ्या दोन बहिणींच्या अंगावर जुनेरी शिवाय कपडा मी पाहिला नाही. पण सुदैवाने त्या दोघींची लग्न झाली व त्या अन्नाला लागल्या. नानीला पेंढाबे मुक्कामी श्री. दुधाजीराव यांना दिली. ते गावचे पोलिस पाटील होते व कृष्णीला कादवड मुक्कामी माझ्या चुलतीच्या भावाला दिली. नानी सुखात होती पण कृष्णीचे मात्र फार हाल झाले. तिला सासरचा खूपच जाच व्हायचा. वेळेला अन्नही देत नसत. टेरवहून माझी चुलती माझ्या चुलत्याच्या पश्चात

कादवड मुक्कामी गेली आणि त्यामुळे कृष्णीचे हाल अधिक वाढले. ती कंटाळून टेरवला यायची, पण माझे आई- वडिल अगदी खाष्ट होते. एकदा तर ती आली असता तिला हाकलवून देण्यात आले, तिने देवरहाटीच्या जंगलात विषारी कंदमुळे खाल्ली व त्यात तिचा दुदैवी अंत झाला. मी त्यावेळी लहान होतो मला फारसे काही समजत नव्हते, असो.

घरच्या एकंदरीत गरिबीची परिसीमा इतकी होती ते सांगताना डोळ्यात पाणी येते. आम्ही मुलगे होतो. एक लंगोटी लावून गावभर भटकायचो, नवा कपडा काय असतो हे आम्ही कधी पाहिले नव्हते. लोकांनी सोडून टाकलेले लंगोट, कपडे आम्ही वापरत असू. घरात पैशाची आवक काही नव्हती. घरच्या शेतातील पिकलेल्या अन्नावरच आमची गुजराण होत असे, पुढ्यात पडेल ते खाणे त्या परिस्थितीत क्रमप्राप्त होते. पावसाळ्यात थरबरा, ढोकरू आणि अशा अनेक प्रकारच्या भाज्या शेताच्या बांधावर मिळत. त्या आम्ही आणत असू. पण उन्हाळ्यात मोठी पंचायत होई. पण तरीही जंगलात पिकलेले आंबे-फणस खाऊन आम्ही दिवस काढत असू. त्याकाळी हापुस आंबा हा प्रकार नव्हता. आमच्या वाडीमध्ये चारीबाजूला ऊंचच ऊंच अशी रायवळी आंब्याची झाडे होती. त्यांत काळांबी, कोनातला, बिटकी अशी मोठी झाडे होती. दुपारी आम्हा पोराटोरांची पिकलेले आंबे मिळविण्यासाठी गर्दी होत असे. आंबे इतके असत की कुणाला मिळाले नाही, असे होत नसे.

आमचे वडिल काही काळ मुंबईत नोकरीला गेल्याचे आम्ही ऐकून होतो. पण तेथे त्यांचा जम बसला नाही. परिणामी ते पुन्हा गावात आले. सगळे

बालपण गरीबीच्या झळीत होरपळून निघत होते. जेव्हा कधी नानी पेंढाब्यातून माहेरी येई ते दिवस आनंदाचे असत एवढेच.

अशा अवस्थेत मन विषण्ण होई. फार काही कळत नव्हते, पण वाढत्या वयानंतर या सगळ्या गोष्टीची जाणीव व्हायला लागली. ते आठवून आजही डोळ्यात पाणी येते. पण तरीही प्रतिकुल परिस्थितीशी झगडत आम्ही जगत होतो. माझा मोठा भाऊ भिकाजी माझ्यापेक्षा तसा मोठा होता. त्याला माझ्या मामीने मुंबईला बोलवून घेतले. खाणारे एक तोंड कमी झाले पण मुंबईला जाऊनही त्या बिचाऱ्याचे हाल काही कमी झाले नाहीत. मामीची खानावळ होती, खानावळीत कामही बरेच होते, त्यांच्या भांड्याकुंड्याचा ठिग पडायचा. भांडी साफ करणे, कपडे धुणे, लादी पुसणे इत्यादी सर्व घरकामे त्याला करावी लागत. सकाळी चार वाजल्यापासून रात्री बारापर्यंत त्या बिचाऱ्याला जमीनीला पाठ टेकवता येत नसे व सदा आजारी पडत असे. हे मला मी मुंबईला गेल्यावरच समजले. त्यावेळी मी चौदा वर्षाचा होतो. मावशीने मला बोलावून घेतले. ते का याचे उत्तर मला मुंबईला गेल्यावर कळले. मीही त्यातच रगडलो गेलो. त्यातून सुटका करण्यासाठी मी सतत धडपडत होतो पण मार्ग मिळत नव्हता. मी तसा लहान होतो. पण शरीराने धडधाकड होतो. सततच्या कामाने त्याही परिस्थितीत माझी अंगयष्टी सुदृढ होती. दादाची सगळी कामे मी करीत असे. त्याचा आजार वाढत गेला, माझे मन त्या ठिकाणी कामात लागेना. आमचे एक नातेवाईक पेढांब्याचे श्री. नारायणराव शिंदे हे गिरगावला राहत असत, त्यांच्याकडे आमचे जाणेयेणे होते. मी त्यांना माझी कैफियत सांगितली आणि आम्ही दोघेही बंधू नारायणरावांकडे राहायला गेलो. थोड्याच दिवसांनी गिरगावातील मौजच्या

छापखान्यात मला व दादाला काम मिळाले. आम्ही दोघेही बंधू तेथे काम करत होतो, पण माझ्या बंधूची प्रकृती खालावत गेली आणि त्यामुळे त्यांना गावाला घेऊन आलो. त्याला टी.बी. झाला होता व त्यातच त्याचा मृत्यु झाला. त्यानंतर मुंबईला जीवाभावाचे माझे कुणी उरले नाही. गावतही कामामध्ये मन रमेना आणि शेवटी मी पुन्हा मुंबईला जाण्याचा निर्णय घेतला.

## माझे गावातील शालेय शिक्षण

मला वयाच्या सातव्या वर्षी शाळेत घालण्यात आले. खरेतर आजच्यासारखी शाळाही नव्हतीच. निम्मेगावातील एका घरामध्ये किंवा ओटीवर शाळा भरत असे. पहिली ते चौथीची सगळी मुले एकत्र बसून अभ्यास करत आणि या सर्वांसाठी एकच शिक्षक असे. आमच्या शाळेत काऱ्हे गावातील एक शिक्षक श्री. गोविंद लक्ष्मण हळवे हे माझे शिक्षक होते. त्यावेळी मी तिसरीत होतो. त्यांचा शिकवण्यात कोणी हात धरू शकत नव्हता. अत्यंत प्रेमळ स्वभाव त्यामुळे त्यांची मुलांशी गट्टी जमे व मुले आणि शिक्षक एकरूप होऊन अभ्यास करीत असत. ते सर्व मुलांचे आवडते होते.

शाळेत असतानाच्या वयात मला निसर्गाची खूप आवड होती. जगंलात भटकणे, फुलपाखरू पकडणे, शेतीतील पिवळी, लाल फुले जमा करणे हा माझा छंद होता. शाळेत असताना आम्ही आट्यापाट्या, हुतुतूसारखे अनेक खेळ खेळत असू. माझी उंची लहान होती पण बांधा सुदृढ होता व स्वभाव सत्यप्रिय होता आणि माझ्या या स्वभावामुळे माझ्या वाटेला कोणी जात नसे. खेळात खोटेपणा केलेला मला सहन होत नसे. तसाच कधी प्रसंग आला तर मी खोटेपणा करणाऱ्यांना भरपूर चोप देत असे. मी माझ्या एका बंधूला असाच बेदम चोप दिला होता. अगदी जीव घुटमळेपर्यंत. मला कोणतीही खोटी गोष्ट लहानपणापासून आवडत नसे. अन्याय सहन करण्याचा, तो निमूटपणे गिळण्याचा माझा स्वभाव नव्हता. ते मला कधीही जमले नाही. अगदी लहानपणापासून आजपर्यंत या स्वभावात फरक पडला नाही.

मला प्राण्याबद्दल खूप प्रेम आहे. आमच्या घरात नेहमीच एखाददुसरे कुत्रे असे. आम्ही कुत्रे आणि मांजरांना जेवायला घातल्याशिवाय जेवत नसू. त्यांच्याबद्दल मला खूप प्रेम वाटे. त्यांच्याबरोबर खेळणे, बागडणे यात माझा बराचसा काळ व्यतीत होत असे. मी माझ्या खांद्याला भले मोठे तिरकामटे लावून आणि खिळयाचे केलेले भाले (बाण) घेऊन जंगलात फिरत असे. कशाचीही भिती वाटत नसे. पण कधी कोणाचीही शिकार केली नाही. मुंगीलाही मारलेले मला सहन होत नसे. एक प्रसंग आठवतो माझ्या मुलाने त्याच्या वयाच्या बारा-तेराव्या वर्षी, आम्ही गप्पा मारत बसलो असता एक मुंगळा मारला. मला ते सहन झाले नाही. मी त्यांच्या कानशिलात भडकावले, पुढे त्याने कधीही मुंगीला मारल्याचे स्मरणात नाही. अन्यायाला प्रतिकार करावा, सत्याला सामोरे जावे, असत्याचा पाडाव करावा आणि स्वतः होऊन कोणाच्याही वाटेला जाऊ नये. हे मी आजपर्यंत जपले आहे.

माझा भाऊ नारायण ऊर्फ भिकाजी हा माझ्यापेक्षा आठ-नऊ वर्षांनी मोठा होता. तो शाळा अर्धवट सोडूनच मुंबईला गेला. पण मी मात्र चौथी पास होईपर्यंत त्या शाळेत होतो. माझा भाऊ अत्यंत प्रेमळ होता. तो माझे सर्व लाड करायचा, त्याच्या स्वभावात शितलता होती. तो अन्याय सहज सहन करायचा, पण मला हे कधीच जमले नाही.

# आमच्या घराण्याविषयी

आमचे घराणे हे मानकऱ्याचे घराणे. गावातला आणि तक्षीमेतला मान आमच्या घराण्याला आहे. आमच्या घराण्यात मुळ देव हा मानकऱ्यांच्या घरात म्हणजेच सखारामरावांच्या मोठ्या घरात होता. पण जुन्या घरात असताना काही वाद झाले. आमच्या त्या जुन्या घरातील महिलांचे गौरी पूजनासाठी जाणे बंद झाले आणि म्हणून त्यावेळी आमच्या आजोबांनी म्हणजे भाऊरावांनी आमच्या घरात देवाची स्थापना केली व गौरगणपती आणण्यास सुरुवात केली, तसेच दसऱ्याला घट बसविण्यास सुरुवात केली ती आजतगायत चालू आहे. आता यशवंतरावांच्या म्हणजे सखाराम यशवंतराव आणि शीवरामराव यशवंतराव यांच्या त्या घरात आमचा मुळ देव आहे. सखारामराव रेल्वेच्या वैद्यकीय विभागात नोकरीला होते, शिवरामराव रेल्वे पोलिसमध्ये होते. ते घर तसे सुखवस्तू होते. दुसरे घर विश्रामराव यांचे त्यांना तीन मुलगेपैकी अप्पा ऊर्फ रघुनाथराव हे रेल्वे पोलिसमध्ये होते, पांडुरंगराव पोर्टट्रस्टमध्ये नोकरीला राहिले व गंगारामराव हे धाकटे बंधू गावात राहून शेती करत होते. त्या काळात इतर भावांची कुटुंबे गावात राहात असत व शेतीला मदत करत. गंगारामरावांवर माझे विशेष प्रेम होते. तो माझा जीवाभावाचा मित्र होता. अगदी त्याच्या मृत्युपर्यंत. आम्ही कधी त्यांच्या डाल्यात तर कधी दुसऱ्या कोणाच्या अशा तऱ्हेने शेती करत होतो. त्याच घरातील आबाजीराव हे एल.आय.सी. मध्ये नोकरीला राहिले ही सगळी मंडळी तशी वयाने माझ्यापेक्षा मोठी होती. चौथे घर हे सुरतवाल्यांचे

म्हणजे कृष्णाजीरावांचे ती सर्व मंडळी नोकरीधंद्यानिमित्त सुरतला राहायला होती आणि आजही आहेत.

आमच्या घराण्यातील माझे चुलते नारायणराव आणि बाबाजीराव यांचा वंश पुढे वाढला नाही. माझी चुलती म्हणजे बाबाजीरावाची पत्नी. तिने तिच्या वाट्याची सगळी जमीन आमच्या वाडीतील महादेवराव यांच्याकडे गहाणवटीत ठेवली होती. तिने शेवटपर्यंत ती सोडवली नाही आणि ती शेवटी महादेवरावांनी आपल्या नावे केली व त्यांनी आपल्या ताब्यात घेतली. त्यानंतर माझी चुलती कादवड मुक्कामी गेली, ती परत आली नाही. तीला देवज्ञा झाल्यानंतर मी कादवड मुक्कामी जाऊन १९७३ मध्ये तीचे कार्य त्या गावात जावून केले.

त्याकाळी आमच्या घरातील कोणीही नोकरीला नव्हते. माझे वडील थोडीफार शेतीला मदत करीत असत. पण पूर्ण भार माझ्या आईवरच होता.

# आमचे तळेवाडीतील भाऊबंद

आमच्या तळेवाडीत त्याकाळी वीस-एकवीस घरे होती. आमच्या वाडीतील बरेचसे लोक त्यावेळी लष्करात नोकरी करत होते. त्यामध्ये प्रामुख्याने चंद्रराव कदम, रतनराव कदम, लक्ष्मणराव कदम, बापूजीराव कदम, यशवंतराव कदम, हैबतराव कदम यांचा उल्लेख करायला हवा. ही सर्व मंडळी आपली मिलिटरीतील सर्विस पूर्ण करून गावात आली. काहींनी त्यानंतर बँकांमध्ये सिक्युरिटी म्हणून नोकरी केली. मी मात्र माझी लष्करातील नोकरी सोडून मुंबई पोलीसमध्ये भरती झालो.

आमच्या वाडीतील इतर बरेचसे लोक एल.आय.सी. मध्ये होते. त्यात गंगारामराव यांचा उल्लेख प्रामुख्याने करायला हवा. ते एल.आय.सी मध्ये चेअरमनकडे शिपाई म्हणून काम करत असताना जवळजवळ शंभरपेक्षा अधिक गावातील लोकांना त्यांनी नोकरीला लावले. त्यांचा स्वभाव खूप प्रेमळ होता आणि कार्यही महान होते.

आमच्या वाडीतील कै. रामचंद्रराव दिनकरराव कदम यांचा उल्लेख प्रामुख्याने एक अत्यंत दूरदर्शी, चाणाक्ष, भविष्याचा वेध घेणारा अशा ऋषितुल्य व्यक्तिमत्वाची व्यक्ती असा उल्लेख करावा लागेल. उच्च शिक्षित अशा या व्यक्तिमत्वाचा आमच्या पिढीवर आणि आमच्या नंतरच्या पिढीवर फार मोठा परिणाम झाला. त्यांच्याबद्दल एक अख्यायिक अशी आहे की, शेंडीला दोरी बांधून ते अभ्यास करीत असत. जेणेकरून झोप येऊ नये व आपला अभ्यास

अविरत सुरू रहावा. या व्यक्तिमत्वाने फार मोठे गारूड आमच्या मुलांवर केले होते. ते पोलिसखात्यामध्ये सिनियर इन्स्पेक्टर पदापर्यंत गेले आणि बराच काळ सी.आय.डी. खात्यात काम केले. त्यांनी त्या काळामध्ये टाईपिंग आणि शॉर्टहॅण्ड यावर प्रभुत्व मिळविले. ते स्वातंत्र्यपूर्वकाळातील नेत्यांची भाषणे शॉर्टहॅण्ड मध्ये लिहून सरकारला देत असत. त्यामुळे त्यांचा मोठा मान पोलिस खात्यात होता. एक सत्शील व्यक्तिमत्व असा त्यांचा उल्लेख करावा लागेल. निवृत्तीनंतर त्यांनी जवळ जवळ ४५ वर्षे टाईपिंग आणि शॉर्टहॅण्ड क्लास चालवून हजारो लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या, आपले संपूर्ण जीवन स्थितप्रज्ञापणे एखाद्या ऋषीसारखे स्वतंत्रपणे ते जगले. त्यांना आम्ही भाऊ म्हणत असत. ह्या आमच्या भाऊंचे दुसरे बंधू कै. निळकंठराव कदम यांचा उल्लेख आदरपूर्वक करणे जरूरीचे आहे, कारण आयकर खात्यात काम करणाऱ्या या सद्‌गृहस्थाने शास्त्रीय संगीतामध्ये अत्यंत उल्लेखनीय साधना करून संगीत क्षेत्रामध्ये नाव कमवले. आपल्या वडीलबंधूंसारखेच सत्शील असलेल्या निळकंठरावांनी आपले देहदान करून समाजापुढे एक आदर्श निर्माण केला.

## वडीलांची आध्यात्माकडे ओढ

मी साधारणतः नऊ वर्षाचा असेन. मला चांगले आठवते आहे. आमच्या घरी एक आध्यात्मिक अधिकारी साधुपुरुष सद्‌गुरू लक्ष्मण महाराज यांचे आगमन झाले. त्यांचे मुळ गाव खेर्डी. त्यावेळी आमच्या वाडीतील श्री. जिजाजीराव महाराज यांच्या घरी अवधूत संप्रदायातील अनेक शिष्यमंडळी भजन व प्रवचनासाठी जमत असत. त्यांच्या घरी गुरूदिक्षेचा मांड भरला होता. सद्‌गुरू लक्ष्मण महाराजांनी त्या दिवशी माझे वडील अनंतराव माझी आई व साजरीआका तिचे पती माधवराव यांनी अनुग्रह घेतला. म्हणजेच शिष्य केले. ते महाराज हे बेळगावच्या बाळेकुंद्री महाराजाच्या अवधूत सांप्रदायाच्या आध्यात्मिक शिष्य परंपरेतील होते.

दुसऱ्या एका अशाच प्रसंगी आमच्या घरी मांड भरला होता. सद्गुरू लक्ष्मणमहाराजांनी मलाही अनुग्रह घेण्यासाठी पुढे बोलावले. त्यावेळी मी नऊ वर्षाचा होतो. मला बैठकीवर बसण्याची आज्ञा केली. तेथे हजर असलेल्या सर्व लोकांना आश्चर्य वाटले. सगळेजण म्हणू लागले, 'अहो महाराज हे लहान पोर आहे याला काय कळते आहे? या अध्यात्मिक बैठकीत जे गौप्य आहे ते कुणालाही जाऊन सांगेल, तेव्हा याला अनुग्रह देऊ नका. पण महाराजांनी ऐकले नाही व त्यांनी मला मांडीवर बसून रीतसर अनुग्रह दिला. वयाच्या नवव्या वर्षी हे आश्चर्य घडले. मी खरोखरच नशिबवान होतो याचा पडताळा मला पुढच्या आयुष्यात आला.

त्यानंतर मला परमेश्वराची ओढ लागली. सतत नामस्मरण होऊ लागले. त्यात माझे तासन्तास जात. माझे वडीलही त्याच मार्गात असल्यामुळे घरात एक सांप्रदायिक भक्तिमय वातावरण असे. मला नवव्या वर्षी मिळालेल्या गुरुनामाचा प्रताप मला माझ्या दुसऱ्या महायुद्धातील मृत्युच्या तांडवातून परत सुखरुप आणण्यात झाला. सतत परमेश्वराचे नाव मुखात असे. ते लढाई चालू असतानाही मी कधी विसरलो नाही आणि म्हणूनच मी म्हणेन की त्या एका नामाच्या जोरावर मी जगाची मुसाफिरी करून आलो. असे अनेक अनुभव माझ्या जीवनात आले आणि त्यात या गुरूनामांच्या जोरावर मी तरुन गेलो.

अवधूत संप्रदायाची मुळ गादी बेळगाव जवळील बाळेकुंद्री येथे आहे.

मूळ पुरुष बालमुकुंद महाराज, पंत महाराज त्यानंतर विनायक महाराज आणि त्याचे शिष्य लक्ष्मण महाराज अशा गुरु परंपरेने चालत आली आहे. आमच्या गुरू महाराजांचा शिष्य परिवार फार मोठा होतो. आमच्या घरात दररोज भजन, पूजन चाले आजूबाजूची सर्व मंडळी त्यावेळी हजर असे. या सर्व सात्विक वातावरणाचा माझ्या मनावर खूप परिणाम झाला. माझा स्वभाव सत्यप्रिय कोमल व प्रेमळ बनला. देवाबद्दल वाटणारी माझी ओढ तीव्र होऊ लागली आणि देवावरचा माझा विश्वास दृढ होत गेला. ही सारी शिदोरी मला आयुष्यभर पुरली. पुढे आलेल्या मरणप्राय संकटात अत्यंत स्थिर होऊन गुरूनी दिलेल्या नाममंत्राच्या जोरावर मी हा सारा अग्निवर्षावाचा रस्ता निर्विघ्नपणे पार करू शकलो. अनेक प्रसंगाना दृढ निश्चयांनी सामोरे गेलो. तशीच माझी माझ्या आईवडीलांवरची भक्तीही अतूट अशीच होती. त्यांनी केलेल्या माझ्या-वरच्या संस्कारातूनच मी घडत गेलो.

माझा आवाज खूप चांगला होता. अत्यंत गोड आवाजाच्या माझ्या गळ्यातून मी 'प्रेमलहरी' ग्रंथातील सुंदर गीते व प्रार्थना गात असे. सगळे माझे कौतुक करीत आणि ही भजन गाण्याची परंपरा मी माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत जपली आहे.

आमच्या घरातील आम्ही सर्वजण सद्‌गुरू लक्ष्मण महाराजांचे शिष्य झाल्यानंतर आमच्या घरातील सगळे वातावरणच बदलून गेले. माझ्या वडीलांची आध्यात्माकडे ओढ वाढत गेली. त्यांचे प्रपंचात चित्त लागेना ते सतत ध्यान व विचारमग्न अवस्थेत असत. या साऱ्याचा परिणाम माझ्या आईवर फार झाला. माझ्या वडीलांचे आमच्या गुरूकडे जाणे-येणे वाढले. त्यांना सतत वाटे या प्रपंचातून आपण कोठेतरी दूर निघून जावे, संसाराचा त्याग करावा आणि एक दिवस खरोखरच ते घर सोडून निघून गेले.

ते कोठे गेले काहीच पत्ता नव्हता. मी आणि आई लक्ष्मण महाराजांकडे खेर्डी येथे गेलो. त्यांची भेट घेतली त्यांनी आईचे सांत्वन केले आणि सांगितले 'तू चिंता करू नकोस एक दिवस तो परत येईल.' तो एक साधू पुरुष होईल, गुरु पदावर जाईल. त्याचे अनेक शिष्य होतील. अध्यात्मिक क्षेत्रातील एक अधिकारी व्यक्ति म्हणून त्याचे नाव होईल. त्यानंतर १०-११ वर्षे त्यांचा काही पत्ता नव्हता. आम्ही त्यांची वाट पाहून थकलो होतो. आम्हाला पोटापाण्यांचे पाहणे जरुर होते. आई काबाडकष्ट करीत होती व आम्हाला वाढवित होती. माझा दादा मुंबईला मामीकडे गेला होता.

## वडीलांचे पुनरागमन

आणि अचानक एक दिवस त्यांचे दोन शिष्य गावात येऊन अनंतराव महाराजांचे घर कोठे आहे? म्हणून विचारू लागले. ते आमच्या वाडीत आले. त्यांनी घराबाहेर उभे राहून माझ्या वडीलांच्या नांवाने "अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त" अनंतराव महाराज की जय! असा उच्चार केला. म्हणजे गुरूंच्या नावाचा उच्चार केला. आम्ही बाहेर येऊन विचारले, तेव्हा माझ्या वडीलांबद्दल समजले. याचा धागा पकडून आमच्या वडीलांच्या आगमनाची आम्हाला चाहूल लागली. आणि आई व मी तडक खेर्डी येथे आलो. जवळजवळ दहा-अकरा वर्षानंतर त्यांचे आगमन खेर्डी येथे झाले होते.

त्यावेळी नुकताच मी मुंबईहून गावाला आलो होतो. ते गावात आले नव्हते पण खेर्डी येथे लक्ष्मण महाराजाच्या घरी थांबले होते. आम्ही दोघे तिथे गेल्यानंतर त्यांची भेट झाली. त्यांचा वेश पाहून आम्ही घाबरलो. भली मोठी वाढलेली दाढी, साधूचा वेश, तीक्ष्ण नजर, हेच का माझे वडील असा प्रश्न मला पडला. आई तर भांबावून गेली होती. पण आनंदाने तिच्या डोळ्यातले पाणी थांबत नव्हते. त्यांनी घरी यावे असे आईला वाटत होते, मलाही वाटत होते. पण शिष्य परिवाराबरोबर असलेल्या या साधू पुरुषांनी जर संन्यास घेतला असेल तर त्यांचे येणे शक्य नव्हते. एकदा संन्यास घेतलेली कोणीही व्यक्ती पुन्हा गृहस्थाश्रमात येणे कठीण. शिवाय मानसिक दृष्टिकोनातून अशा अवस्थेत पोहोचलेला सत्पुरुष पुन्हा प्रपंचात स्थिर होणे शक्य नाही. आईने लक्ष्मण महाराजाना गळ घातली की, कसेही करून त्यांना घरी पाठवा. तिने महाराजांना

धर्मसंकटात टाकले. हा तिढा कसा सोडवावा यांचा विचार करीत तेही हरवल्यासारखे वाटत होते. मी त्यावेळी सोळा-सतरा वर्षाचा होतो. नुकताच मुंबईहून आलो होतो. माझ्या वडीलांचे वय त्यावेळी साधारणता साठ वर्षाचे होते त्यांचे पांढरे केस, पांढरी दाढी, वृद्धत्वाकडे झुकलेली शरीरयष्टी पण तेजस्वी नजर एक परमार्थिक आनंद त्यांच्याकडे होता. ते ध्यान बघून मी अचंबीत झालो होतो. मला हे सगळे एक स्वप्नच वाटत होते.

शेवटी हा तीढा सुटला. लक्ष्मण महाराजांनी त्यांना गुरुपदाची रीतसर अनुज्ञा देवून अध्यात्मिक कार्य गावात राहून पुढे चालू ठेवावे अशी आज्ञा केली. आणि त्या गुरु आज्ञेचे पालन माझ्या वडीलांना करावे लागले. गुरु आज्ञा धुडकावणे हे महापाप, नाही...हो... म्हणताना ते कबुल झाले पण म्हणाले, मी परत येईन, पण प्रपंचात मी परत येईन यांची अपेक्षा ठेवू नका. मी आहे त्या अवस्थेत राहीन, आईने तेही कबूल केले आणि वडीलांना घेऊन आम्ही घरी परत आलो. तत्पूर्वी त्यांनी आपल्या शिष्यवर्गाला निरोप दिला. ते घरी आल्यावर गावात ही बातमी वाऱ्यासारखी पसरली आणि लोकांची गर्दी होऊ लागली. त्यांना सर्व आनंदराव बुवा या नावाने ओळखू लागले.

वडील आमचे घरी आले पण प्रपंचात रमू शकले नाही. सदानकदा भ्रमिष्ट अवस्थेत ध्यानस्थ बसून रहात. कधी जेवत असत कधी नसत. त्यांच्या मनाला येईल तसे ते वागत. त्याचा परिणाम सगळ्या घरावर झाला.

घरी आई एकटीच होती. वडीलांच्या अवस्थेत काहीही फरक होत नव्हता. पण वातावरण मात्र निवळले होते. ते आनंदी अवस्थेत असत. येणाऱ्या जाणाऱ्यांना दर्शन देत. अध्यात्माबद्दल मार्गदर्शन करीत आणि त्यामुळे

गावातल्या बऱ्याचशा लोकांचा ओढा त्यांच्याकडे वाढला. गुरु आज्ञा मानून त्यांनी अनेकांना आपले शिष्यत्व बहाल केले आणि गुरू चरणी लीन करून घेतले.

आमच्या गावामध्ये माझ्या वडिलांचेही बरेच गुरुबंधू होते. त्यांची नावे अशी श्री. गोपाळ कदम व श्री. विश्राम कदम. त्यापैकी गोपाळ कदम माझ्याबरोबर नंतर मिलिटरीत गेले व विश्राम कदम हे गावातच शेती करायला थांबले. त्यांची एक आत्या जिचे नाव सखूबाई होते, ती अत्यंत प्रेमळ होती व घरचा कारभार तिच बघत होती. माझे त्यांच्याघरी जाणे-येणे असल्यामुळे कधी-कधी तेथूनच जेवून येत असे. हे आमचे बंधुत्वाचे संबंध शेवटपर्यंत चालू राहिले. त्या घरातील सगळेच लोक माझ्या वडीलांचे शिष्य असल्यामुळे त्यांचे घरी आमचे जाणे-येणे वाढले.

आमच्या घरी रात्री अनुग्रह देण्यासाठी मांड भरले जात. भजन होई. माझे वडील अत्यंत सुस्वर आवाजात पंतमहाराज बाळेकुंद्री यांच्या प्रेमलहरी या पुस्तकातील गीते, प्रार्थना स्वतः म्हणत असत. तंबोरा व चिपळ्या याच्या नादात व त्यांच्या पहाडी आवाजात भजनाला खुप रंगत येई. हा सगळा कार्यक्रम उत्तररात्रीपर्यंत असे. माझ्या वडीलांचे शेकडो शिष्य गावात आणि गावाच्या बाहेर आध्यात्मिक प्रवाहात जोडले गेले होते. अशा या धार्मिक आणि मंगलमय वातावरणात मी घडत होतो. परमेश्वरावर माझा अखंड विश्वास होता व नामस्मरणातून त्या वयातही मी त्याच्याशी एकरूप होत होतो.

आमच्या वाडीत आता ज्या ठिकाणी शिवस्मारक आहे. त्याजागी हनुमंताचे एक देऊळ होते. त्या देवळामध्ये वाडीतील सर्व लोक जमून भजन किर्तन याचा लाभ घेत असत. या मंदिरामध्ये आमच्या वाडीतील रामाजीराव यांचे थोरले बंधू, बुवा आबाजीराव कदम हे सर्वसंग सोडून परागंदा झाले होते. ते परत गावात आले. त्यांनी आपले बस्तान या हनुमंताच्या मंदिरात बसवते. आम्ही लहान मुले या मंदिरात जमून भजन करत असू. लहानपणी आम्ही सर्व मुले मिळून डब्याची एक पालखी करत असू व त्यात सर्व देवतांचे फोटो ठेवत असू व वाजत गाजत त्याची मिरवणूक अख्ख्या वाडीत काढत असू. खूप मजा येई.

असे हे रंगीबेरंगी, गरीबीचे झळ लागलेले बालपण कधी संपले ते समजलेच नाही. शाळा संपली होती. वय वाढत चालले होते. त्यावेळी माझे मोठे बंधू हे मुंबईलाच होते. काहीही करून आपणही त्यांच्या मागे जावे असे वाटू लागले होते. गावात येणाऱ्या मुंबई पुण्याच्या काही लोकांना मी यासंबंधी माझी कैफियत सांगे, पण काहीही मार्ग सापडत नव्हता.

## मुंबईकडे प्रयाण

काहीही करून गाव सोडायचेच यासाठी मी माझ्या आईकडे विनवणी करत होतो. पण ती काहीही करून मला परवानगी देत नव्हती. घरात तिच्या सोबतीला मी एकटाच होतो. त्याकाळी माझे वडील घर सोडून संन्यस्त झाले होते. त्यांचा ठावठिकाणा काहीच नव्हता. अशा अवस्थेत आई मला सोडायला तयार नव्हती. माझ्या जाण्याच्या विचाराने ती अगदी बेचैन झाली होती. पण तरीही मी हट्ट केल्याने तिने मला मुंबईला जाण्यास परवानगी दिली. मी बोटीने दाभोळ, हार्णे मार्गे मुंबईला आलो. मी जरी वयाने लहान होतो तरी अंगाने चांगला धष्टपुष्ट होतो. मी प्रथम आलो तो गिरगांव येथील आमचे मामा पोमेंडकर विचारे यांच्याकडे. दादा त्याच्याकडेच होता.

तसे त्याकाळी आमच्या जवळचे नातेवाईक मुंबईत कोणीच नव्हते, लांबचे बरेच नातेवाईक होते, पण आमच्या गरीबीमुळे ते आमच्याशी फटकूनच वागत. त्यांची तरी काय श्रीमंती होती म्हणा? आमच्या मराठा समाजातील त्याकाळी पैशाने कोणीही समृद्ध, श्रीमंत नव्हते. ना त्यांचे कारखाने, ना धंदा-व्यवसाय. नोकरी करून आपले पोट भरणारे लोक, आपआपल्या प्रपंचात गुंग होते. काही लोक पोलीसमध्ये व इतर सरकारी खात्यामध्ये काम करीत होते. तेव्हा अशा परिस्थितीत मुंबईत आपला टिकाव कसा लागणार ही विवंचना सतत मनात माझ्या होती.

सततच्या कामाने दादाची प्रकृती खालावत गेली, ना नोकरी, ना पैसा, ना कोणी आधाराला अशा अवस्थेत दादाला घेऊन मला परत गावाला यावे

लागले. त्याचे दुखणे वाढले. त्याला टि.बी. झाल्याचे निदान डॉक्टरांनी केले. औषधाला पैसा नाही, खायला धड अन्न नाही. अशा अवस्थेत आम्ही सापडलो होतो. त्यातच भावाचे दुखणे वाढले आणि त्याचे निधन झाले.

दादाच्या जाण्याने आई अधिकच दुःखी झाली. तिचे सांत्वन करण्यासाठी नानी पेढांब्यातून आली होती. त्याचे सगळे कार्य आटोपल्यावर एक मोठी पोकळी आमच्या घरात निर्माण झाली. आता सगळा भार माझ्याच खांद्यावर होता. काहीही करून नोकरी धंदा शोधणे जरूर होते. मी परत मुंबईला जाण्याचे ठरविले.

मी मुंबईहून नोकरी सोडून आलो होतो. पुढे काय करायचं हे काहीच ठरविले नव्हते. अशा घरच्या वातावरणात राहून आपला निभाव कसा लागणार काहीतरी करणे जरूरीचे होते. त्यासाठी मी अनेक ओळखीच्या सद्गृहस्थांना सांगत होतो. आमच्या वाडीतील एक सद्गृहस्थ श्री. चंद्रराव कदम यांना मी या संदर्भात बोललो, ते त्यावेळी मिलिटरीमध्ये होते आणि त्यांचे वास्तव्य त्यावेळी पुण्याला होते. त्यांनी मला पुण्याला घेऊन जायचे कबूल केले. माझ्याजवळ पैसे नव्हते. ते मला तिकिट काढून घेऊन गेले. आमच्या नशीबाचे थेर काही संपलेले नव्हते. दीड महिना मी त्यांच्याकडे होतो. दोन वेळा खाणे आणि नोकरीसाठी भटकणे. काही मार्ग मिळत नव्हता. रात्र-रात्र झोप लागत नव्हती. आणि त्यांच्यावर माझे ओझे आहे या भावनेने फार मोठा मानसिक दबाव माझ्यावर येत होता. त्यांचे उपकार मी विसरुच शकत नाही. मला नोकरी मिळत नव्हती हा त्यांचा दोष नव्हता. शेवटी मी पुन्हा तेथून मुंबईला जाण्याचा निर्णय घेतला. त्यांनी स्वखर्चाने मला मुंबईच्या पॅसेंजर गाडीत बसविले आणि मी मुंबईला आलो.

## पुन्हा मुंबई

मी पुन्हा मुंबई गाठली. पण मागील सर्व अनुभव गाठीशी असताना मामाकडे न जाण्याचा निर्णय घेतला आणि आमच्या मागील वास्तव्यामध्ये ओळख झालेले, नीलवर्ण नावाचे गृहस्थ होते ते कामाठीपुरा मध्ये तिसऱ्या गल्लीत राहात होते. भायखळा स्टेशनपासून चालत मी त्यांच्याघरी पोहोचलो. हातात एक पिशवी होती. त्यात एक शर्ट आणि एक फटकूर होते. एकही पैसा खिशात नव्हता. अशा अवस्थेत मी माझे नशीब अजमावण्यासाठी मुंबईच्या भूमीवर पुन्हा पाय ठेवला होता. पण आमचे नशीब बलवत्तर कोठे होते? श्री. नीलवर्ण हे ती जागा सोडून गेले होते. खालच्या मजल्यावर मिस्त्री नावाच्या एका गृहस्थाकडे त्यांच्यासंबंधी चौकशी केली तेव्हा ते गिरगावमधील फणसवाडीत रहायला गेले, असे समजले. मी ठाकूरद्वारच्या त्यांच्या पत्त्यावर चालत गेलो. तेथे त्यांची भावजय राहात होती.

त्यांनी मला ओळखले व आधार दिला. मी त्यांच्याकडे येताच त्यांच्या आईने मला जेवायला दिले व चौकशी केली. मी खूप भुकेला होतो. तिने माझी सगळी चौकशी केली. मी माझी सर्व कर्मकहाणी तिला सांगितली. तिला माझ्याबद्दल सहानुभूती वाटली व म्हणाली, "बाळ तू इथेच रहा, नोकरी शोध, रहाण्याची, खाण्याची काही काळजी करू नकोस" तो काळ असा होता की, माणसाला माणूसकी होती. पैसा फार महत्त्वाचा नव्हता पण पैशावाचून काहीच चालणारे ही नव्हते. नोकरी शोधणे जरूरीचे होते.

मी पूर्वी मुंबईला असताना मागच्या खेपेला ज्या प्रेसमध्ये काही दिवस कामाला होतो, त्याच प्रेसमध्ये पुन्हा कामाला गेलो. त्या प्रेसचे मालक राजाध्यक्ष म्हणून होते. ते दिसायला गोरेगोमटे होते. त्यांचा स्वभाव कडक होता. पगाराची चौकशी न करताच काम करू लागलो. पोटापुरते कमावू लागलो. पण त्याच समाधान नव्हते. यात काही फायदाही नव्हता. मागच्यावेळी घडलेल्या प्रमादातून नोकरी सुटली होती. असेच काहीतरी पुन्हा घडेल असेच मनात सतत वाटत असायचे. तेथे काम करत असताना मी इतर ठिकाणीही काम शोधण्याचा प्रयत्न करीत होतो. पण काहीच मार्ग सापडत नव्हता.

त्या काळात स्वातंत्र्यचळवळीची धामधूम चालू होती. गिरगाव हे त्याचे मुख्य केंद्र झाले होते. संध्याकाळी कधी कधी मी वेळ जावा म्हणून गिरगाव चौपाटीवर होणाऱ्या सभांना जात असे. मी प्रेसमध्ये काम करीत होतो. बाहेर देशात काय चालले आहे हे सारे समजत होते. पण उपाशी पोटी हे राजकारण माझ्या डोक्यात शिरत नव्हते. मला माझ्या भविष्याचा प्रश्न महत्त्वाचा वाटत होता. त्यासाठी मी धडपडत होतो. हे प्रांजळपणे कबूल करतो. स्वातंत्र्य चळवळीबद्दल आत्मीयता वाटत होती. पण त्याही पेक्षा माझ्या पोटाचा प्रश्न मला महत्वाचा वाटत होता.

रजा असेल तेव्हा त्या काळात मी गिरगावपासून कुलाब्यापर्यंत भटकत असायचो. त्याकाळात ब्रिटीश सरकारचे सगळे आरमार व सैन्य हे कुलाबा भागातच होते. तिकडे कडक बंदोबस्त असायचा. कुलाब्याच्या मिलिटरी कॅम्पमध्ये माझे दोन गाववाले होते. त्यातील एकाचे नाव महादेव राव कदम. ते हवालदार होते. त्याना मी भेटलो व मिलिटरी मध्ये मला भरती करा, अशी त्यांना

विनंती केली. दुसरे गाववाले होते केशवराव कदम त्यांनाही तशीच विनंती केली. त्यांना माझ्याबद्दल खूप सहानुभूती होती. मी मिलिटरीत भरती होऊ शकेन असे त्यांना वाटले व माझी विनंती त्यांनी मान्य केली. जेव्हा कधी भरती असेल तेंव्हा आम्ही तुला बोलवून घेऊ असे त्यांनी सांगितले. मला फार आनंद झाला. माझा परमेश्वरावर दृढ विश्वास होता. तोच वेळप्रसंगी, संकटकाळी मला तारील अशी खात्री होती. अशा प्रसंगी मला त्याचाच एक आधार होता.

आणि खरोखरच त्या मौजच्या प्रेसमध्ये एक प्रमाद घडला. मशीनवर लावण्यात येणारा जड ब्लॉक माझा अंदाज चुकल्याने मशीनमध्येच पडला. झाले, ती मशीन बाद झाली आणि आमच्याही ढुंगणावर लाथ बसली.

# मिलिटरीमध्ये भरती

मौज प्रेसमध्ये घडलेल्या अपघातानंतर नोकरी सुटली. पुन्हा आम्ही बेकार! मोठा प्रश्न उभा राहिला होता. आता पुढे काय करायचे? पण याच वेळी मी कुलाब्याला जाऊन श्री. महादेवराव कदम व श्री. केशवराव कदम यांना पुन्हा भेटलो. त्यांनी दोन दिवसांनी येण्यास सांगितले. येताना सर्टिफिकेट घेऊन ये असेही बजावले. अंगाने धष्टपुष्ट असलेला मी पण मनाने फार खचलो होतो. पुढे काय वाढून ठेवले आहे याची काहीही कल्पना नव्हती. पण तरीही खचून न जाता निर्धाराने दोन दिवसांनी बोलविल्याप्रमाणे कुलाब्याला वेळेवर हजर झालो.

त्या दिवशी मिलिटरी भरतीसाठी साधारणतः तीनशे लोक आले होते. त्यापैकी बारा जणांना सिलेक्ट केले. त्यात सुदैवाने माझा नंबर लागला. माझी पिळदार गोटीसारखी शरीरयष्टी कोणालाही भुरळ घालण्यासारखी होती. त्या दिवसाची तारीख होती ३ फेब्रुवारी १९३८. आणि मी सेनादलाच्या मराठा लाईट इन्फ्रन्ट्रीमध्ये दाखल झालो.

सरकारी नोकरी तेव्हा आता सारे हाल संपले आहे असे मनाला वाटले. गावाला पत्र पाठवून आईवडीलांना तसे कळविले. त्यांनाही आनंद झाला. माझा बाडबिस्तरा उचलून मी कुलाब्याला मिलिटरी कॅम्प मध्ये दाखल झालो. दुसऱ्या दिवसापासून आमची तिथल्या शिस्ती-प्रमाणे दिनचर्या सुरू झाली.

तेथे शिस्तीप्रमाणे आमच्या डोक्याचे गोटे करून भोवरे ठेवण्यात आले. आमची परेड दुसऱ्या दिवसापासून सुरू होणार होती. आम्हाला जरूर ती सारी

कीट व इतर सामान देण्यात आले. रात्री ते सगळे मिलिटरीचे कपडे घालून पाहिले, खूप बरे वाटले. आता मी साधा बाबू राहिलो नव्हतो. त्यानंतर आमची बेळगावला रवानगी झाली. आमची भरती झाल्यावर आम्हाला बेळगावला जाण्यासाठी पुण्याला दुसरी गाडी पकडावी लागली आणि दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही बेळगावला पोहोचलो. आम्हाला पोहोचविण्यासाठी आमच्याबरोबर महादेवराव कदम हवालदार हे बेळगावला आले होते. आम्हाला सोडून ते परत गेले. मी ब्रिटीश सरकारच्या मिलिटरीचा एक सैनिक होतो. माझ्या आनंदाला पारावार राहिला नाही. आता मी सरकारी अंमलदार झालो होतो.

आम्हाला बेळगावला वेगवेगळया प्लॅटून मध्ये तीन-तीन, चार-चार असे वाटून दिले आणि आमची रितसर ट्रेनिंग सुरू झाली. माझा नंबर ८४६८/१०/५-एमएलआय मी असा होता. मी बेळगांव १०/५ मराठा लाईट इन्फ्रन्ट्री येथे रिपोर्ट केला. आमची ट्रेनिंग सुरु झाली. त्या नऊ महिन्याच्या काळामध्ये सर्व प्रकारचे प्रशिक्षण आम्हाला देण्यात आले.

आमची ट्रेनिंग चालू झाली त्याकाळी मिलिटरीची ट्रेनिंग अत्यंत कडक असे. अगदी कठिणात कठिण अशी सर्व प्रकारची ट्रेनिंग दिली जाई. सकाळी पळणे, मग पिटी परेड, मग आरमरीत जाऊन रायफल आणून त्याची ट्रेनिंग होत असे. सारा दिवस त्यात जाई. जर का चुका झाल्या तर जबर शिक्षा होई. बुटाची लाथ वा हंटरने झोडीत. आम्हाला शिकवणारे मास्तरही चांगले एक्सपर्ट होते. त्यांच्या हाताखाली आमची ट्रेनिंग उत्तम चालली होती. मधून मधून आमच्या वरचे मोठे गोरे अधिकारी व कंपनी कमांडर येऊन परेड पाहात. त्यांची दहशत

आम्हा सर्वांना फारच होती. आमच्यावर दोन हवालदार सतत नजर ठेवून असत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आमची सगळी कामे जराही चालढकल न करता चालत असत. गवळयाने दुध आणल्यावर सकाळी दुध आणि पाव खाऊन आम्ही खेळायला जात असू ते सकाळी दहा वाजेपर्यंत. हे फक्त रविवारी होई. त्यावेळी आम्हाला निरनिराळे खेळ आवडीप्रमाणे खेळावयास देत. त्यामध्ये हॉकी, फूटबॉल, व्हॉलीबॉल यांचा समावेश होता. माझा ओढा पहिल्यापासून हॉकीकडे फार होता. आणि ट्रेनिंगच्या काळात मी तो पूर्णपणे आत्मसात केला. मी उत्तमप्रकारे गोल किपरचे काम करत असे. काय हिम्मत कुणी गोल करील. माझी तशी जिद्दच होती. भविष्यात पोलिस डिपार्टमेंटमध्ये आल्यावर मी पोलिसच्या टिममधून खेळताना गोलकिपर म्हणूनच राहात असे.

ट्रेनिंगच्या काळात दुपारी थोडी विश्रांती मिळत असे व नंतर पिटी परेड व्हायची. नंतर ड्रेस घालून परेड व्हायची. त्यानंतर स्कूल व परत संध्याकाळी परेड असा दमछाक करणारा परेडचा कार्यक्रम असायचा. ट्रेनिंगचा सगळा काळ हा नऊ महिन्याचा होता. शारीरिक कवायती व ट्रेनिंग कवायती बरोबर आम्हाला स्कूल असायचे. त्यामध्ये इंग्रजी शिकवले जायचे, मॅप रिडींग, सिग्नल कसे द्यावेत यासंबंधीचे ज्ञान, मिलिटरीचे सारे नियम, वागणूक व शिस्त याबद्दल ट्रेनिंग दिली जात असे.

बेळगांव येथील हा नऊ महिन्याचा ट्रेनिंगचा काळ फार मजेत गेला होता. खाण्यापिण्याची मजा होती. तब्येत चांगली झाली होती. रुबाबदारपणा वाढला होता. अंगात शिस्त बाणली होती आणि हळूहळू मी एक शिस्तबद्ध सैनिक झालो होतो. अत्यंत कडक शिस्तीत व खडतर शिक्षणाचा फायदा

त्यानंतरच्या जीवनात झाला. बेळगावचे वातावरण खूप चांगले होते. हवा उत्तम होती. या सगळ्याचा परिणाम माझ्यावर फार चांगला झाला. हा बेळगावचा कॅम्प फार मोठा होता. कित्येक किलोमीटरचा होता. सर्व सोईनी युक्त. त्यात ट्रेनिंग सेंटर, सरकारी कार्यालये, खेळाची मैदाने, फायरिंग रेंज, अगदी प्रशस्त होते.

या काळात रजेच्या दिवशी मी अधूनमधून संध्याकाळी बेळगाव येथील बाळेकुंद्री महाराजांच्या मठात जात असे. तेथे ध्यान, भजन व साधनेची उत्तम व्यवस्था होती. आरती व पालख्यांना मी थांबत असे पण लवकर परत येण्याचे बंधन असल्यामुळे फार काळ तिथे थांबता येत नसे. झटपट परत यावे लागे. हा काळ अत्यंत सुखाचा, आनंददायी असा गेला. मला मिळणाऱ्या परागातून १० रु. फॅमिली मनिऑर्डर माझ्या घरी प्रत्येक महिन्याला पाठवली जात असे. त्यातून आईवडीलांना थोडीफार मदत होत होती. तेव्हा घरही उत्तम चालले होते.

आमच्या ट्रेनिंगच्या शेवटी आमची पासिंग परेड झाली. तत्पूर्वी आमची बंदूकीची फायरिंगचीही परीक्षा झाली. मी उत्तम तऱ्हेने, उत्तम मार्कानी ती परीक्षा पास झालो. त्यात जवळ जवळ पंधरा दिवस गेले. ट्रेनिंग संपल्यावर आम्हाला वीस दिवसाची रजा देण्यात आली होती. मुंबईला आल्यापासून आणि तेथून बेळगावला आल्यापासून घरी जाणे झाले नव्हते. मला सारखी घरची आठवण येत होती. आईवडीलांना भेटावेसे वाटत होते.

ज्यावेळी मी गाव सोडले आणि ज्या अवस्थेत सोडले आणि आज ज्या अवस्थेत मी गावात जात होतो, त्यात जमिन आणि अस्मानाचा फरक होता.

बेकार अवस्थेत मी गाव सोडले होते आणि आता सरकारी अंमलदार म्हणून मिलिटरीच्या वेशामध्ये गावात आलो होतो. चेहऱ्यावर आनंद होता. मी आईबाबांना भेटलो. वाडीतील, गावातील सर्व मंडळींना घराघरात जाऊन भेटलो. खूप बरे वाटले. पण हा वीस दिवसाचा रजेचा काळ हा हा म्हणता निघून गेला. घरात उत्सवाचे, सणाचे वातावरण होते. मला कोठे ठेवू आणि कोठे नको असे माझ्या आईला झाले होते. जवळजवळ एक वर्षानी मी गावात आलो होतो. नानीही पेढांब्यातून येऊन भेटून गेली. खर्च बराच झाला होता. शिल्लक पैसे थोडे होते. म्हणून इकडे तिकडे टाईमपास न करता मी बेळगावला परत आलो. माझ्या आईवडीलांची वार्धक्याकडे वाटचाल चालू होती. घरी त्यांच्याशिवाय कोणीच नसायचे. नानी अधून मधून पेढ्यांब्यातून यायची तेवढीच.

## मी बेळगावला परतलो.

त्यावेळी बेळगावमध्ये आमच्या मिलिटरी कॅम्पमध्ये आमची "कसम" परेडची तयारी चालली होती. "कसम "परेड म्हणजे शपथ विधी. नऊ महिन्याच्या खडतर प्रशिक्षणनंतर एक पासिंग परेड घेतली जाते. त्यावेळी सर्व सैनिकाना एक शपथ दिली जाते व आर्मी कमांडिंग ऑफिसर आमच्या परेडची पाहणी करत व सलामी स्वीकारत आणि त्यादिवशी आम्हाला रीतसर सैन्यामध्ये सामिल करून घेतले जाते. या पासिंग परेडची मजा काही औरच असते. त्यावेळी आम्हाला संपूर्ण लष्करी वेशामध्ये कडक कांजी केलेल्या कपड्यात जावे लागते. बुटाचे पॉलिश इतके चमकदार असे की त्यात पाहणाऱ्याचा चेहरा दिसावा. त्यासाठी अगोदर दोन दिवसापासून तयारी करून घ्यावी लागत असे. या पासिंग परेडच्यावेळी आमचा कॅम्प अधिकारी आणि सैनिकांनी भरून गेला होता. शामियाने उभारले होते. सर्व बाजूने रंगरंगोटी केली होती. आणि या कामी नव्याने भरती झालेल्या रंगरुटांचा उपयोग करून घेण्यात आला होता. सगळे बडे ऑफिसर्स, त्यात बहुतेक ब्रिटीश होते. क्वचितच काही मराठी अधिकारी कॅप्टनच्या हुद्यापर्यंतच पोहोचलेले असत. बाकी सगळे ऑफिसर्स ब्रिटीशच होते. त्या दिवशी सगळे अधिकारी सैनिकी वेशात टिपटॉपमध्ये सकाळीच शामियानात हजर होते. पासिंग परेड सुरू झाली तेव्हा बँडच्या तालावर तेज सलामी दिली गेली आणि कार्यक्रम संपला.

नंतरचा कार्यक्रम हा बडाखान्याचा होता. आम्ही नव्याने सैन्यात भरती झालेले शिपाई त्यात सामिल झालो होतो. दोन विभागात हा बडाखाना संपन्न

झाला. एक सैनिकांसाठी व दुसरा अधिकाऱ्यांसाठी अशी निरनिराळी व्यवस्था होती. बडा मज्जा आ गया. त्यानंतर आम्ही सगळे शिपाई निरनिराळ्या कंपनीमध्ये विभागलो गेलो. ज्याप्रमाणे ऑर्डर्स होत्या. त्याप्रमाणे त्यांची पाठवणी त्यात्या प्लाटूनमध्ये होणार होती.

पण तत्पूर्वी आम्हाला पंधरा दिवसांची सुट्टी दिली गेली आणि मी गावाला परत आलो. आम्ही ट्रेनिंग झालेले सगळे सैनिक आपापल्या गावी गेलो. आईवडीलांना, नातेवाईकांना भेटण्यासाठी. मी गावात आलो. सर्वांना आनंद झाला. बहुतेक आम्हाला लवकरच बेळगाव सोडावे लागणार अशी कुणकुण होती आणि रजा संपून परत जाताच आम्हाला जेथे आमची पोस्टींग होणार त्या कमांडला पाठविले जाणार होते. कारण मी ज्या बेळगावच्या मराठा लाईट इन्फंट्रीचा शिपाई असलो तरी त्या कमांडच्या कंपन्या भारतातील विविध ठिकाणी जरूर पडेल त्याप्रमाणे पाठविल्या जात होत्या.

रजा संपली. सगळ्यांचा निरोप घेऊन मी निघालो. त्यावेळी आमच्या वाडीत अशी पद्धत होती की, कुणी मुंबई, पुण्याला निघाला की, या टोकापासून त्या टोकापर्यंतच्या सगळ्या घरात जाऊन वडीलधाऱ्या मंडळींना नमस्कार करून येत असू आणि आम्हाला पोचविण्यासाठी सगळ्या वाडीतील आबालवृद्ध साश्रुनयनांनी निरोप देत असत. पण आता सारेच बदलले आहेत, काय करणार?

आईवडीलांना मी निघणार या विचारांनेच खूप दुःख झाले. मी परत कधी येणार, माझी पोस्टींग कोठे होणार याचा काहीही थांगपत्ता ना मला होता ना कोणाला. हे सारे बेळगावला गेल्यानंतर समजणार होते. मी गाव सोडला. प्रथम कराड मार्गे कोल्हापूर, मिरज अशा मार्गे मी बेळगावला येऊन पोहोचलो.

त्या काळी गावात येताना आणि गावातून परत जाताना आपल्या मिलिटरीच्या ड्रेसमध्ये सैनिकांनी जावे असा दंडक होता. परिणामी बसमध्ये, ट्रेनमध्ये किंवा कोठेही त्यांना सन्मानाची वागणूक दिली जात असे. गावात याचा अनुभव मला आला. काल हटकणारे, हडतूड करणारे आज विचारपूस करीत होते. हा केवढा प्रचंड बदल माझ्या जीवनात होता. याचा अनुभव मला पदोपदी आला. हा सारा सन्मान त्या माझ्या मिलिटरीच्या ड्रेसचा होता.

मी त्यावेळी २/५-एमएलआय ला जॉईन झालो होतो व माझी पहिली पोस्टींग दिल्लीला होणार असे समजले. त्याप्रमाणे ऑर्डर्स आल्या. मी घरापासून खूप दूर जाणार होतो म्हणून मनात खंत होती. पण आता नोकरी रितसर चालू होणार होती. गरीबीचे चटके बंद झाले होते आणि आयुष्याची फरफट थांबली होती असे वाटले. घर नीट चालेल. अन्नाची दधात राहणार नाही, माझ्या आईवडीलांना कष्ट करावे लागणार नाही याचा आत्मिक आनंद मनात होताच. त्यावेळी माझ्या पगारातून दरमहिन्याला दहा रुपयाची फॅमिली ऑर्डर म्हणजे माझ्या पगारातून दहा रुपये परस्पर माझ्या घरी पाठविले जात होते. निदान काही अंशी त्यांचे जीवन सुरळीत झाले होते. तशी ॲथॉरिटी आमच्याकडू लिहून घेतली जात असे. आम्ही जरी कुठेही असलो, तरी यात खंड पडत नसे. पुढच्या काळात दुसऱ्या महायुद्धाच्या कालखंडात मी सहा वर्षे बाहेर असताना आणि घराशी काहीही संपर्क नसताना, ही फॅमिली मनिऑर्डरची सोय माझे कुटुंब सुखात ठेवण्यास कारणीभूत ठरली. त्या काळातल्या ब्रिटीशांच्या या व्यवस्थेची खरोखरच प्रशंसा करायला हवी.

कारण सारे काही शिस्तबद्ध वेळच्या वेळी होत असे. बेळगाव ते दिल्ली हा चार-पाच दिवसांचा प्रवास करून आम्ही सर्वजण दिल्लीला आलो.

## पहिली पोस्टींग दिल्लीला

पंधरा दिवसाची रजा कधी संपली काहीच कळले नाही. कऱ्हाड-पुनामार्गे, मिरजवरून बेळगावला रेल्वेने आलो. बेळगावला आल्यावर समजले की, माझी पोस्टींग दिल्लीला सेकंड फायु २/५-एमएलआय ला झाली होती. त्याच्या ऑडर्स आमच्या हातात पडल्या. आणि मग दिल्लीला निघण्याची सारी तयारी सुरू झाली. आम्ही आमचे किट बांधून तयार ठेवले. घरी पत्र लिहून आईला मी दिल्लाला जाणार आहे असे कळविले व पुढील पत्ता काय असेल याबद्दल नंतर कळवीन असेही त्यात नमूद केले. आमच्याबरोबर त्यावेळी त्या कमांडचे हवालदार शंकरराव यांना देण्यात आले होते व पुणे- मुंबई मार्गे आमचा प्रवास सुरू झाला. हा प्रवास अर्थात रेल्वेनेच होता आम्ही जरूर ते खाण्याचे पदार्थ बरोबर घेतले होते. आमची हत्यारे रायफल आणि इतर सर्व किट आमच्या बरोबर होते. रेल्वे गाडीत मिलिटरीसाठीच्या रिझर्व्ह कंपार्टमेंट मध्ये आम्ही सगळे बसलो होतो. आम्हाला घेऊन जाणारी ट्रेन झांसी-मथुरा, आग्रा मार्गे जात होती.

आम्ही आग्राला उतरलो. त्याचदिवशी आग्राच्या किल्ला तसेच ताजमहाल पाहिला. हा किल्ला फार देखणा आहे. लाल दगडांनी त्याची बांधणी करण्यात आली. त्याच किल्ल्यात शिवाजी महाराजांना औरंगजेब यांनी ठेवले होते. यमुना नदीच्या तिरावरील ताजमहालही पाहिला. सुंदर काम होते. फारच आवडला. त्या भव्य संगमरवरी वास्तूची शोभाही अवर्णनीय आहे. स्फटिकासारखे महाल शहाजहानने मुमताज महलच्या प्रेमाचे प्रतिक म्हणून

बांधला. प्रथमच हे सारे पाहत होतो. आमच्या कोकणातल्या सौंदर्यापासूनचा हा अनोखा अनुभव मनाला भावला यात शंकाच नाही.

तेथून आम्ही दिल्लीकडे रेल्वेने प्रयाण केले. दिल्ली स्टेशनवर उतरून आम्हाला छोट्या ट्रेननी कॅन्टॉनमेंटमध्ये आणण्यात आले व तेथून मोटारीत आमचे सामान भरून कॅम्पमध्ये नेण्यात आले. बेळगावहून आलेल्या सैनिकांपैकी प्रत्येक कंपनीमध्ये चार-चार जवान वाटण्यात आले. माझा नंबर डी १६ प्लाटून मध्ये लागला. मला हवालदार श्री. नाईक याच्या ताब्यात दिले. तिथे आल्यावर आम्ही जेवण घेतले. आम्हाला खाटा दिल्या गेल्या. त्यावर आम्ही आमचे किट लावले. कांबळ टाकली, मच्छरदाणी लावली आणि थोडी विश्रांती घेतली. त्यानंतर आम्ही आरमरीत जाऊन रायफली ताब्यात दिल्या. उन्हाळा खूप होता. तिथल्या वातावरणात बेळगावचे मराठमोळे रांगडेपण नव्हते. त्या कॅम्पमध्ये सर्व जाती-धर्माचे लोक, पठाणांसह, गुरखा वगैरे होते. हे मी सारे प्रथमच पहात होतो. आमच्या कॅम्पचा परिसर फारच मोठा होता.

ब्रिटीशांनी अख्ख्या हिंदुस्थानभर जे राज्य केले, ते या सैन्याच्या पाठिंब्यावरच. त्यांची अर्थात ते सैन्याची खूप चांगली काळजी घेत. म्हणूनच हे सारे घडू शकले. कोणत्याही वस्तूची ददात नव्हती. कॅम्पमध्ये दारूपासून साऱ्या वस्तू मौजूद होत्या. दिल्ली हे ब्रिटीशांचे फार मोठे मिलिटरी सेंटर होते. तेथे त्या वेळच्या महार रेजिमेंट, गुरखा रेजिमेंट, मराठा इन्फ्रन्ट्री, डोगरा रेजिमेंट, पठाणी फलटणी इत्यादींचे वेगवेगळे विभाग होते. साऱ्या हिंदुस्थानवर दिल्लीतून राज्य करणाऱ्या ब्रिटीशांचे वैभव काय असेल याची कल्पना येई.

आम्ही आमच्या कंपनीला जॉईन झाल्यावर दुसऱ्या दिवसापासूनच आमच्या परेड चालू झाल्या. आमचे युनिट तसे लहान होते. पहाऱ्याच्या

कामाव्यतिरिक्त आम्हाला जेवण बनवणाऱ्या कुकनाही कधीकधी मदत करावी लागे. पीठ मळून देणे, पाणी देणे, ते काय मागतील ते देणे, अशीही कामे करावी लागत. त्या व्यतिरिक्त खेळ व इतर करमणूकीतही वेळ जात असे. परेड मात्र दररोज असे. त्यामध्ये रोड रनिंग, रायफल परेड, फायरींग टेस्ट नेहमी चालू असे. तेथील फायरींग कॅम्प खूप मोठा होता. त्या व्यतिरिक्त त्या ठिकाणी चिलखती दले व सिग्नल फ्लॅटून ही होते.

त्यावेळी आमच्या कंपनीचे कमांडिंग ऑफिसर जमादार गरुड साहेब होते. फार कडक शिस्तीचा माणूस. पण प्रेमळ होते. यात वाद नव्हता.

दिल्लीच्या त्या वातावरणात मी चटकन एकरूप झालो. आमच्या कंपनीला निरनिराळ्या ठिकाणी ड्यूटीला पाठविले जात असे. कामे अगदी चोख केली जात. शिस्तीचे पालन अगदी काटेकोरपणे होत असे. चालताना बोलताना मिलिट्रीचा शिपाई बाणा रोमारोमात भरला होता. मी त्यावेळी दिसायला फार उमदा होतो. बॉडी एकदम चेंडू सारखी व गोरीपान अशी होती. मी सगळ्यांना हवाहवासा वाटत असे. त्यामुळे माझी सर्वांशी मैत्री झाली.

एकदा आमच्या कंपनीची ड्यूटी व्हाईसराय हाऊसला होती. तो परिसर अत्यंत सुंदर होता. ती वास्तूही भक्कम आपल्या रूबाबाला साजेशी अशी होती. त्या वास्तूतून अख्ख्या हिंदुस्थानावर अंमल केला जात होता. तेच ते आताचे राष्ट्रपती भवन. तेथे ड्यूटी करण्यास फार मजा येत असे. एकतर परिसर सुंदर होता. चारीबाजूला फुलांनी भरलेले बगीचे या साऱ्या वातावरणात आम्हाला उत्तम जेवण मिळत असे. त्या काळामध्ये मी सी.एन.सी.च्या बंगल्यावर चार दिवस ड्यूटीला होतो. त्या ठिकाणी आमचे गार्ड होते. तेथे आर्मीचे कमांडर

रहायचे. माझी पहाऱ्याची जागा बंगल्याच्या मागे होती. रात्री रातराणीच्या फुलांचा सुगंध मनाला भुरळ घालायचा. मागे मोठी बाग होती. त्यामध्ये बागेत ससे बागडतांना दिसत. हा एक विरळाच अनुभव होता. त्यांना आमची भिती वाटत नसे. तेव्हा ते अगदी जवळ येऊन आमच्याकडे टकमक बघत राहायचे. तेथेच मला स्वातंत्र्याचा उपभोग प्राणी कसे घेतात याचा साक्षात्कार झाला. मी विचारात गढून गेलो. त्यावेळी आमचा देश पारतंत्र्यात होता. ब्रिटीशांच्या अंमलाखाली बुटाखाली जसा खडा चुरडावा तसा हिंदुस्थान चुरडला जात होता. दिल्लीतल्या या वातावरणात स्वातंत्र्याचे वारे वाहत होते. बाहेर आंदोलने होत होती. ते आम्हाला कळत होते. त्याचाशी आमचा सुतराम संबंध नव्हता. ब्रिटीशांची दोन पदरी नियमन करण्याचा होता. एक म्हणजे लढाऊ जवानांची आर्मी व दुसरे म्हणजे लोकल पोलीस. मिलिटरीचा उपयोग सहसा होत नव्हता. फक्त दहशत बसवण्यासाठी देशात निरनिराळ्या ठिकाणी त्यांचे कॅम्प होते. ब्रिटीशांकडून स्वतःच्या संरक्षणासाठीच तिचा वापर केला जात असे.

व्हाईस बंगल्यावर ड्युटीला असताना काही राजकीय नेते नजरेला पडायचे. ते केव्हा केव्हा या वास्तूत यायचे. त्यांचा खादीचा पेहराव या वास्तूत वावरणाऱ्या ब्रिटीश साम्राज्याच्या सुत्रधारांपुढे फिका वाटायचा. पण त्यात स्वदेशीची शान होती. साधारणतः वर्षभराचे माझे दिल्लीतले वास्तव्य फारच आल्हादकारक होते.

आमची बदली व्हाईसराय हाऊसमधून झाली आणि आम्ही आमच्या कॅम्पमध्ये परत आलो. पण वर्षभरातल्या आठवणी सुखद होत्या. त्यानंतर आम्हाला खेचर कंपनीत पाठविण्यात आले. तेथील वातावरण अत्यंत घाणेरडे

होते. अंगाला खरूज झाली. हॉस्पीटल मध्ये ठेवण्यात आले होते आणि तेही कोरांटीमध्ये. तेथून बरा होऊन आलो आणि परत माझ्याच कंपनीत येऊन दाखल झालो. त्यानंतर आमच्या कंपनीच्या ड्युटीज आर्मी स्टोअर्स, विमानतळ इत्यादी ठिकाणी लागत असत.

काही दिवसांनी मला वीस दिवसाची रजा देण्यात आली. मी परत घरी आलो. येतानाचा प्रवास मुंबई, हर्णे, गोवळकोट मार्गे बोटीने झाला. माझ्याबरोबर माझा मित्र बाळकृष्ण सावंत होता. त्याचे गाव चिवेली. सारा प्रवास आम्ही बरोबरीने केला. प्रवास छान झाला. खरेतर जाण्यायेण्यामध्येच सात-आठ दिवस निघून जात. उरलेले दहा-बारा दिवसच कुटुंबाबरोबर राहता येई. घरच्यांना खूप आनंद झाला. मी घरी आल्यामुळे वातावरण प्रसन्न झाले होते. अजूनही आमचे कुटुंब त्याच केंबळारी घरात राहात होते. पण घरी आईच्या हातच्या भाकऱ्या सुकट बोंबीलाबरोबर खाण्यात कमालीचा आनंद होता. तीन-चार दिवस गेले असतील, एक दिवस अचानक पावसाला सुरुवात झाली. पाऊस फारच पडत होता. वातावण अचानक बदलले होते. बाहेर पडण्याची सोय नव्हती आणि घरात वेळही जात नव्हता.

आणि एक दिवस अचानक तार आली. मला ताबडतोब माझ्या कमांडला येण्याचे कळविण्यात आले. एव्हढ्या लांबून रजेवर आलो होतो. चार सुखाचे दिवसही झाले नव्हते. तेव्हढ्यात हे असे परत जायचे, पण निघणे भाग होते. सरकारचा तसा हुकुम होता. आईला खूप दुःख झाले. दोन दिवसात निघायला हवे होते. एवढ्यात दुसऱ्याच दिवशी चिवेलीहून बाळकृष्ण सावंत घरी अचानक आला. त्यालाही तार आली होती. तो दिवस सावंत आमच्या

घरी होता व दुसऱ्या दिवशी आम्ही निघायचे ठरवले. निघतांना आईने आंबोळया करून दिल्या होत्या. कारण चारपाच दिवसांचा प्रवास होता. सावंताचे माझ्यावर फार प्रेम होते, अगदी जीवापाड. गोवळकोट, हर्णेमार्गेच आम्ही बोटीने मुंबईला आलो व तेथून पुढे रेल्वने मनमाड-झांसी, वडनेर मार्गे पुढे निघालो. मनमाडला येईपर्यंत आमच्या आंबोळया खराब झाल्या. चांगल्या होत्या त्या ठेवल्या बाकीच्या फेकून दिल्या. गाडीपुढे जात होती. एकदाचे आम्ही दिल्ली येथे पोहोचलो. गाड्यांचा गोंधळ होता. कनेक्शन्स मिळायला वेळ लागला.

दिल्लीत आमच्या कॅम्पवर पोहोचल्यावर आम्हाला तेथील वातावरण फारच विचित्र असे जाणवले. नेहमीची शांतता नव्हती. रात्रभर वाहनांचा खडखडाट चालू होता. सैन्याची संशयास्पद हालचाल चालू होती. आम्ही खरेतर तीन-चार दिवस आमच्या कॅम्पमध्ये लेट आलो होतो. रजेवर गेलेले सर्व लोक परत आले होते. आमच्या कंपनीला हिंदुस्थानच्या बाहेर लढाईवर जाण्याचा हुकुम आला होता. चार दिवसात येथून निघायचे होते. का? कशासाठी? कोठे जायचे? याचा उलगडा होत नव्हता. आम्ही आमच्या सामानाची बांधाबाध करायला सुरुवात केली. आम्हाला मुंबईला जायचे होते व तेथून पुढचा प्रवास बोटीने एडन या बंदरापर्यंत म्हणजे अफ्रिकेपर्यंत होता. अशी एकंदरीत आखणी करण्यात आल्याचे समजले.

निघताना आम्ही आमच्या कंपनीचा चार्ज दुसऱ्या कंपनीला दिला. मराठा इन्फ्रन्टीची पुरी पलटण निघण्यास सज्ज झाली. ट्रेनमध्ये शस्त्रास्त्रे दारुगोळा भरून घेण्यात आला व आम्ही मुंबईकडे निघालो. सामान -

सुमानाच्या मालगाड्यातून आमची वरात काढण्यात आली. सारी गैरसोय होती पण इलाज नव्हता. जेवण खाण्यापिण्याची आबाळ होती. कारण मालगाडीतला प्रवास होता. आम्ही एकदाचे मुंबईला पोहोचलो.

त्यावेळी मराठा इन्फ्रन्टीची थर्ड बटालीयन मुंबईला होती. त्यांनी आमची सारी व्यवस्था केली. आम्ही सारेजण कुलाब्याला मिलिटरी कॅम्पमध्ये आमचे ट्रक्स व चिलखती गाड्यांसह आलो. त्यावेळी दुपार झाली होती. थर्ड बटालीयनने आम्हाला दुपारचे जेवण दिले. आम्ही त्यांचे आभार मानले. त्या दिवशी सायंकाळी निघायचे होते. आम्ही सगळे सामान-सुमान तयार ठेवले. आम्हाला ऑफ्रिकेत लढाईवर जायचे होते.

## दुसऱ्या महायुद्धासाठी प्रयाण

त्या दिवशीच रात्री आमच्या चिलखती गाड्या, हत्यारे, ॲम्युनिशन व रेशनपाणी बोटीवर चढवण्यात आले. आफ्रिकेत जाऊन काय करायचे, कोणाशी लढायचे काहीच कल्पनी नव्हती. आम्ही हुकुमाचे ताबेदार होतो. पण युद्धावर जात आहोत, एवढी मात्र कल्पना होती. हा अनुभव आम्हा नव्या सैनिकांना नवाच होता. ब्रिटीशांच्या बाजूने, इटाली व जर्मनी या दोस्त राष्ट्रांशी आम्ही लढणार होतो. तेव्हा इंग्रजांच्या निरनिराळ्या ठिकाणी असलेल्या वसाहतींचे संरक्षण त्यांना करावयाचे होते आणि म्हणून आम्हाला ऑफ्रिकेत आणले होते. हिंदुस्थानमधून पुरेसे सैन्यबळ त्यांना उपलब्ध होणार होते. त्याचा वापर करुन जर्मन इटाली या दोस्त राष्ट्रांच्या सैनिकांपासून आपल्या वसाहतीचे संरक्षण त्यांना करावयाचे होते. त्या काळी ब्रिटीशांच्या साम्राज्यावर सूर्य कधीच मावळत नव्हता. जगाच्या कानाकोपऱ्यात ब्रिटीशांच्या वसाहती होत्या.

याच काळात हिंदुस्थानमध्ये स्वातंत्र्य लढ्याचे निशाण फडकवून देशभक्तांनी रान उठवले होते. त्यामुळे ब्रिटीश सत्ताही हादरून गेली होती.

गांधी, नेहरू, वल्लभभाई पटेल, सुभाषचंद्र बोस इत्यादींच्या नेतृत्वाखाली प्रखर लढा सुरू झाला होता. या हिंदुस्थानातील चळवळींना तोंड देणे. तसेच जर्मन-इटाली या दोस्त राष्ट्राच्या युद्धाला तोंड देणे अशा कैचीत ब्रिटीश सरकार सापडले होते. पण तरीही या सर्व प्राप्त परिस्थितीला तोंड देण्याची तयारी ब्रिटीश साम्राज्याने केली होती. याचसाठी येथील नेत्यांशी त्यांनी बोलणी सुरू केली होती व युद्धासाठी साऱ्या शक्तीनिशी ते सज्ज झाले होते.

## दुसऱ्या महायुद्धाला सुरवात

त्याच दिवशी सायंकाळी आम्हाला बोटीत बसवण्यात आले. बोट मुंबई बंदर सोडून लांब गेली. आम्ही एडनला जाणार होतो. बोटीतल्या लांबच्या प्रवासाचा हा पहिलाच अनुभव. खूपच हाल झाले. बरेच लोक उलट्यांनी हैराण झाले होते. बरेच लांब गेल्यावर बंदराचे दिवे दिसेनासे झाले. बोट चालत असतांना बोटीच्या सभोवताली मोठमोठाले मासे उड्या मारताना दिसत होते. असा नऊ दिवसांचा बोटीचा खडतर प्रवास करून एडन बंदरावर पोहोचलो. बोटीतून आमचे सामान उतरवून घेतले. गाड्या आल्या व बंदरापासून लांब असलेल्या कॅम्पमध्ये आम्ही तंबू उभारले. खाटा लावल्या. किट लावून झाले. त्या ठिकाणी आम्ही काही दिवस होतो. तेथून आम्हाला नव्या कॅम्पमध्ये हलवण्यात आले.

आम्ही अफ्रिकेला पोहोचल्यावर समजले की, आमचे मुख्य युद्ध क्षेत्र हे ऑफ्रिकेतच आहे. एका बाजूला इटाली-जर्मनी आणि काळ्यासमुद्राच्या अफ्रिकेच्या किनाऱ्यावर ब्रिटीशांच्या वसाहती होत्या. या प्रदेशावर जर्मनआणि इटालीच्या फौजांनी आक्रमण करून कब्जा करून नये यासाठी इंग्रज सरकारने ही पावले उचलली होती. आणि ती योग्यही होती. कारण इटाली आणि जर्मनीच्या फौजांनी ऑफ्रिकेच्या उत्तर बाजूने ब्रिटीश वसाहतींवर आक्रमण केले. त्यामुळे मजल-दरमजल करीत त्या फौजांना अटकाव करण्यासाठी आम्हाला वेगवेगळ्या बाजूंनी लढाईसाठी पुढे कूच करावे लागले.

तेथे गेल्यावर आम्हाला सारी कल्पना आली. हा प्रदेश तसा थोडा फार वाळवंटी, डोंगराळ, उष्ण हवामान यामुळे या प्रदेशात लढण्यासाठीचे सराव शिक्षण आम्हाला देण्यास सुरूवात झाली. आमच्या परेड, फायरींगचा सराव सुरू झाला. वाळवंटात तंबू बांधणे, चिलखती गाड्यांवर तोफा चढवणे व त्या कॅनव्हॉय सुरक्षितपणे पुढे घेऊन जाणे ह्यासारखी कामे करायला लागत, असं खडतर ट्रेनिंग आम्हाला देण्यात आले होते. उघड्या प्रदेशात शत्रूच्या विमानांना आमचे कॅम्प शोधणे सोपे जाई, म्हणून वेगवेगळया तंत्रांनी त्याची काळजी घेतली जाई.

जंगलात कॅम्प लावणे तसे कठीण जंगलातील हिंस्त्र प्राणी, साप, डास यामुळे तेथे राहणे फार कठिण. तेव्हा उघड्यावर कॅम्प्स लावत. रस्ते खूप कमी व अरुंद त्यामुळे हालचालीचा वेग मंदावे. ॲडव्हॉन्स करणे दुरापास्त होई. डोंगराळ प्रदेशात अवजड वाहने व तोफा चढवणे, तसेच वाहून नेणे खूप त्रासाचे झाले होते. आमची युद्धाची तयारी पूर्ण झाली होती. मराठी इन्फ्रन्ट्रीच्या पलटणी, गुरखा बटालियन ब्रिटीशांच्या गोऱ्या सैनिकांच्या फौजा व इंजिनियरींगचे युनिटस् येथे येऊन दाखल झाले होते. ऑफ्रिकेच्या आघाडीवर शत्रूला रोखण्याचे काम आमच्यावर सोपविण्यात आले होते.

एक दिवस इटालीची लढाऊ विमाने बॉम्ब टाकायला आल्यावर आम्ही त्याच्यावर तोफांचा मारा केला, पण तरीही त्यांनी पुढे जाऊन एडन बंदरात बॉम्ब टाकून बरेचसे नुकसान केले. युद्धाला सुरुवात झाली. काही दिवसांनी 'उझट' मध्ये मोर्चे केले. आम्हाला रात्री जागून ड्युटी करावी लागे. तारांचे कुंपण करून बोऱ्यांचे मोर्चे लावण्यात आले.

पहिल्या महायुद्धात मार खाल्लेल्या जर्मन-इटाली या दोस्त राष्ट्रांना आपल्या आपमानीत मनाचा डंख पुसून काढायचा होता. त्या जोमाने त्यांनी युद्धाची सारी तयारी केली होती. ब्रिटीश साम्राज्यातील सैनिकांपेक्षा अत्याधुनिक अशी शस्त्रास्त्रे त्यांनी सज्ज केली होती. त्यांची प्रगत युद्धनिती, त्याचा वापर सुरवातीपासून केल्याचा अनुभव आम्हाला पदोपदी आला.

एवढ्यात आम्हाला हुकूम आला की आम्ही सुदान ऑफ्रिकेला जायचे आहे. हा सारा प्रवास बोटीतून करायचा. त्याप्रमाणे आम्ही बोटीने लालसमुद्रातून निघालो. ते तिसऱ्या दिवशी सुदान बंदरात आलो. बोटीतून उतरून रेल्वेगाडीच्या उघड्या डब्यातून सुदानची राजधानी खार्रटूना येथे आलो. तेथे आम्ही आमचा कॅम्प लावला. रेशन आले ते उतरवून घेण्यात आले. सर्व ठीक झाल्यावर कुकंनी जेवण केले व आम्ही थोडावेळ आराम केला. नंतर मालगाडीत बसून खार्रटून शहराजवळच्या कॅम्पमध्ये गेलो. ब्रिटीश रेशन आले ते परत केले. आमचे रेशन आले, जेवणे झाली. चपात्या, भात, भाजी असे जेवण केले.

नंतर आम्हाला लढाईवर जाण्याचा हुकुम आला. सर्व सैनिकांच्या सशस्त्र गाड्या सुटल्या. आम्ही मजल दरमजल करीत जात होतो. वाटेत शहामृगांचे तांडे पहावयास मिळाले. अशाप्रकारे आगेकुच करत आम्ही निघालो ते 'भुटाना' ब्रिजच्या पुढे आम्ही मोर्चे तयार केले. दोन दिवसात सर्व ठिकठाक झाल्यावर, टॅन्क फोडण्याच्या गन बसविण्यात आल्या.

येथील परिसर फार सुंदर होता. नाईल नदी ब्रीजखालून जात होती. आणि ह्या नदीच्या पाण्यात मासे, मोठमोठ्या मगरी, पाणघोडे, पाणहत्ती बघायला मिळाले. काही दिवसांनी या ठिकाणी थर्ड फायु मराठा ही बटालियन आम्हाला येऊन जॉईन झाली. तिथे पेढांब्याचे दुधाजीराव शिंदे सुभेदार भेटले. तेव्हा ते नाईक होते. शिवाय आमच्या गावचे पांडुरंगराव रामाजीराव कदम व गोपाळराव कदम तेथे होते. त्यांचे मोर्चे आमच्या बाजूलाच लावले होते.

काही दिवसांनी आम्हाला पुढे जाण्याचा हुकूम मिळाला व आम्ही आमचा कॅम्प हलवला. रस्त्याने जात असताना हरणे, माकडे शहामृग दिसत. मजल दरमजल करीत आम्ही ओमा नगर या शहराजवळ आलो. तेथे रानातच आम्ही कॅम्प लावले. आमच्याबरोबर सामान, गन इत्यादी वहनासाठी खेचरे होती. हे सर्व त्यांच्यावर लोड करून आम्ही तयार होतो. रात्रीचे आठ वाजले होते. संध्याकाळी आम्ही थोडे चणे व काही फळे खाल्ली. आमचे खेचर सुटले व त्याच गडबडीत सर्व बाजूंनी आमच्यावर फायर सुरू झाला. हे फायरींग तासभर चालले.

ओमा नगरला दुश्मन होता. आम्हीही त्यांच्यावर प्रतिकारासाठी फायरींग केले. दुश्मनने तेथून मागे पळ काढला. आम्ही सकाळी पुढे निघालो. तेथे दुश्मनचे सर्व मोर्चे खाली झाले होते. त्यावेळी मी सिग्नल कमांडला होतो. त्या ठिकाणी मला पोमेंडीचे आबन्याबा शिर्के व शंकर यांची भेट झाली. मला सिग्नलमध्ये ठेवले होते. नदी किनाऱ्यावर ती जागा होती. तो नाईल नदीचा उगमाचा प्रदेश होता. मासे भारी. मासे धरायला खूप मजा वाटे. काही दिवसांनी पुढे पाठविले. एक दोन दिवसात आम्ही चरणच्या पहाडीजवळ पायथ्याला

आलो. वर दुश्मन होता व आम्ही खाली होतो. लहानसे टेपाड होते. त्यावर रात्र काढली. त्या रात्री शत्रूचे दोन गोरे सैनिक आम्ही पकडले व त्यांना कैद करून आमच्या रनर बरोबर पाठवून दिले. आम्ही उजाडल्यावर खाली मोकळ्या जागेत आलो. आम्ही सगळे सिग्नलचेच लोक होतो. आम्हाला हुकूम देण्यात आला की, दहा माणसांना घेऊन तुम्ही वर पर्वतावर चला. आम्ही सर्वजण निघालो. चार वाजता वर मध्यभागात आलो व पुढे चालत पाच वाजता एका कपारीमध्ये खड्डे खणून रहाण्याची व्यवस्था केली. समोरून सारखा तोफांचा मारा होत होता. त्यावेळी आमचा कमांडिंग ऑफिसर 'लाकीस्टर' हे होते. बरेच दिवस आम्ही आमचे सामान वर आणित होतो. खेचरावरून आम्हाला भाजीभाकरी पाठवली जाई. ती आम्ही सर्वजण वाटून खात असू.

शिमग्याच्या दिवशी आम्ही हल्ला करणार होतो. सर्व बाटालियन आदल्यादिवशीच वर आली. सकाळी सात वाजता आमच्या बटालियनने पाचमिनिटे अगोदर अॅडव्हान्स केला व तोफांचा गडगडाट चालू झाला. किती लोक त्यात मेले, जखमी झाले याची गणती नाही. चारपाचशे लोक युद्धात मेले. चार वाजेपर्यंत तोफा सारख्या फायर करीत होत्या. एक बाजू थर्ड-५ बटालियन, जाट बटालियन, कॅम्बरन गोरा पलटन आमचे फक्त १५० लोक जिवंत राहिले बाकी सारे मारले गेले.

काही दिवसांनी आमच्या उजव्या बाजूच्या पहाडावरून टँका हारमोर कॅरियरचा हमला झाला. आम्ही विरोध केला. तेव्हा शत्रूनी पळ काढला व त्यांनी सोमाली लॅन्ड मसावा येथून अस्मारा गाठला. ते पण त्यांच्या एकत्रित

असताना आम्ही अॅटॅक केला. एकत्रित पोहचलो. लगेच त्याना कैद करुन बोटीत बसवून भारतात पाठवून दिले. अशी अफ्रिकेची लढाई संपली.

तेथून पुढे आम्ही 'सुदान' येथून बोटीत बसून सुवेझ कालवा पार करुन कैरो इथे गेलो. पण त्या ठिकाणी झालेल्या सैनिकांच्या तुफान गर्दीमुळे आम्हाला 'मगझ' कॅम्प येथे पक्के मोर्चे तयार करण्यासाठी पाठवण्यात आले. तेथे आम्ही बोऱ्यागोणपाटाचे पुऱ्या एरियात मोर्चे लावले. मी कंपनीत सिग्नल मॅन होतो. आमचे कंपनी कमांडर मेजर अर्जुनराव पालांडे हे होते. भारी कडक शिस्तीचा माणूस. जास्त कोणाशी बोलत नसत. त्यांच्याबरोबर मी ड्युटीला होतो. एक दिवस बाहेर मोठा आवाज झाला धुराचे लोट दिसत होते. माईल्सचा बॉक्स उडाला. वीस माणसांचे तुकडे होऊन आकाशात उडाले. मोरवणे गावचे बाबु देसाई, मुलफडचे पहेलवान व दोन ऑफिसर त्यात मेले. काही चुकामुळे आमचे नुकसान झाले.

## सलूनच्या पहाडीची लढाई

एक दिवस आम्ही जंगल परेडसाठी आमची कंपनी गेली होती. इतक्यात दुश्मनांची विमाने आली. जमीन धरून खाली आम्ही झोपलो. दोन सेकंदामध्ये ती विमानतळावर बॉम्ब टाकून गेली. काही दिवस असेच गेले. तेथून आम्ही 'सलून' पर्यंत जाण्यास निघालो. सर्व लोक निघालो. मागे कुणाला ठेवले काही समजले नाही. आम्ही मसरा-मजरू कॅम्पसोडून पुढे चालायला सुरवात केली. असेच बरेच दिवस चालल्यावर पाय सुजले. नंतर आम्ही सलून पहाडीजवळ आलो. त्या ठिकाणी रात्र काढली. सकाळी अंधारात ॲडव्हान्स केले. सलूनची पहाडी पुढे चाललो. इतक्यात शत्रूचा फायर सुरू झाला. त्यात आमचे बरेच लोक जखमी झाले. आमचे हवालदार ही त्यात होते. त्यांना शिल्टा लागला. पण त्यात त्यांचा अंत झाला. भोसले हवालदार आणि मी वर पहाडावर होतो. दोन गोरे सैनिक आम्हाला पाहून परत गेले. सर्व पाहून परत गेले. काही वेळाने विमाने आली. आमची व इटलीच्या आर्मीची खूप झुंज झाली. काही विमाने जळून खाली पडली. आमच्या टॅंक्स झुंज देत होत्या. पण काही उपयोग झाला नाही. त्या तुटून पडल्या. माईन्स मुळे. तो दिवस तसाच गेला. रात्र तेथेच काढली. सकाळी आम्ही रिटर्न झालो. ते थेट भगसपर्यंत. बरेच लोक मेले. अख्खा दिवस मागे येत होतो. भगस कॅम्पला रिपोर्ट केला. नंतर काही दिवस गेले.

एक दिवस सकाळी बटालियन पुढे जाण्याच्या इराद्याने गाड्या भरल्या. आमच्या बरोबर क्यामुरन होती, जाट बटालियन होती. काही टैंक होत्या.

सायप्रसमेन आम्ही पुरा ब्रिगेड 'तिनीमिली'ला गेलो. मजल दरमजल करत निघालो. पुढे जर्मन सैन्याचे मोर्चे होते. थोड्या वेळाने आम्ही मोर्चावर अॅटक केला. त्यावेळी आमचे कमांडिंग ऑफिसर मेजर अर्जुनराव पालांडे कॅरीयरवर उभे होते. शत्रूच्या हल्ल्याने त्यांच्या छातीत गोळया गेल्या व त्यात त्यांचा मृत्यु झाला. त्यांना त्याच ठिकाणी दफन करण्यात आले. त्यांचे मामा बापूजीराव याना फार दुःख झाले. काही वेळाने जर्मन टँकनी पुन्हा हमला केला. तोफेचे लाल-लाल गोळे आमच्यावर सोडले. ते तोफेचे गोळे टप्पे खात पुढे जात व फुटत. आम्ही तेथून पळ काढला. व सगळी बटालियन घेऊन 'देऊकेअर'कडे आलो. कोसर साहेब बोंबलत होता. तुम क्यों जगह छोडके आया? त्या टैंक तिथूनच फायरींग करत होत्या. संध्याकाळचे आठ वाजायला आले होते. ती रात्र त्याच ठिकाणी काढली. सकाळी आठ वाजता वीस-एक जर्मन फायटर विमाने आली व त्याचवेळी त्यांनी आमच्या लोकांवर ग्रेनेड बॉम्ब टाकले व दहा मिनिटात निघून गेले. यात आमचे फार नुकसान झाले.

आम्ही अॅडव्हान्स झालो. शत्रू पुढे आम्ही मागे. असे दुपारपर्यंत चालले होते. नंतर त्यांची आमची टक्कर बार्सीगावा पुढे झाली. दुसरे दिवस त्यांनी आम्हाला मागे पळविले. त्या दरम्यान त्यांचा आमचा एकदोन ठिकाणी सामना झाला तो उजाडेपर्यंत. त्या पाडावानंतर आम्ही थेट टबरुकला आलो. त्या दिवशी जर्मन विमाने आकाशातून आमच्यावर बॉम्ब व तोफा व मशिनगन्सचा मारा करीत होत्या. रस्त्यात एक मोठा नाला होता तो पार करीत आम्ही शत्रूचा पाठलाग केला. आम्ही बार्सीला आलो. तेथे पाऊस पडत होता. तेवढ्यात परत

जर्मनच्या विमानानी आमच्यावर मारा केला. खूप बॉम्ब टाकले त्यात आमच्या कंपनीचा एक सैनिक मेला. बाकी कॅनव्हाय मागे कोठे राहिली कळले नाही. आम्ही मात्र बार्सीला येथे आलो. त्या ठिकाणी आम्ही तो दिवस थांबलो.

दुसऱ्या दिवशी आमची फलटन 'बेंगाझी'ला काही वेळासाठी थांबली व तेथून आम्ही परत मागे आलो. बेंगाझीहून परत येताना आमच्यावर परत जर्मन फौजांनी मारा केला. आमच्याही तोफा आग ओकत होत्या. मोठी धुमश्चक्री झाली. आम्ही तेथून माघार घेतली. ते मागे थेट गटेनापर्यंत. गटेना येथे आमची फार मोठी पंचाईत झाली. जर्मन फौजानी आमचे राशन व इतर सर्व पुरवठे कापले होते. आमची रसद तोडण्यात आली होती. फार हाल झाले. एक दिवस आमचा कर्नल काकशेस त्यांनी खूप बडबड केली. आमच्या कंपनीचे कॅप्टन हे देवासच्या घराण्याचे राजकुमार होते. तो त्यांना उद्देशून म्हणाला, "तुम इंडियन लोक पेट के वास्ते यहाँ आया है." हे ऐकून माझ्या तळपायाची आग मस्तकाला पोहोचली. भरलेली रायफल त्याच्यावर डागावी असा विचार क्षणभर मनाला चाटून गेला. अशा अपमानीत अवस्थेत आमचे काय हाल झाले असतील ते आमचे आम्हालाच माहित. हिंदुस्थानातून ब्रिटीशांनी आम्हाला आणले ते त्यांच्यावर आलेल्या जर्मन-इटालीच्या संकटातून बाहेर काढण्यासाठी. आम्ही प्राण पणाने लढत होतो. कामात कोणतीही ढिलाई करत नव्हते. पण तो प्रदेश ओसाड व वाळवंटाचा प्रदेश आम्हाला नवीन होता. शिवाय अत्यंत प्रतिकूल होता. आम्हा हजारोंच्या संख्येने आलेल्या सैनिकांपैकी बरेचशे लोक युद्धात मारले गेले. काही जखमी झाले. काही कायम जायबंदी झाले. आम्ही जे काही

चांगल्या अवस्थेत होतो. त्यांना या आघाडीवरून त्या आघाडीवर सतत पाठवत होते. या भागात ब्रिटीशांच्या गोऱ्या फलटनी होत्या पण त्यांना आघाडीवर लढावयास पाठविले नाही. प्रत्येक ठिकाणी आमचाच बळी दिला जात होता. या लढाईत आम्ही काही लढाया जिंकल्या, काही हरलो. पण विजय हा नेहमीच मिळेल असे होत नव्हते. विजयाचे कौतुक तर राहोच पण थोड्याशा माघारीनीही या ब्रिटीश कर्नलचा आमच्यावर आकस सतत जाणवत होता. कॅप्टन दर्जाच्या ऑफिसरची तर फारच पंचाईत होती. कारण त्याचा संबंध सतत वरच्या ऑफिसरशी प्रत्यक्ष येत होता. ऑफ्रिकेतल्या सगळ्या युद्धात ब्रिटीशांनी कोणतेही व्यवस्थित युद्ध धोरण राबविले नाही. आमच्या सैन्याला हवाई संरक्षण नव्हते, पराभवाचे हेही मुख्य कारण असू शकते. एकतर आफ्रिकेचा प्रदेश फार मोठा होता. एवढ्या मोठ्या प्रदेशावर अंमल करणे कठिण होते. ब्रिटीशांनी समुद्रमार्गे येणाऱ्या जर्मन इटालियन सैन्याला प्रतिकाराचीच भूमिका घेतली. जर्मन-इटालियन सैन्याने तेथे पाय रोवले. त्यांना ब्रिटीशांच्या तुटपुंज्या सैन्याला हुसकावणे अशक्यच होते.

## टब्रुकचा लढा

गटेना येथून आमचे उरलेले सगळे सैन्य "टनुक" येथे आणण्यात आले. आमच्याच बटालियनची डिफेन्स साठी त्या ठिकाणी व्यवस्था करण्यात आली होती. आम्ही त्या ठिकाणी चांगले खोलवर खंदक खणले होते. सर्वत्र मोर्चे लावले होते. नेहमीप्रमाणे कॅम्पला तारेचे मजबूत कुंपण करून घेतले होते. संरक्षणाची उत्तम व्यवस्था केली होती. त्या ठिकाणी रेकॉर्डस ऑफिस व इतर स्टोअर रुम होते. आमच्या कंपनीचा कॅप्टन हरग्युज हा होता. या ठिकाणी आम्ही घेऊन काही दिवस झाले. आमच्या या कॅम्पची व्यवस्था संरक्षणाच्या दृष्टीने उत्तम होती. जमिनीखाली खंदक खणले होते. त्यात आमचे ॲम्युनिशनचे साठे तसेच वायरलेस सेट होते. या ठिकाणाहून आमचा इतर बटालियनशी संपर्क होता. मी त्यावेळी वायरलेस सेटवर काम करित होतो.

एक दिवस सकाळची वेळ होती. सकाळी सात वाजता मी शौच्यासाठी बाहेर पडलो. सगळे सामसूम होते. सकाळची वेळ असल्यामुळे व आमचे हे, हेडक्वॉर्टर्स असल्यामुळे युद्धाच्या दृष्टीने तशी तयारीच नव्हती. आमचा डिफेन्स मात्र तयार होता. वेळ आली तर तोंड देण्याची आमची तयारी होती. तर आमच्या तारांच्या कुंपणाच्या पलिकडे एक मैल दिड मैल अंतरावर मोठी फौज दिसली. मला थोडा संशय आला. म्हणून मी ताबडतोब परत आलो. सुभेदार निकम यांना रिपोर्ट केला. त्यांनी कंपनी कमांडरला सांगितले. कंपनी कमांडरनी हेडक्वॉर्टरला रिपोर्ट केला. त्यावेळी आमचा हेडक्वॉर्टरचा कमांडिंग ऑफिसर लकिस्टर हा होता. त्यांनी सांगितले की, ते आपली सैन्य आहे, घाबरण्याचे काहीही कारण नाही. पण अर्ध्या तासाने माझा संशय खरा ठरला. कारण शत्रूच्या

टैंक आमच्या तारेच्या कुंपणापर्यंत आल्या. त्या अजस्त्र टँका कुंपण तोडून आत घुसल्या व आमच्या कॅम्पवर तुफानी हल्ला सुरू केला. चोहोबाजूने आमच्यावर फायर चालू होते. हॅन्ड ग्रॅनेड व हातबॉम्बचा वापर केला जात होता. आमच्या सैन्याला त्यांना प्रतिकार करण्याची उसंतच मिळाली नाही. आम्ही तेव्हा खंदकात घुसलो. एवढ्या जवळून होणाऱ्या भयानक फायरला प्रत्युत्तर झाले पण ते मामुली.

जर्मन-इटालियन टैंक त्यावेळी हवाई संरक्षण होते. त्याचवेळी त्यांची चाळीस विमाने आली, आणि त्यांनी आमचा कॅम्प बेचिराख करून टाकला. चारीबाजूने सतत फायर होत होता. त्यावेळी खंदकात आम्ही सुरक्षित होतो. माझ्याबरोबर आणखी दहा-पंधराजण होते. आमचे सुभेदार निकम यांनी शेवटी शरण जाण्याचा निर्णय घेतला. तसा हुकुम सोडला व मला आदेश दिला. मी तयार झालो. एवढ्या होणाऱ्या फायरमधून वर जाणे धोक्याचे होते. जीवावर बेतणारे होते. मी वायरलेस सेटला लाथ मारून तो तोडला व त्याच्या काड्या काढून त्यांना सफेद कपडा गुंडाळला व शिडीने वर चढून बाहेर आलो व ते निशाण हात वर करून टँकातून फायर करणाऱ्या ऑफिसरला दाखविले. ते पाहताच तो बाहेर आला व त्याने ग्रेन्डेड फायर करणाऱ्या फायरमनला हातानेच इशारा केला व फायर थांबवले. तो म्हणाला, "रॉडस् ग्रीप गेफार्म" फायर थांबला. मी वरून सगळ्यांना इशारा केला व वर घेण्यास सांगितले. आपापले रेणकोट, कांबळी घेऊन व हत्यारे आहेत त्याच जागेत ठेवून वर येण्याचा इशारा केला. सारे वर आले. मी मग खाली जाऊन माझे सामान घेऊन वर आलो. मी वर येण्यापूर्वीच आमच्या सर्व सैन्यासह आमचे हेडक्वार्टर कमांडिंग ऑफिस लकिस्टारला कैद केले गेले होते. सारा कॅम्प उद्धवस्त झाला होता. आमचे जे सामान होते ते हाताशी लागले नाही. आमची सगळी शस्त्रे तेथेच टाकून दिली होती.

## जर्मन-इटलि यांचे युद्ध कैदी

आम्हाला कैद करून जर्मन फौजानी टबरुक बंदरावर आणले. त्याच ठिकाणी गुरखा बाटलियनचे दोन-तीनशे लोक कैद करून ठेवले होते. आता कैदी झालो म्हणजे आता सगळे संपले. कैदी म्हणून जगावे लागेल. हालअपेष्टांना तोंड द्यावे लागेल त्यापेक्षा चान्स मिळाला की, येथून पळून जावे व आपल्या दुसऱ्या कमांडला जाऊन मिळावे. असा विचार मनात आला व त्यानुसार आम्ही सगळयांनी तसा बेत आखला. हातात हत्यार नव्हते. त्या ठिकाणी पहाराही ढिला पडला होता. पण हा बेत तेथे असलेल्या गुरखा कमांडच्या एका ऑफिसरमुळे फसला. रात्रभर आम्हाला त्या ठिकाणी झोप नव्हती. आम्ही सगळे उघड्यावरच होतो. आमचे साऱ्या बाजूने कम्युनिकेशन तुटले होते. काय करावे कळत नव्हते. लढताना मरण बरे पण कैदी म्हणून जगणे लाजिरवाणे ठरणार होते. मनाला अत्यंत दुःख झाले. नाईलाज होता. पुढे काय वाढून ठेवले याची कल्पनाही नव्हती.

सकाळी आम्हाला तीन-तीनच्या रांगेत उभे करण्यात आले व चालवत बाजूच्या एका विमानतळावर आणून सोडले. त्या ठिकाणी आमच्या बरोबर जर्मनीचे शिपाई आमच्या पहाऱ्यावर होते. नंतर मोकळ्या जागी सर्वांना बसविण्यात आले. उन्ह फार होतं. उकडत होतं. प्यायला पाणी देखील नव्हते. संध्याकाळपर्यंत आम्हाला त्याच अवस्थेत बसवून ठेवण्यात आले.

आम्ही त्या ठिकाणी असताना आणखी बरेच कैदी आणण्यात आले. आम्ही सगळे मिळून हजारोंच्या संख्येत असू. पाण्याचा पत्ता नव्हता, अन्नाचा कणही नव्हता, अशा दारूण अवस्थेत आम्हाला ठेवण्यात आले होते.

तेवढ्यात पाण्याचा एक टँकर आला. सगळेच्या सगळे लोक त्या टँकरकडे धावले, पण कोणालाही पाणी देण्यात आले. मग आमचे ग्रुप करून, ग्रुप वार पाण्याचे कॅन्स आणून दिले. त्यांनी पाण्याचे ड्रम्स मागविले होते व ते भरून आम्हाला दिले. पण अन्नाचा कणही दिला नव्हता. त्याच दिवशी आम्हाला थर्ड मराठाचे कैदी येऊन मिळाले, त्यांना कैद करून आमच्याबरोबर ठेवण्यात आले.

आम्हाला इटालीयन सेनेच्या हवाली करण्यात आले होते. त्यांनी आम्हाला संध्याकाळी त्यांच्याजवळची बिस्किटे व थोडी भारतीय बिस्किटे दिली. थोडी भूक भागविली गेली. आठ दिवस आम्ही त्या ठिकाणी होतो.

चारी बाजूने जर्मन सैन्याचा पहारा होता. काही इटालियन ऑफिसर्स व सैनिक त्या ठिकाणी आले होते. त्यांच्या काहीतरी विचित्र हालचाली चालल्या होत्या. काही मसलती चालल्या होत्या. काही भारतीय लोकही त्यांच्याबरोबर वावरताना दिसत होते पण ते सैनिकी पोशाखात नव्हते.

## आझाद हिंद सेनेतील आमचा प्रवेश

आम्हा सर्व हिंदुस्थानी युद्ध कैद्यांसमोर एक प्रस्ताव ठेवण्यात आला. एकतर जर्मन, इटालीचे कैदी म्हणून रहा किंवा आझाद हिंद सेनेत सामील व्हा. तुम्ही स्वतंत्र व्हाल आणि आपल्या देशासाठी ब्रिटीश साम्राज्याच्या विरोधात लढू शकाल. देश स्वतंत्र होईल. स्वातंत्र्य सैनिक म्हणून मिरवाल. आमच्या कमांडच्या सर्व कैदी सैनिकांनी तो प्रस्ताव मान्य केला व आमच्या नावाच्या याद्या बनवून दिल्या. मला खूप आनंद झाला. गेले आठ दिवस डोक्यावर असलेले दडपण एकदम उतरले होते. अगदी आझाद झाल्यासारखे वाटत होते. त्या दडपणातून आम्ही मुक्त झालो होतो. सुभाषचंद्र बोस यांचा एक असिस्टंट जो आझाद हिंद सेनेचा तिथला मुख्य होता व दुसरा एक चक्रवर्ती नावाचा ऑफिसर होता तो मद्रासी होता. त्यांनी आम्हाला आझाद हिंद सेनेत का भरती व्हायचे व आपण काय करायचे आहे याची कल्पना दिली. त्या वर्षी जर्मनमध्ये सुभाषचंद्र बोस येऊन गेले होते. हिटलर व मुसोलीनी यांनी सुभाषचंद्र बाबूंच्या आझाद हिंद सेना स्थापन करण्याच्या प्रस्तावाला दुजोरा दिला व सर्वतोपरी मदत करण्याचे मान्य केले. आझाद हिंद सेनेची स्थापना सुभाषबाबूंनी तेथेच केली व हिंदुस्थानमध्ये देखील मोठ्या प्रमाणात निवृत्त झालेले ऑफिसर्स व सैनिक सुभाषबाबूंच्या आझाद हिंद सेनेत भर्ती होण्यास तयार झाले.

जपानमध्येही सुभाष बाबू जाऊन आले. तेथे जपान्यांनी कैद केलेले ब्रिटीश सैन्य आझाद हिंद सेनेत सामील झाले. अशातऱ्हेने हिंदुस्थानाबाहेर

आझाद हिंद सेनेची बांधणी झाली. त्यात स्त्रिया देखील सामील होत्या. कॅप्टन लक्ष्मीबाई या त्यांच्या प्रमुख होत्या. या सैन्याला हत्यारे दारूगोळा तसेच उत्तम शिक्षण देण्याचे जर्मन-इटाली व जपानने मान्य केले. शिवाय आर्थिक साहाय्य ही देण्याचे कबूल केले.

येथपर्यंत युद्ध चालू होऊन साधारणतः दीड वर्ष होऊन गेले होते. सगळ्या आघाड्यांवर युद्धाला तोंड फुटले होतो. युरोपात ब्रिटीश फ्रेंच यांच्या फौजा जर्मन सैन्याशी टक्कर देत होत्या. इंग्रजांचे सैन्य जगभर या युद्धात उतरले होते. युद्धाचा निकाल लवकर लागेल असे काही दिसत नव्हते. जर्मन व इटालियन सैन्याची तयारी खूप चांगली होती. त्यांच्याकडे विमाने व अत्याधुनिक अशी युद्ध सामग्री होती. त्यांनी इंग्रज व फ्रेंच सैन्याला जेरीस आणले होते. त्या काळात फ्रान्सच्या भूमीवर युद्ध चालू होते. फ्रान्सचा बराचसा भाग जर्मनीने पादाक्रांत केला होता. फ्रान्सला जिंकून मग ब्रिटीशांचा पराभव त्यांच्याच भूमीवर त्यांना करावयाचा होता.

हिंदुस्थानमधील अंतर्गत परिस्थिती अत्यंत स्फोटक होती. स्वातंत्र्य चळवळीला जोर आला होता. त्यात आता आझाद हिंद सेनेची स्थापना. ब्रिटीशांनी या घटनेचा फार मोठा धसका घेतला. ब्रिटीशांची बहुतांश फौज आफ्रिका व पूर्वेकडील आघाड्यांवर लढत होती. अशा परिस्थितीचा फायदा आझाद हिंद सेनेने घ्यावा अशी सुभाषचंद्र बोस यांची मनिषा होती. त्यानुसार त्यांची तयारी चालू होती.

आमचा अंतर्भाव आझाद हिंद सेनेत झाल्यावर आम्हाला तेथे उत्तम ट्रेनिंग दिले जाणार होते व ब्रिटीश सरकारच्या विरोधात लढण्यास पाठविले जाणार होते. मला याचा खूप आनंद झाला. माझ्या मायभूमीसाठी आपण काही तरी करू अशी भावना मनात निर्माण झाली. आझाद हिंद सेनेत भरती होण्यापूर्वी आठ दिवसाच्या अनुभवातून स्वातंत्र्य आणि पारतंत्र्य ह्यातील फरक अनुभवण्यास मिळाला. आज आम्ही स्वतंत्र आहोत. जर्मन-इटालीने कैद केलेले बहुतांशी सैनिक आझाद हिंद सेनेत सामील झाले. त्या ठिकाणी आम्ही आझाद हिंद सेनेचे रितसर सैनिक म्हणून रिकुट झालो आमचे ट्रेनिंग इटालीमध्ये चालू झाले.

## इटालीमधले आझाद हिंद सेनेतील दिवस

आम्ही आझाद हिंद सेनेचे सैनिक म्हणून सामील झाल्यावर आम्हाला पुढील ट्रेनिंगसाठी इटालीमध्ये पाठविण्याचे ठरले. त्याप्रमाणे आम्हाला 'बॅगाझी' येथे आणण्यात आले. तेथे काही दिवस ठेवून बोटीने इटालीच्या बंदरात आणले. सगळा प्रवास तीन दिवस चालला होता. तेथून ट्रेनमध्ये घालून आम्हाला रोम शहराच्या जवळ ट्रेनिंग कॅम्पमध्ये आणण्यात आले.

तेथील कॅम्पमध्ये येताच आम्हाला इंडियन पार्सल दिली. त्यात बिस्किटे व इतर सामान होते. त्यानंतर इटालियन पातळ जेवण देण्यात आले, त्यामध्ये मक्रूनी, एक पाव व शिजलेले बटाटे इत्यादींचा अंतर्भाव होता. जेवण झाल्यावर बऱ्याच दिवसांनी खाटेवर पडलो. याठिकाणी मी आझाद होतो. इटालियन नागरिकांप्रमाणे आम्हाला चांगली वागणूक देण्यात येत होती. रोमच्या या कॅम्पमध्ये आम्ही जवळजवळ चारशे लोक होतो. त्यात सर्व जातीधर्माचे लोक होते. मुसलमान, मराठा, हिंदु, मद्रासी, बंगाली, पठाण, त्यामध्ये हिंदुस्थानातील ब्रिटीश आर्मीच्या पायदळ, पॅराशूट इत्यादी बटालियनचे सर्व सैनिक ट्रेनिंगला आणले होते.

रोमजवळच्या या कॅम्पमध्ये आमचे ट्रेनिंग सुरू झाले. इटालियन भाषेमधले सगळे आदेश शिकवले गेले. तेथे इंग्रजी भाषाही शिकवली गेली तसेच इटालियन भाषाही कामचलावू समजू लागली. इटालीयन भाषेत

सावधानला 'आततातीं' व विश्रामला 'रोपाजे' असे उच्चार करीत असत. या ट्रेनिंग काळात सुभाषबाबूंचे असिस्टंट एक मुसलमान गृहस्थ होते. ते सतत येत असत. शिवाय आमचे इन्चार्ज श्री. चक्रवर्ती हेही आमच्याबरोबर असत. पाचसहा महिने हे ट्रेनिंग चालू होते. त्यात आम्हाला युद्धाचे उत्तम शिक्षण दिले गेले. उत्तम हत्यारे चालवण्याचे ज्ञान मिळाले. ब्रिटीश आर्मीपेक्षा जर्मन ईटालीची ही हत्यारे उत्तम व अत्याधुनिक होती. त्यांचा माराही लांबचा व अचूक होता. ही हत्यारे वापरताना खूप बरे वाटले. आम्हाला या सहा महिन्याच्या ट्रेनिंग पिरियडमध्ये पगारही मिळत होता. खाणेपिणेही उत्तम होते. हा काळ उत्तम होता. या काळात इटालीच्या इतर भागातही आम्ही फिरून आलो. मुसोलीनी वाडा आम्हाला दाखविण्यात आला. तो प्रशस्त होता. त्याचा दरबार दाखविण्यात आला. ट्रेनिंग संपल्यानंतर आम्हाला फायर परेडसाठी एका पहाडावर नेण्यात आले. हा फायर प्रोग्रॅम दोन दिवस चालला होता.

## पुन्हा कैदी

फायरींगहून आल्यानंतर चार दिवस मजेत गेले. एवढ्यात इटालियन ऑफिसर्सचे हुकूम आले. आम्हाला सगळ्यांना लिबियाला घेऊन जाण्यास सांगण्यात आले. आमच्यामध्ये प्रचंड गडबड झाली. आम्हाला ज्या बॉर्डरवर नेण्यात येणार होते. त्याच बॉर्डरवर ब्रिटीशांच्या वतीने हिंदुस्थानी आर्मीतील मराठा लाईट इंन्फंट्री बटालीयन्सचे, पर्यायाने आमचेच लोक होते. आम्ही तेथे जाण्यास व त्यांच्या विरोधात लढण्यास नकार दिला. बस्स! पुढच्या पाचच मिनिटात आमचे स्वातंत्र्य हिरावून घेण्यात आले. मुसोलीनी भयानक संतापला. आम्हाला ताबडतोब कैद करण्याचा हुकूम दिला. आमच्या सर्व सवलती बंद करण्यात आल्या. आमचे बाहेर जाणे येणे बंद करण्यात आले. राशन कमी झाले आणि होतो त्याच ठिकाणी आम्हाला स्थानबद्ध करण्यात आले. तेथे आम्ही जवळजवळ पाचशे कैदी होतो.

आम्हाला युद्धामध्ये ज्या ठिकाणी बंदी करून आणण्यात आले होते, त्या लिबियात पाठवण्याचा निर्णय आम्हाला रुचला नाही. हे इटालियन सरकार आपल्या फायद्यासाठी आम्हाला बळी देत आहे अशीच आमची भावना झाली. या काळात इटालीची बऱ्याचश्या आघाड्यांवर पिछेहाट झाली होती. जर्मनीने रशियामध्ये बराच मार खाल्ला होता. त्यांनी आपल्या फौजा आफ्रिकेतून काढून फ्रान्स व रशियामध्ये पाठविल्या होत्या. तेथे तुंबळ रणकंद चालू होते आणि म्हणून ती जागा आम्ही घ्यावी, असा मुसोलीनीचा डाव आम्ही ओळखला व

आमच्या नकाराने आम्ही पुन्हा कैदी झालो. आम्हाला जर्मनीच्या ताब्यात देण्यात आले. कारण आम्ही पूर्वी जर्मनीचे कैदी होतो.

चार दिवसानंतर आम्हा सर्वांना 'उदीना' या मिलिटरी कॅम्पमध्ये आणण्यात आले. त्या ठिकाणी हजारो कैदी होते, गोरे होते, ऑस्ट्रीया न्युझिलंड येथूनही कैदी आले होते. हिंदुस्थानी कैद्यांचे कॅम्प वेगळे होते. आम्ही हजारो सैनिक असल्याने फारच गैरसोय होती. जेवणात नेमकेच सकाळी मक्रुनी देत एखादा पाव दिला तर दिला. अशी अर्धपोटी ठेऊन आमचे हाल चालले होते. संध्याकाळी फक्त मक्रुनी असा पातळ पदार्थ देत. आमच्या पुढाऱ्यांना मात्र पक्क्या कैदेत ठेवले होते. जेमसाहेब, एक बंगाली असे चार लोक पक्क्या कैदेत होते. आम्ही जवळ जवळ एक वर्ष या कैदेत होतो. या ठिकाणी मी एक डब्याची पेटी बनवली होती. त्यामध्ये माझे सामान पार्सल्स व इतर वस्तू ठेवत असे. एक वर्षाचा हा काळ हालअपेष्टेत गेला. अगदी उनपावसाच्या खेळासारखे हे जीवन वाटत होते. स्वातंत्र्य आणि पारतंत्र्य यातील फरक येथे अनुभवावयास मिळाला.

जर्मन व इटालियन आर्मीची पिछेहाट सर्व आघाड्यांवर चालू होती. सिसिली इंग्रजांनी घेतली. एकदम गडबड उडाली. इंग्रजांच्या फौजा इटालीच्या दारात येऊन उभ्या राहिल्या. त्यावेळी आम्हाला इटालीच्या बॉर्डरवरून जर्मनीने ऑस्ट्रियामध्ये नेऊन ठेवलं. आम्हाला रेल्वेने नेण्यात आले व एका कॅम्पमध्ये ठेवण्यात आले. त्या ठिकाणी आम्ही आठ दिवस होतो. तेथून आम्हाला 'आनानु' येथे नेण्यात आले. त्या ठिकाणी आम्हाला एक महिना ठेवण्यात आले.

काही दिवसांनी तेथून 'लिंबर्ग' येथे हलवण्यात आले. आमची व्यवस्था चांगली होती. आम्हाला ठिकठिकाणी आझाद हिंद सेनेचे लोक भेटायला येत. आमची मने वळविण्याचा प्रयत्न करीत असत. या ठिकाणचे दिवस थोडेफार बरे गेले. मागच्या एका वर्षाचा भयानक अनुभव येथे नव्हता. आमच्या शेजारच्या कॅम्पमध्ये रशियन कैदी होते. जर्मन लोक रशियन कैद्यांना अगदी भयानक वागणूक देत. त्यांचे खाण्यापिण्याचे हाल करत. त्याना अर्धपोटी ठेवत व कडक शासनामुळे त्यांच्या हाडांचे सापळे झाले होते. त्यात कित्येक मेले. त्यांचे हाल पहावत नव्हते. जेवायला आम्हाला गंजी देत. काळ्यापावाचे तुकडे देत. जेमतेम पोट भरे. पण रशियन कैद्यांना तेही मिळत नसे. आम्ही आमच्यातले उरले सुरले त्यांना देत असू. आम्हाला त्यांची फार दया यायची.

## अखंड नामस्मरणाचा प्रताप

काही दिवसांनी आम्हाला 'स्टारबर्ग' येथील कॅम्पमध्ये ठेवण्यात आले होते. दिवाळीचे दिवस होते. आम्हाला गोड पदार्थ दिल्याचे चांगले आठवते. ऑस्ट्रीयाचा पराभव होत असताना आम्हाला एका भुयारी किल्ल्यात ठेवण्यात आले होते. ऑस्ट्रीयाचा पाडाव झाला. व आम्हाला रेल्वे गाडीतून 'एपिनॉल' येथे आणण्यात आले. तेथे एक मिलिटरीचा कॅम्प होता. त्यावेळी फ्रान्स हा जवळ जवळ जर्मनीच्या ताब्यात होता. पण जर्मनीच्या रशियात होणाऱ्या खोलवर चढाईमुळे इकडे थोडी ढिलाई झाली. त्यावेळी ब्रिटीश आर्मीने मुख्यतः विमान दलाने सतत बॉम्ब हल्ले चालू ठेवले होते. त्यांना तोंड देताना जर्मन सैन्य मेटाकुटीला आले होते.

एपिनॉल कॅम्पजवळ एक डोंगर होता. त्याचे नाव 'कॅन्फर्न' असे होते. त्याच नावाचा एक फोर्ट जवळ होता. एपिनॉल येथे आम्हाला आणण्याआधी बर्फ पडून गेला होता. म्हणजे थंडीचा सिझन संपून नुकताच उन्हाळा सुरू झाला होता. तिकडे ऊन असे असते जसे आपल्याकडे थंडीत जाणवते तसे. तेथे सहा महिने उन्हाळा व सहा महिने हिवाळा होता. आम्हाला अशा हवामानाची सवय नव्हती. पण आम्हाला पुरेसे गरम कपडे दिले होते. त्यावर सारे निभावले.

एपिनॉल हा कॅम्प म्हणजे एखाद्या किल्ल्यासारखा मजबूत व भव्य होता. त्यात हजारो सैनिक ठेवण्यात आले होते. आम्ही हिंदुस्थान-मध्यल्या आर्मीचे

हे सारे सैनिक होतो. या ठिकाणी आमच्या आझाद हिंद ग्रुपमधले सगळे कैदी आले होते. येथील व्यवस्था तशी चांगली होती. मी केलेली पेटी माझ्याबरोबर अजून होती. या किल्ल्याच्या भिंती भव्य व मजबूत होत्या. एक दिवस सकाळी भयानक संकट समोर आले. सगळ्या शहराला इंग्रजांच्या विमानाने वेढले. शेकडो विमानांचा तांडाच्या तांडा आला. सकाळी आकाशात झेपावला आणि आकाश झाकून गेले. पहिले एक फायटर खाली आले त्यांनी हिरवा लाईट टाकला व पाठोपाठ मोठ्या विमानांनी भयानक बॉम्बे फेक केली. ही भयानक बॉम्बफेक सतत चालू होती. आम्ही सगळेजण बिल्डिंगमधून खाली उतरलो व जेलच्या दिवाळाजवळील खंदकात मुरकुटी करून पडून राहिलो. त्यावेळी माझे अखंड नामस्मरण चालू होते. समोर आगडोंब उसळला होता. मृत्यूचे थैमान चालू होते. परमेश्वरच यातून वाचवणार होता. कित्येक तास हे तांडव चालू होते. माझ्या मुखात परमेश्वराचे स्मरण चालू होते. पंधरा पंधरा टनाचे बॉम्ब पडत आणि फुटत होते. आगीचे डोंब उसळले होते. एक मोठा बॉम्ब तर माझ्यासमोर येऊन पडला, पण फुटला नाही. मी बचावलो. एवढ्या सगळ्या बॉम्ब वर्षावात जवळ-जवळ पाच ते सात हजार कैदी मारले गेले. मी ज्या दिवाळाखाली झोपलो होतो ते दिवाळही जाग्यावर नव्हते. ही गुरुकृपा नव्हे तर काय? साक्षात् मृत्युचे तांडव चालू असताना हजारो कैदी मारले गेले व मी मात्र सुरक्षित राहावे हे कसे? असा प्रश्न मला पडला होता.

सगळे शांत झाल्यावर मी त्या खंदकातून बाहेर आलो. माझ्या पाठीवर फक्त एक लाकडाची फळी होती. वर पाहिले संपूर्ण किल्ला भुईसपाट झाला

होता. पण या अग्नी वर्षावातून मी मात्र सहिसलामत सुटलो. चारहीबाजूला पाहिले शुकशुकाट होता. संट्री जाग्यावर नव्हते. झाडे जाग्यावर नव्हती. किल्याचे दगडही जाग्यावर नव्हते. मी बाहेर आलो. अंग झटकले आणि किल्ल्याच्या आजूबाजूला चक्कर मारली. पुन्हा किल्ल्याच्या पडलेल्या दिवाळावरून आमचे सामान होते ते शोधण्यासाठी जाण्याचा प्रयत्न केला. सारे काही सुरक्षित होते. चारी बाजूला दगडांबरोबर माणसांचाही खच पडला होता. त्यापैकी कुणी जिवंत आहे का हे शोधण्याचा प्रयत्न केला. पुन्हा बाहेर आलो तेव्हा पाहिले तर एका ठिकाणी दहा-बारा कैदी इतस्ततः फिरताना दिसले. आम्ही सगळे एका ठिकाणी जमा झालो. या संपूर्ण किल्ल्यात दहा- अकराजणच शिल्लक होतो. मी जिवंत असणे हे सगळे माझ्या गुरूंनी मला नवव्या वर्षी दिलेल्या अनुग्रहाच्या 'तारक मंत्राचा' प्रताप होता असे मी मानतो. संपूर्ण युद्धाच्या काळात एवढा अग्नीवर्षाव होत असतानाही मला साधे खरचटले सुद्धा नाही हे आश्चर्यच नव्हे का? या एका 'नामा'वरच या दुसऱ्या महायुद्धाची दुकानदारी मी करून आलो. हे सगळे परमेश्वराच्या कृपेमुळेच शक्य झाले असे मी मानतो.

## स्वित्झर्लन्डमध्ये पलायन

आम्ही सगळे अकरा लोक एका ठिकाणी जमलो. त्यामध्ये वाडकर राजारामराव शिंदे माझ्याबरोबर होते. पुढे काय करावे याचा आम्ही विचार करत होतो. वर आकाश खाली जमीन याशिवाय काहीही दिसत नव्हते. काय करावे कळत नव्हते. आमच्याजवळ जे काही होते ते खाऊन तो दिवस कसाबसा काढला.वर उघड्या आकाशात पाहून ती रात्र काढली. झोप लागलीच नाही. पण पुढे काय करावे या विचाराचे थैमान आमचा पिच्छा सोडीत नव्हते. आमच्यावर कोणाचे नियंत्रण नव्हते. आमच्या मिलिटरीच्या कैद्यांचा कॅम्प हा जर्मनीचा आहे असे समजून त्यावर बॉम्ब हल्ला केला गेला. कदाचित त्या ठिकाणी पूर्वी जर्मनीचे आर्मी पोस्ट असावे म्हणून हल्ला झाला असणार.

आम्ही अकराजणांनी पक्का विचार केला. आता आपल्यावर कोणाचे नियंत्रण नाही. आपण स्वतंत्र आहोत. तेव्हा जमल्यास येथे स्विर्झलँडसारख्या युद्धामध्ये सहभागी नसलेल्या कोणत्या तरी देशामध्ये पळून जावे असा विचार मनात येऊन गेला. आणि आम्ही रस्ता फुटेल तिकडे रात्रभर जंगलातून पळत होतो. मध्ये दोन वेळा रेल्वे लाईन लागली. त्या ट्रॅकमधून काही काळ पळत गेलो. जवळ-जवळ सात-आठ दिवस आम्ही रात्रीचा प्रवास करत होतो. दिवसा कोठेतरी पडून रहायचे. या सगळ्या काळामध्ये फ्रान्समधल्या एका नागरिकाचे आम्हाला मार्गदर्शन झाले. त्याचे नाव आठवत नाही पण तो एक पिस्तुलधारी तरुण होता. संपर्काच्या भाषेची अडचण होती. तो कोण होता? कुठुन आला

होता? आमच्या जवळ येण्याचे त्याचे प्रयोजन काय? अत्यंत प्रेमाने त्याने आम्हाला मार्गदर्शन केले. त्या पिस्तुलधारी गृहस्थाला आम्ही फ्रान्सीसी पिस्तुलवाला असे म्हणत असू. प्रथम जेव्हा तो भेटला तेव्हा त्यांने आमच्यावर फायर केला होता पण आम्ही घाबरलो नाही. तो त्याचा घाबरवण्याचा प्रयत्न असावा. पुढे मात्र त्याच्याच मार्गदर्शना खाली आमच्या सुटकेचा मार्ग आम्ही आक्रमित होतो. गावात जाऊन तो आमच्यासाठी पाव व खाण्याचे पदार्थ घेऊन येत असे.

तो त्या भागातला असावा. कारण त्याच्या एका नातेवाईकाचे घर आम्हाला लागले. तेथे एक दिवस आम्ही मुक्काम केला होता. कधी-कधी सपाट प्रदेशातून चालताना आम्ही तीन-तीन जण अशा मार्चपासचा बहाणा करीत पुढे जात असू. तेव्हां लोकांना आमचा संशय येत नसे. एका ठिकाणी आमच्यावर टॉमी गनचा फायर झाला. तेथे गव्हाची हिरवीगार शेते होती. आम्ही जमीनीवर झोपलो आणि म्हणून बचावलो. पुढे आम्ही 'बेलफोर्ट' या गावाजवळ आलो. हे गाव स्वित्झर्लंडपासून जवळच त्या देशाच्या सरहद्दीवर होते. त्या गृहस्थाने आम्हाला रस्ता दाखवला आणि खाण्यापिण्याची काळजी घेतली. मला तर त्याच्याकडे पाहून 'दत्तमहाराजच' या ठिकाणी माझी पाठराखण करीत आहेत असा भास वेळोवेळी होई. त्याकाळी स्विझ्रलँड हा देश रेड क्रॉस म्हणून घोषित झाला होता. त्यांचा युद्धामध्ये सहभाग नव्हता. पण हा देश या युद्ध काळामध्ये युद्धकैद्यांची काळजी वाहत असे.

आम्ही स्वित्झर्लंडच्या बॉर्डरजवळ आलो आणि त्या पिस्तुलधारी फ्रेन्च गृहस्थानी आम्हाला समजावून सांगितले की, यापुढे मी तुम्हाला काहीही मदत करू शकत नाही. माझी मर्यादा येथपर्यंतच आहे. पुढचा काळ अत्यंत कठिण आहे. तुम्ही उभे आहात त्या जागे-पासून तीनशे यार्डावर स्वित्झर्लँड या देशाची बॉर्डर आहे. आम्ही पाहिले तर खरोखरच उंच वृर्शावर चौकोनी फुली सारख्या आकाराची चिन्हे दिसत होती. पुढे काय करावे? व ही बॉर्डर या ठिकाणावरून कशी क्रॉस करावी याचा विचार करू लागलो, त्याच ठिकाणी जर्मन सैनिकांच्या चौक्या बसवलेल्या होत्या, त्याचा प्रचंड धोका होता. शिवाय जर्मन कुत्रे ही इस्ततत: फिरताना दिसत होते. तो गृहस्थ म्हणाला तुम्ही न घाबरता अतिशय वेगाने पळत जाऊन ही बॉर्डर क्रॉस करा. एकदा तुम्ही बॉर्डर क्रॉस केलीत की तुम्ही स्वतंत्र आहात. जीवन आणि मरण हे या तीनशे यार्डामध्ये तुम्हाला अनुभवायला मिळेल. आणि तो गृहस्थ गायब झाला. तो कोठे गेला याचा शोध आम्ही घेण्याचा प्रयत्न केला. पण त्याची पुन्हा भेट झाली नाही. त्याच्याबरोबरचा सात-आठ दिवसांचा प्रवास स्वप्नवत वाटत होता.

एवढ्यात आमच्यापैकी एकाला तहान लागली, म्हणून दोघेजण पाण्याच्या शोधासाठी एका बाजूच्या घरात विचारण्यासाठी गेले तेवढ्यात तेथील बाईनेच जर्मन सैनिकांच्या हवाली त्यांना केले. आम्ही घाबरलो बराच वेळ झाला तरी ते परत आले नाहीत. तेव्हा काहीतरी संकटात सापडले असावेत असा आमचा पक्का अंदाज होता. न थांबता वेळीच निर्णय घेऊन आम्ही वेगवेगळ्या ठिकाणाहून बॉर्डर क्रॉस करण्याचे ठरविले. आणि अतिशय वेगाने

हा जीवन मरणाच्या तीनशे यार्डाचे अंतर पार करण्याचा निर्णय घेतला. आमच्याजवळ सामान तसे काहीच नव्हते. आणि आम्ही पळालो. त्या आमच्या दोन साथीदारांना पकडल्यामुळे जर्मन चौक्यांजवळ सावधानतेचा इशारा दिला गेला. पण तरीही त्याला न जुमानता आम्ही अतिशय वेगाने पळत पळत ही बॉर्डर क्रॉस केली. त्यात दोन साथीदारांना गोळ्या लागल्या. पण उरलेले सात जण यशस्वीपणे स्वित्झर्लंड बॉर्डरमध्ये प्रवेशकर्ते झालो.

बऱ्याच वेळ आम्ही त्या बॉर्डरच्या पलीकडे रस्त्यावर बसून होतो. खूप दमलो होतो. धाप लागली होती. त्या ठिकाणी उभे असलेले स्वित्झर्लंडचे नागरिक, सैनिक आश्चर्य करीत होते. आणि पलीकडे फ्रान्सच्या बॉर्डरवर जर्मनसैनिक दात ओठ खात होते. ते हरले होते, आम्ही जिंकलो होतो. पण या आठ दिवसाच्या प्रवासात आमचे जीवाभावाचे चार मित्र कामी आले होते. त्यात आमच्या बाबाजी कूकचा समावेश होता. त्यांची आठवण आजही येते.

## वास्तव्य स्वित्झर्लंड

स्वित्झर्लंडच्या बॉर्डरमध्ये प्रवेश केल्यावर आम्ही बराच वेळा तेथे रस्त्यावर बसून होतो. पार थकून गेलो होतो. या प्रवासात गेल्या आठ दिवसात खाण्या पिण्याचे फार हाल झाले होते. कधी कधी गावात सुके पाव मिळत. त्याच्यावर गुजराण करावी लागे. लोकांशी संपर्कासाठी भाषेची अचडण होती. पण त्या फ्रॉन्सीसी पिस्तुल-वाल्यामुळे आणि तो तिथला नागरिक असल्यामुळे आमचा निभाव लागला. अन्यथा कठिण होते. आमच्या अंगावर आमचे मिलिटरी ड्रेस होते. त्यात आम्ही सगळे काळे सावळे निमगोरे त्यामुळे आमचे अस्तित्व व वेगळेपण सगळयांना जाणवत होते. हाच मोठा धोका होता. पण असो, परमेश्वरांच्या कृपेने आम्ही सातजण सुखरूप स्वित्झर्लंडमध्ये येऊन पोहोचलो होतो.

तेथे रस्त्यावर आल्यावर स्वित्झर्लंडमधल्या मिलिटरीचा एक ऑफिसर आम्हाला भेटला, त्याने आमचे पलायन पाहिले होते. आम्हाला पाहताच तो हसला, त्यानंतर त्याने आमची चौकशी केली. आम्ही इंडियन आर्मीचे लोक आहोत, याची प्रथम खात्री पटल्यावर आम्हाला एका हॉटेलमध्ये घेऊन गेला व चहाबिस्किटे मागविली. त्याने आमची आस्थेवाईकपणे चौकशी केली. आम्ही त्याला आमची सर्व हकिकत सांगितली. त्याला खूप बरे वाटले. त्याच्याच गाडीने आम्ही रेडक्रॉसच्या चौकीवर गेलो. त्या ठिकाणी गेल्यावर आम्हाला जेवण दिले. कपडे दिले व आम्ही गवताच्या बनवलेल्या बिछान्यावर झोपलो. त्या वेळी रात्री आम्ही तेथेचे राहिलो. आज प्रथमच निवांत झोप लागली होती.

या दुसऱ्या महायुद्धात स्वित्झर्लंड हा देश उतरला नाही. त्यांनी न्युट्रल अशी भूमिका घेतली. त्यामुळे अमेरिकेसारख्या राष्ट्रांनी त्या देशात रेडक्रॉसची सेंटर्स उघडली होती व त्यांच्याचद्वारे सैनिकांना मदत कार्य करणे चालू केले होते. आम्हाला दोन दोन कांबळी व कपडे देण्यात आले. तेथे खूप चांगली व्यवस्था होती.

दुसरे दिवशी आम्हाला रेल्वेमधे बसवून व दोन-तीन रेल्वे बदलून 'लुझानो-लुकार्नी' येथे आणले व एका घरात ठेवले. नंतर चार दिवसांनी स्विसच्या मिलिटरी कॅम्पामध्ये ठेवले. तेथे आम्ही सहा महिने होतो. त्या ठिकाणी इंडियन आर्मीचे जवळ जवळ शंभर एक लोक आले होते. आम्हाला सगळ्यांना एकाच ठिकाणी आणले होते. तेथे आम्हाला काहीही त्रास नव्हता, तेथून आम्हाला 'लोड्रोनी कॅम्प'मध्ये पाठवण्यात आलेल्या ठिकाणी आम्ही जवळ जवळ सात महिने होतो, तेथे आमची खाण्यापिण्याची व्यवस्था झाली होती. त्या ठिकाणी मी माझे दोन फोटो काढले त्यापैकी एक अजूनही माझ्याजवळ आहे.

तो सहा-सात महिन्याचा काळ अत्यंत सुखाचा गेला. तेथे 'पियो कारमेरा' या एका तरुणाची माझ्याशी ओळख झाली, तो स्विस आर्मीमध्ये होता, लवकरच त्याची माझी मैत्री वाढलीय व घरी जाणे येणे वाढले. त्याचे घर जवळच लुका शहरात होते आणि त्या मिलिटरी कॅम्पापासून जवळ होते. हा स्वित्झर्लंडमधला माझा वास्तव्याचा काळ माझ्या जीवनाचा अत्युच्च आनंदाचा भाग होता, असे मी त्यास संबोधतो. युद्ध किती काळ चालेल याची कल्पना नव्हती. या ठिकाणी आम्हाला युद्धाच्या सर्व बातम्या ऐकायला मिळत,

आम्ही त्या ठिकाणच्या मिलिटरी कॅम्पमध्ये आनंदात होती, आमचा नित्य दिनक्रम असा असे, सकाळी परेड होईनंतर नाश्टा, काही वेळ खेळ व नंतर जेवण. दुपारी आराम आणि संध्याकाळी कदाचित पिक्चर पाहायला मिळत असे. या रेडक्रॉस सेन्टरला अमेरिकन सरकारचे साहाय्य होते, आम्हाला स्वयंसेवक म्हणून तेथे काम करावे लागत असे. आम्ही लहान मोठी कामे करत असू,

स्वित्झर्लंड हा देश अत्यंत सुंदर स्वप्न नगरी सारखा वाटत असे, सुंदर हवामानाचा, घनदाट जंगलांचा असा हा प्रदेश होता. हवामान अत्यंत आल्हाददायक होते. ज्या सिझनमध्ये आम्ही त्या ठिकाणी होती त्या काळात चारीबाजूला रंगीबेरंगी फुलांचा बहर येत असे, गंधयुक्त फुलांचे ताटवे या परिसराची शोभा वाढवीत होते. त्या देशातले लोक फार प्रेमळ. रंगीबेरंगी पोशाखात वावरत, पण फार कष्ट करणारे, नेहमी उद्योगात मग्न असत. दुध-दुभत्याचे कमी नव्हते. आम्हाला जेवणात नेहमीच चीज व दुधाचे पदार्थ मिळत असत. याच भागात कमला नेहरू आजारी असताना औषधोपचारासाठी राहिल्या होत्या. अशा या स्वप्ननगरीत मला राहण्याचा योग आला हा महत् पुण्याचा भाग होय,

आम्ही इंडियन आर्मीचे लोक जे हिन्दुस्थानातील वेगवेगळ्या प्रदेशातील होते, वेगवेगळ्या बटालियनचे होते, पण गुण्यागोविंदाने ठिकाणी राहत होते.

मी घरापासून जवळ-जवळ पाच वर्षे दूर होतो. आई-वडिलांची सतत आठवण येत असे. ती दोघेही वृद्धत्वाकडे झुकली होती. त्यांची काळजी घेण्यास कोणीही नव्हते. माझी एकमेव बहीण नानीचीही आठवण येत असे. पुन्हा

भेटीगाठी कधी होतील, काही नेम नव्हता. युद्धाचा शेवट कधी होईल सांगणे कठीण होते. तोपर्यंत येथेच अडकून पडणार होतो. या काळात पीओ कारमेरा या माझ्या मित्राच्या घरी जाणे येणे होई. त्याची माझी दोस्ती होती. हे नकळत पक्क्या दोस्तीचे धागे जुळले होते. त्याचे माझ्यावर फार प्रेम. आम्ही बंधुत्वाच्या नात्यात बांधलो गेलो. कॅम्पापासूनच्या जवळ असलेल्या घरामध्ये त्याचे मोठे कुटुंब होते. त्याची आई व भावंडे असा परिवार होता. त्याची आई फार प्रेमळ होती. तिच्या प्रेमाच्या वर्षावाने मी भारून गेलो. माझ्या आईची आठवण मला सतत येऊ लागली. पिओची आई अनेक पदार्थ करून घालीत असे. भावंडेही फार प्रेमळ होती. त्यांच्या भेटीगाठी हा एक स्वप्नाचाच भाग होता असे मी समजतो.



तेथील वास्तव्यात माझी तब्येत एकदम छान झाली होती. गोरापान व उमद्या व्यक्तिमत्वाने मी सर्वांना भुरळ घालत असे. अनेक आल्हादकारक घटना घडत होत्या. त्यामुळे मी नकळत या देशाच्या प्रेमात पडलो. येथून कोठे जावूच नये असे क्षणभर वाटे. त्यावेळी मी व पिओने आमचे अनेक फोटो काढले. या सुंदर फोटोवरून माझ्या व्यक्तिमत्त्वाची कल्पना यावी. इतके सुंदर फोटो आले

होते. नंतरच्या काळात अनेक आधुनिक तंत्रांनी फोटो काढले पण या फोटोची त्यांना सर नाही.

या काळात मी स्विर्झलँडच्या काही भागात फिरलो. तेथील प्रदेशाचे अवलोकन केले. देश तसा लहान पण समृद्ध असा होता. युद्धाच्या धक्काबुक्कीत भाग न घेता, त्या आगीत न होरपळता सुखा समाधानात राहणारा असा देश. मुळात हे स्विस लोक शांतता प्रिय. आजूबाजूच्या देशात म्हणजे फ्रान्स, जर्मनी, इटाली या देशात युद्धाचे थैमान चालू असताना हा देश मात्र तटस्थ होता.

याच काळात युद्धाचे पारडे फिरले होते. रशियामध्ये ज्या जर्मन फौजा घुसल्या होत्या त्यांना पराभवाचे चटके बसले. प्रचंड थंडीत रशियन सैन्याने त्यांची ससेहोलपट केली. तुटपुंज्या सामग्रीवर, अन्नाचा तुटवडा, औषधे इत्यादीमुळे जर्मन सैन्याचे हाल झाले आणि पराभवाला सामोरे जावे लागले.

इटाली तर अगोदरच पराभवाच्या खाईत होते. जपान मात्र चांगल्या पद्धतीने परिस्थितीशी टक्कर देत होते.

याच काळात हे युद्ध संपवावे म्हणून अमेरिका काही अंशी या युद्धात उतरली. आपले आरमार व सैनिक त्यांनी युद्धात उतरवले. याचे मुख्य कारण अमेरिकेच्या पर्ल हार्बरवर जपाननी केलेला मारा. त्या कारणाने तो देश डिवचला गेला. सारा जगभर होणारा मानवी संहार रोखावा या उद्देशाने अमेरिका युद्धात उतरली. या साऱ्या बातम्या आम्हाला तिथे कळत असत.

त्याच वेळी नाईलाज म्हणून नागासाकी व हिरोशिमा या जपानच्या दोन शहरांवर अणुबॉम्ब टाकण्यात आले. कित्येक लाख लोक मेले. कित्येक

जायबंदी झाले होते. सारे जग हादरून गेले. जपानचा पराभव झाला. युद्धाचे चित्र पालटले.

आम्हालाही आपल्या देशात पाठवले जाणार अशी कुणकुण लागली. आमच्या कॅम्पमध्ये उत्साहाचे वातावरण होते. आमच्या सुटकेचे आदेश आले. आम्हाला जिनिव्हा येथे नेण्याचे ठरले. मी पिओ बरोबर त्यांच्या घरी त्याच्या आईला व भावंडाला भेटण्यास गेलो. मी आता त्या देशातून जाणार याचे सर्वांनाच दुःख झाले. पिओची आई सांगत होती तू इथून जाऊ नकोस, येथेच रहा, माझ्या मुलीशी लग्न कर. आम्ही तुझी सगळी व्यवस्था करू. ती माऊली खूप रडली. पण त्याचवेळी माझी हिंदुस्थानाकडील ओढ मला घराकडे खेचत होती. त्या स्वप्ननगरीतून माझ्या मनावर मोठा दगड ठेवून मी हिंदुस्थानाकडे निघालो. पिओ मला परत पोचविण्यास आला होता.

थोड्याच दिवसात आम्ही लोझोन कॅम्प सोडला. आम्हाला जिनिव्हा येथे रेल्वेने आणण्यात आले. तेथे आम्हाला आझाद करण्यात आले होते. आम्ही कैदेतून आझाद झालो होतो. अमेरिकेने आमची हिंदुस्थानात पाठविण्यासाठी छोट्या छोट्या बोटींची व्यवस्था केली होती. येथून आम्हाला इटालीच्या बंदरात आणले. लगेच रेल्वेने पुढचा प्रवास सुरू झाला. त्या ठिकाणी आमची भेट थर्ड मराठाच्या सैनिकांबरोबर झाली. आम्हाला अलेक्झांड्रा बंदरात नेण्यात आले. तेथून कैरोला नेण्यात आले. तेथे आम्ही बरेच दिवस होतो. कैरोतून आम्हाला बोटीने हिंदुस्थानात पाठविण्यात आले. आठ-नऊ दिवसाच्या बोटीच्या प्रवासानंतर आमचे पाय मायभूमीला लागले. मुंबई बंदरात आम्हाला उतरविण्यात आले.

## मायभूमीचे दर्शन आणि अग्निदिव्य

जवळ जवळ पाच वर्षानंतर आम्ही हिंदुस्थानात आलो. मनात आनंद होता. लवकरच आईवडीलांची भेट होईल असे वाटले होते. अजूनपर्यंत त्यांच्या सदर्भात काहीही समजले नव्हते. पण याचवेळी एका नव्या तांडवाला सुरुवात झाली. आम्हा सर्वांना मुंबई जवळच्या कल्याणच्या मिलिटरी कॅम्पमध्ये आणण्यात आले. त्याठिकाणी आमची कसून चौकशी करण्यात आली. तेथे आम्ही आठ दिवस होतो. हा काळ १९४५ सालच्या सुरवातीचा होता. देश स्वतंत्र झाला नव्हता.

स्वातंत्र्याची चळवळ अधिक तीव्र झाली होती. आम्ही आझाद हिंद सेनेत गेलो होतो याची सरकारला पक्की माहिती होती. हिंदुस्थान आर्मीमधल्या आम्हा गद्दार सैनिकांबद्दल ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या मनात प्रचंड आकस होता. येनकेन प्रकारे आम्हा सर्वांना अडकवून सजा द्यावी असाच एकंदरीत विचार त्यांच्या मनात होता. त्यामुळे आम्हाला येथे चौकशीच्या छाननीला सामोरे जावे लागले. या छाननीला मिलिटरीच्या भाषेत 'कोर्ट मार्शल' असे म्हणतात. आमच्यावर खटले भरण्यासाठी निरनिराळ्या ठिकाणी चौकशी कॅम्प लावले. अनेक प्रश्नांची सरबत्ती केली. अगदी भंडावून सोडले होते. पण मी त्याला धैर्याने तोंड दिले. त्यांना मी सुसंगत जबाब दिला. आम्ही इटालीमध्ये लिबियात जाऊन हिंदुस्थानी आर्मीच्या विरोधात लढण्यास नकार दिला होता. हेही त्यांना मी स्पष्टपणे सांगितले. खरेतर आझाद हिंद सेनेत गेल्यामुळे मनात एक उमेद आली

होती. उत्साहाचे वातावरण होते. मी हे त्यांना काहीच सांगितले नाही. देश स्वातंत्र्याचे स्फुल्लिंग मनात पेटवले गेले होते. पण तरीही आम्ही आझाद हिंद सेना सोडण्याचे त्यांच्या मनावर ठसविले. कदाचित त्यामुळे आमची सुटका झाली असावी. प्रचंड मानसिक दबाव त्या काळात आमच्यावर होता. आम्ही आझाद हिंद सेनेत गेलो होतो. देश स्वतंत्र व्हावा असे आम्हालाही वाटत होते. पण त्या ठिकाणी घडलेल्या काही घटनांमुळे आम्ही पुन्हा कैद झालो. काही असो. या सर्वातून माझी सुटका झाली होती. मी आझाद हिंद सेनेत होतो. याचे उभ्या आयुष्यात कधी भांडवल केले नाही. स्वातंत्र्य सैनिकही म्हणून कधी मिरवलो नाही. आज या लिखाणाच्या निमित्ताने ही गोष्ट सर्वांसमोर मांडत आहे.

तेथून आम्हाला पुण्याच्या मिलिटरी कॅम्पमध्ये आणण्यात आले आणि मला आर्मीमध्ये रेग्युलर करण्यात आले. तेथे मन लागत नव्हते, थोड्या दिवसांनी बेळगावला पाठविले. मी माझ्या पूर्वीच्या मराठा लाईट इंडी बटालियनमध्ये सामील झालो. त्यावेळी मी युद्ध पूर्णपणे थांबलेले नव्हते. पूर्वेला बर्मा व इतर आघाड्यांवर अजूनही युद्ध चालू होते. पण बेळगावमध्ये आमच्या कॅम्पमध्ये तशी शांतता होती. युद्धावरून आलेल्या आम्हा सगळ्या सैनिकांचे पगाराचे हिशेब करून पैसे देण्यात आले व तीन महिन्याची रजा देण्यात आली.

## जन्मभूमीत पुन्हा आगमन

तीन महिन्याची रजा मिळताच मी तडक गावाला घरी आलो. सगळ्यांना आनंद झाला. जवळजवळ साडेपाच वर्षांनंतर मी गावी आलो होतो. त्याच वेळी माझ्याबरोबर युद्धावर गेलेले माझे मित्र गोपाळ कदम, पांडुरंग राव, शंकरराव इत्यादी मंडळी गावात आली होती. आल्या आल्या प्रथम सगळा गाव पालथा घातला. घरात सणासुदीचेच वातावरण झाले होते. आईवडीलांना खूप आनंद झाला होता. आईला तर प्रेमाचे भरतेच आले होते. एवढिशी मुर्ती, पण वाढत्या वयाची पर्वा न करता ती सतत धडपडत होती. पेढांब्याला नानीला भेटण्यासाठी जाऊन आलो. युद्धाच्या यमयातनातून, शिवाय नंतरच्या अग्निदिव्यातून मी सुखरूप परत आलो होतो, याचाच सर्वांना आनंद झाला होता. तेव्हा माझे वय अठ्ठावीस वर्षांचे होते.

मी आता लग्न करावे असे माझ्या आईवडीलांना वाटत होते. आमचे मेव्हणे दुधाजीराव शिंदे फौजदार पेढांबकर यांनी आणि माझी बहिण नानी यांनी पेढांब्याच्या श्रीपतराव राघोजीराव शिंदे यांची कन्या 'बबी' हिचे स्थळ सुचविले. मी पेढांबे मुक्कामी जाऊन तिला पाहून आलो. सारे काही ठरले व माझा विवाह माघ महिन्यात १९४५ साली झाला. बराच खर्च झाला. पण लग्न व्यवस्थित पार पडले, लग्न झाल्यावर माझी रजा पूर्ण करून मी बेळगाव येथे परतलो.

## बेळगावमधील संघर्षाचे वातावरण

मी बेळगाव येथे आल्यावर आम्हाला वरच्या कॅम्पमध्ये पाठविण्यात आहे. वातावरण सगळे संशयाचे होते. युद्ध अजून पूर्णतः संपले नव्हते. माझे लग्न होऊन नुकतेच पंधरा दिवस झाले होते. आणि आम्हाला पुन्हा लढाईवर पाठवण्याचे कारस्थान शिजले. आमच्यापैकी बरेच जण युद्धाच्या आगीतून होरपळून आले होते. युद्धाचे पुन्हा नाव नको असे सगळ्यांनाच वाटत होते. मी फार अस्वस्थ झालो. मुळात माझी युद्धावर जाण्याची मानसिक तयारी नव्हती. मी आमचे कंपनी कमांडर मेजर साहेबांना जाऊन स्वतः भेटलो. त्यांना सांगितले, माझे लग्न झालेले असून अजून त्याला पंधरा दिवसही झालेले नाहीत. शिवाय मी आत्ताच युद्धावरून परत आलेलो आहे. मी आता परत युद्धावर जावे असे मला मनातून वाटत नाही. शिवाय माझा सिग्नलचा राहिलेला अपूरा कोर्स पूर्ण करणे जरुरीचे आहे. पण कोणीही अधिकारी ऐकून घ्यायला तयार नव्हते. त्या वेळी माझ्या प्लॅटूनचे कंपनी कमांडर सावंतवाडीचे राजे कॅप्टन होते. त्यांनाही सांगितले. मी सांगितले की माझा अपूरा राहिलेला सिग्नलचा कोर्स पूरा केल्यानंतर मी युद्धावर जाईन. मी पुन्हा मेजरना जाऊन भेटलो. बरीच विनवणी केली शेवटी त्यांनी माझी ऑर्डर कॅन्सल केली. मी माझ्या जुन्या कॅम्पात आलो व माझा उरलेला सिग्नलचा कोर्स पूर्ण केला. तात्पुरती युद्धाच्या संकटातून सुटका झाली होती.

या आर्मीच्या नोकरीतून बाहेर पडावे असे सतत वाटत होते. याचे कारण आमच्याबद्दल असलेल्या आकसाने आम्हाला खूप त्रास झाला. मी माझ्या नोकरीचा राजीनामा दिला. पण बऱ्याच काळा पर्यंत त्याला मंजूरी मिळाली

नाही. याचे कारण आम्हा सैनिकांबद्दल ब्रिटीश अधिकाऱ्यांना सहानुभूती नव्हती आणि माझ्याही मनात त्यांच्या बद्दल प्रचंड चीड होती. ही नोकरी सोडावी आणि दुसरी कुठेतरी नोकरी धरावी असा विचार मनात सारखा येत होता.

त्याचवेळी ब्रिटीश सरकारने काही लोकांना "रिजापने" पाठविण्याचा बेत जाहीर केला. आणि या संधीचा फायदा घेण्यासाठी मी पुन्हा अर्ज केला. रिजाप म्हणजे तात्पुरती निवृत्ती पण वर्षातून दोन महिने फिटनेससाठी आपल्या मिलिटरी कॅम्प मध्ये येऊन पुन्हा परेड व युद्धाचा सराव करावा लागे. मी त्यासाठी तयारी दाखविली व बेळगाव येथेच मुंबई पोलीससाठी असलेल्या भरती कॅम्पमध्ये स्वतः जाऊन दिनांक २४-४-१९४६ रोजी मुंबई पोलीसमध्ये भरती झालो. तत्पूर्वी मला तीन महिन्याची रिजापच्या रिटायरमेंटची रजा मिळाली होती. ती रजा घेऊन मी पुन्हा गावाला आलो. ही रजा संपल्यानंतर मला पोलीस मध्ये मुंबई येथे जॉईन करायचे होते.

मी मिलिटरी मध्ये केलेल्या सर्विस बद्दल महिना तीन रुपये पेन्शन बसली. त्या व्यतिरिक्त इतर महागाई भत्ते असत. त्याशिवाय पोलीस मध्ये असताना रिटायर होईपर्यंत दर वर्षी सात दिवसांची भर पगारी रजा पेन्शन घेण्यासाठी खास मिळत असे. रिजापच्या करारानुसार मी १९५३ पर्यंत बेळगाव येथे जात असे. पण त्यानंतर भारत सरकारने ते थांबवले. अशा तऱ्हेने माझा मिलिटरीचा अध्याय संपला. या काळातल्या माझ्या ३-२-१९३८ ते २२-८-१९४६ या काळातील युद्धामधील बहादुरीबद्दल तसेच युद्धामधील शौर्याबद्दल मला १) १९३८ ते १९४५ स्टार मेडल २) आफ्रिकन स्टार मेडल ३) डिफेंस वॉर मेडल या पदकांनी सन्मानित करण्यात आले.

## थोडे मागे

मी लढाईवर पाच साडेपाच वर्षे दूर असताना माझ्या गावी माझ्या आईवडीलांचे कसे चालले होते. याची जी माहिती मिळाली. त्याचे विवेचन येथे करणे जरूरीचे आहे. नव्हे, ते अगत्याचे आहे. मी युद्धावर असताना तेथून पाठविलेली पत्र मिळत, पण जेव्हा कैद झालो त्यानंतर सगळा संपर्क तुटला. मी जिवंत आहे की मेलो आहे याचा काहीच थांगपत्ता माझ्या आईवडीलांना नव्हता. मी 'धरण्यात' आहे एवढेच त्यांना समजले. ते आता थकत चालेले होते. शेतीची कामे त्यांना होत नव्हती. आई कुणाबरोबर तरी वाट्याने आपले शेत करी. त्यात त्यांचे भागण्यासारखे नव्हते. शिवाय माझी सतत काळजी. माझे काय झाले या विवंचनेत त्यांचे दिवस जात होते. युद्धातल्या भयानक बातम्या गावात येत, युद्धात कुणी कामी आल्याचे कळे आणि हृदय फाटून जाई. ती अस्वस्थ होत. पण माझ्या येणाऱ्या फामलीचे पैसे त्यांना येत. त्या दहा रुपयात त्यांचे भागत नसे. इतर कोठूनही पैसा मिळण्याचे साधन नव्हते. त्या काळात प्रचंड महागाई झाली होती.

त्या पडत्या काळात त्यांना मदत केली ती खेर्डी येथील एक वाणी श्री. भाऊ लकेश्री यांनी. त्यांनी या काळात घरी हवे असलेले सगळे सामान उधार दिले. कधीही पैशाचा तगादा लावला नाही. पण इथे आल्यानंतर त्यांचा सगळा हिशेब मी चुकता केला. असा तो भला माणूस होता. पण त्यांना फार कमी आयुष्य लाभले. त्याचे उपकार आयुष्यभर मी विसरलो नाही.

माझी आई फार प्रेमळ, ती थकली होती. तिने कोणाशी भांडण केलेले मला आठवत नाही. सारी गरीबी, दुःख तिने पचविले. उलट माझ्या वडीलांचा स्वभाव मात्र दिवसें दिवस फारच चिडचिडा झाला होता. त्यांची नजरही आताशा फारच कमजोर झाली होती. अंग लटलटा कापत असे. माझ्या लग्नाच्यावेळी तर त्यांनी नवग्रह विधी तशाच अवस्थेत केल्याचे मला आठवते.

आमचे जे जुने घर वडिलांनी बांधले होते ते अजूनही तसेच होते. मी येथे आल्यावर आमच्या शेजारच्या विश्रामरावांचे जुने घर पुन्हा बांधण्याचे काम त्यांच्या चिरंजीवांनी ठरविले. मी त्यांच्या जुन्या घराचे सगळे सामान विकत घेतले व माझ्या जुन्या घराची दुरुस्ती पुर्नबांधणी केली. त्यात दोन पडव्यांची भर घातली.

त्यानंतर मी पोलीस मधून निवृत्त झाल्यानंतर, १९८९ साली त्याच जुन्या घराच्या जागेवर एक टुमदार घर बांधले. ते आजही आहे. त्याचे नाव 'सद्गुरू निवास' असे ठेवले आहे. हे घर बारकू फागे या कुंभाराने बांधले. खूप चांगला माणूस. बांधणारा माणूस तिथे राहत नाही पण आपले रहाणे आनंदमय करतो.

## मुंबई पोलीसमध्ये नोकरी

दिनांक २४-४-१९४६ रोजी बेळगाव येथील कॅम्पमध्ये मी मुंबई पोलीसमध्ये शिपाई म्हणून भरती झालो व माझी मिलिटरीची तीन महिन्यांची रजा संपल्यावर मी मुंबईला नायगाव येथे पोलीस खात्यात रुजू झालो. आमची ही नोकरी 'सिव्हील' अशी होती. तेव्हा येथील लोकल कायदे, नियम याविषयी माहिती हवी होती. ती आम्हाला देण्याची व्यवस्था नायगाव येथेच करण्यात आली. त्याबाबतच्या प्रशिक्षणाचे सारे सोपस्कार करणे भाग होते.

मी ज्या काळात मुंबई पोलीसमध्ये 'आर्म्स सेक्शन' म्हणजे हत्यारी विभागात दाखल झालो. त्या वेळी येथील परिस्थिती फार बिकट होती. स्वातंत्र्य चळवळीचा जोर ओसरला नव्हता. पण स्वातंत्र्य मिळण्याच्या दिशेने निश्चित पावले उचलली जात होती. अन् देशाची फाळणी होणार त्यामुळे इथला मुसलमान, हिंदू समाज अस्वस्थ होता. धर्माच्या नावाखाली समाजात विष पेरले जात होते. या सगळ्याला ब्रिटीशांचा पाठिंबा होता. त्यातून आगडोंब उसळला तो जातीय दंगलींचा. असुरक्षित वाटणारे मुसलमान हे हिंदुंवर व हिंदुही त्याचा बदला घेण्यासाठी मुसलमानांवर हल्ले करीत असत. असा प्रकार सुरु झाला.

माझे पोलीस प्रशिक्षण अजून संपले नव्हते. पण तरीही आम्हाला मुंबईच्या नळबाजारातील चौक्यांवर बंदोबस्तासाठी पाठवले होते. तेथे दंगल

आटोक्यात आणण्याचे आटोकाट प्रयत्न करावे लागले. आम्हाला जखमींना हॉस्पिटलात नेऊन पोहचविण्यापासूनची सर्व कामे करावी लागत.

१५ ऑगस्ट १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. नंतर सर्व वातावरण शांत होत गेले. त्यानंतर आमचे उरलेले ट्रेनिंग पुरे करून आम्हाला नायगाव पोलीस हेडक्वॉर्टर्स एल. ए. वन, या हत्यारी दलामध्ये पोस्टींग देण्यात आली. ट्रेनिंग संपल्यावर रजेवर गावी जाऊन आलो.

मी एल. ए. वनला असताना कामाचे स्वरूप म्हणजे आम्हाला वेगवेगळी सरकारी कार्यालये, बँका, कोर्ट, कारागृहे यांचे गार्ड म्हणून पाठविले जाई. माझे रिव्हाल्वर ट्रेनिंग उत्तम झाले होते. तेव्हा मला अधून मधून व्ही.आय. पींचे बॉडीगार्ड म्हणून पाठविले जाई. मी त्यावेळच्या पश्चिम हिंदुस्थानचे पहिले पंतप्रधान खेरसाहेब यांचा बॉडीगार्ड म्हणूनही काही काळ काम केले. त्यानंतर मुंबई इलाक्याचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांचा बॉडीगार्ड म्हणूनही काम केले. त्यावेळी घडलेली एक घटना या ठिकाणी नमूद करतो. पाटील नावाचे एक मिनिस्टर होते, त्यांचा मी बॉडीगार्ड होतो. ते महालक्ष्मी मंदिरामध्ये दर्शनासाठी गेले होते. मी त्यांच्या बरोबर होतो. ते मंदिरात गेले आणि मी त्यांच्या पाठोपाठ मंदिरात गेलो. दर्शन घेऊन परत आलो. तर त्यांच्या नव्या चप्पला कोणीतरी चोरून नेल्या होत्या. ते माझ्यावर भयंकर संतापले. तुम्ही काय करत होतात? मी ही त्यांना खडसावले, मी सांगितले 'मी तुमचा बॉडीगार्ड आहे, तुमच्या चपलांचा नाही, तरीही त्यांची बडबड चालूच होती. मला प्रचंड संताप आला.

माझे मस्तक एकदम तापले. एक विचार मनात येऊन गेला या लोड केलेल्या रिव्हाल्वरने यांना उडवावे, पण दुसऱ्याच क्षणी गावावरून आलेल्या माझ्या मुलाच्या, यशवंतच्या जन्माच्या गोड बातमीच्या आठवणीने माझे नशा खाडकन उतरली. ते माझ्याबरोबर बिनचप्पलाचे चालत बंगल्यापर्यंत गेले.

माझा स्वभाव तसा तापट. सत्यप्रिय, अन्याय सहन करायचा नाही, गिळायचाही नाही. तरीही यामुळे अनेक वेळा प्राप्त परिस्थितीत मनाला मुरड घालावी लागे.

या काळात मी गॅस प्लॅटुनलाही अॅटॅच होतो. मुंबईत होणाऱ्या लहान-मोठ्या दंग्याना काबूत आणण्यासाठी या प्लॅटुनचा उपयोग केला जाई. काही काळ मी आरमरीमध्ये काम केले. हत्यारे हाताळण्याची त्यांचे रिपेरिंग व सर्व्हिसिंग करण्याची मला आवड होती. बराच काळ तेथे काम केले. तेथे त्यावेळी जे. के. सावंत साहेब आमचे इन्चार्ज इन्स्पेक्टर होते. त्या वेळी त्या आरमरी मध्ये मालवण पट्ट्यातील सर्व लोकांचे वर्चस्व होते आणि हे लोक सतत घाणेरडे राजकारण खेळत असत. मी त्याला कंटाळलो, तेथून बाहेर पडलो व पुन्हा गॅसप्लॅटुन मध्ये आलो.

## १९५७ सालचे संयुक्त महाराष्ट्र आंदोलन

या काळातील सर्व घटना ठळकपणे आठवतात. तो १९५७ सालचा संयुक्त महाराष्ट्र-गुजरात राईट चा काळ. मुंबईसह महाराष्ट्र व्हावा यासाठी प्रचंड आंदोलन झाले. त्यामध्ये आम्हा पोलीसांचे हाल कुत्राही खात नव्हता अशी परिस्थिती होती. ना वेळेवर जेवण. रात्रंदिवस बंदोबस्त. झोपेचा पत्ता नाही. प्रचंड तणाव. अशा या काळात अनेक दंगलींना सामारे जावे लागले. मी एकदा ज्या इमारतीखाली पहाऱ्यासाठी उभा होतो. त्या इमारतीतून एक पाटा आमच्यावर टाकला गेला. मी जवळच उभा होतो. पण सुदैवाने वाचलो. या आंदोलनात शेकडोंचे प्राण गेले. वित्तहानी झाली. पण एकदाचे हे आंदोलन मुंबईसह महाराष्ट्र झाल्यावर थांबले.

याच काळात नायगाव येथे पोलीसमध्ये भरती झाल्यावर माझ्या अंगीभूत गुणांना वाव मिळाला. मी उत्तम हॉकी खेळत असे. मी गोलकिपर म्हणून हॉकीच्या सामान्यांमध्ये उत्तम कामगिरी करीत असे. काय हिम्मत होती प्रतिस्पर्धी संघाची गोल करण्याची. मोठ्या हिंमतीने त्यांना सामोरे जाण्याची, ते गोल अडवण्याची माझी प्रचंड मानसिक तयारी होती. व शरीराची साथ होती. सर्वच माझे कौतुक करीत. त्यावेळी त्या पोलीस हेडक्वॉटर्सचे इन्चार्ज म्हणून जे. जे. जेमसन साहेब सुप्रिटेंडेट म्हणून आले होते. ते उंचपुरे रूबाबदार व अत्यंत प्रेमळ असे शेवटचेच ब्रिटीश ऑफिसर होते. त्यांना बॉक्सिंग, फुटबॉल, हॉकी व कुस्ती या खेळात अधिक स्वास्थ होते. त्याच काळात खाशाबा जाधव कुस्तीगीर, ऑलिम्पिक मेडल विजेते हेही आमच्या हेडक्वॉर्टर इन्स्पेक्टर म्हणून

होते. जेमसन साहेबांच्या सोबत काम करायला सगळयांना हुरुप वाटे. त्यांच्याच हाताखाली जे. के. सावंतसाहेब तयार झाले. ते पुढे एसीपी म्हणून रिटायर झाले. एक शिपाई म्हणून पोलीस मध्ये लागलेले पण हुशारीनी नंतर ग्रॅज्युएट होऊन, एसीपीच्या पोस्ट पर्यंत गेलेले ते एकमेव गृहस्थ होते. पोलीस खात्याच्या आर्म डिव्हीजनमध्ये एकदा संप झाला. त्या काळात त्यांनी ज्या तत्परतेने ते प्रकरण हाताळले त्याला तोड नाही. मोठा धोका टळला. अख्खी आरमरी त्यांनी आपल्या अधिपत्याखाली बंद ठेवून एकही हत्यार बाहेर जाऊ दिले नाही. आम्हाला सगळयांनाच त्यांच्याबद्दल खूप आदर वाटत असे. अध्यात्मामध्ये त्यांची खूप चांगली तयारी असे. ग्रंथ वाचनात हातखंडा होता. त्यांनी केलेले निरुपण ऐकतच रहावे असे वाटे.

नायगाव पोलीस हेडक्वॉर्टरचा हा परिसर फार मोठा होता. जुन्या चाळी तसेच नव्या चाळी यामध्ये बहुतेक सर्व पोलीसच राहायचे. तेथील वातावरण अत्यंत धार्मिक असे. श्रावण महिन्यात, अधिक मासात या ठिकाणी ग्रंथांचे सार्वजनिक वाचन होत असे. त्यामध्ये रामायण, महाभारत, भक्तीविजय, रामविजय, नवनाथ इत्यादी ग्रंथांचे दरवर्षी वाचन होत असे. मलाही वाचनाची आवड असल्यामुळे मी त्या ठिकाणी जात असे. माझा आवाज खूप चांगला, स्पष्ट उच्चार त्यामुळे ग्रंथ वाचण्यास बसण्याची सक्ती होत असे. अनेक वेळा आमच्या पोलीस चाळीमध्ये भजनाची डबल बारी, सिंगल बारीचे सामने होत. मी भजनाला जात असे. मुंबईमधील मोठ मोठ्या भजन मंडळांनी आणि बुवांनी त्या ठिकाणी हजेरी लावली आहे. त्यात त्या काळातील फुलाजी बुवा, कदम बुवा, परब बुवा आणि आमच्या हेडक्वॉटर्डमधील नाईक बुवा यांचा समावेश होता. काही असो, येथील वातावरण अत्यंत धार्मिक व पवित्र असे.

सुरुवातीला मी मुंबईत एकटाच होतो. नंतर १९६२ साली माझा मुलगा यशवंत हा शिक्षणासाठी मुंबईला आला. माझी पत्नी माझ्या आईवडीलांची सेवा करण्यासाठी गावीच राहात असे. तिला मुंबईला १९७२ पर्यंत आणता आले नाही. तेव्हा आमचे जेवणाखावणाचे आम्हालाच ड्यूटी संभाळून करावे लागे. शिवाय आमची फॅमिली इथे नसल्यामुळे आम्हाला कोणाच्यातरी जोडीला, एखाद्या रूममध्ये ठेवले जाई. पण जेव्हा कधी त्याचे कुटुंब येई तेव्हा मात्र खुप पंचाईत होई. आम्हाला जेवण त्याच खोलीत करावे लागे. शिवाय त्या खोल्याही लहान होत्या. त्यामुळे झोपण्यासाठी आम्हाला शेरींगचा आधार घ्यावा लागे. खूप मोठी कुचंबणा होई. मुलाला अभ्यास करता येत नसे. याचे कारण येथील क्वॉटर्स देण्याचे नियम अतिशय क्लेशकारक होते.

मुंबईत राहून मी ३१ वर्ष सर्विस केली. पण कोठेही बाहेर जागा घेऊ शकलो नाही. कारण आम्हाला आर्मच्या लोकांना हेडक्वॉटर्स मध्येच कंपल्सरी राहण्याचा हुकूम होता. मी रिटायर झालो तेव्हा माझी आर्थिक कुवतही जागा घेण्याची नव्हती. माझे स्वतःचे मुंबईत घर नव्हते. परिणामी मुलांना भाड्याचे घर घेण्याची वेळ आली.

जे. जे. जेमसन साहेब नायगावमध्ये आपली सर्विस पूर्ण करून निवृत्त झाले व पुढे अनेक मोठ्या कंपनीत सिक्युरिटी डायरेक्टर्स म्हणून त्यांनी काम केले. १९७० साली भारतामध्येच त्यांचे निधन झाले. गिरगावच्या स्मशानभूमीत त्यांच्या इच्छेप्रमाणे हिंदु पद्धतीनी त्यांचे दहन करण्यात आले. त्या वेळी मरीनलाईन्स येथे त्यांच्या अंत्यदर्शनासाठी मी व माझा मुलगा यशवंत गेलो होतो. प्रचंड गर्दी होती. असा हा लोकप्रिय अधिकारी पोलीस खात्याचे भूषण होते.

याच काळात महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री लोकनेते श्री. यशवंतराव चव्हाणजी यांचा बॉडीगार्ड म्हणून काम करण्याचा योग मला आला. त्यानंतर बाळासाहेब देसाई, वसंतराव नाईक साहेब, शंकररावजी चव्हाण यांचे बॉडीगार्ड म्हणूनही काम करण्याची संधी मिळाली. यशवंतराव चव्हाणांच्या एकसष्टीसाठी कराड येथे जाण्याचा योग आला. अनेक मंत्री या विमानात होते. शरद पवार साहेबही आमच्याबरोबर होते. हा कार्यक्रम उत्तम तऱ्हेने कराडच्या विठामाई हायस्कूलमध्ये हा समारंभ पार पडला. त्यावेळी मी साळुंखे नावाच्या मंत्र्याकडे बॉडीगार्ड म्हणून होतो.

मी बॉडीगार्ड म्हणून ज्या मातब्बर व्यक्तींची ड्युटी केली त्यात सुप्रसिद्ध वकील श्रीकांत भट अत्यंत हुशार व निष्णात वकीलाचा उल्लेख करावा लागेल. अत्यंत सुस्वभावी व प्रेमळ स्वभावाच्या या व्यक्तीबरोबर दोन वर्षे मी बॉडीगार्ड म्हणून काम केले. माझ्या मुलाचे ते प्रोफेसर. त्याच्यावर त्यांचे खुप प्रेम. त्या काळात ते शिवसेनेचे वकील म्हणून काम करत असत. भविष्यात त्यांनी खुप नांव कमावले.

दुसरा उल्लेख वामनराव महाडीक यांचा करायला हवा. ते मुंबईचे महापौर व शिवसेनेचे नेते होते. त्यांचा स्वभाव अत्यंत गरीब होता. मला त्यांचे व्यक्तीमत्व खुप आवडले. अत्यंत गरीबीतून आलेल्या या नेत्याने जीवनभर गरीबांचीच चाकरी केली.

## आजी माजी सैनिकांची संस्था

आमच्या गावात माजी सैनिकांची एक संस्था आहे. ही संस्था १९८२ साली स्थापन झाली. मी ही त्या संस्थेमध्ये सक्रिय आहे. दरवर्षी होळीच्या दिवशी सकाळी भवानीदेवीच्या मंदिरामध्ये आम्ही सर्व आजीमाजी सैनिक जमतो. त्या ठिकाणी निवृत्त झालेल्या सैनिकांचे, तसेच प्रमोशन मिळालेल्या सैनिकांचे सत्कार केले जातात. नव्या पिढीतील नव्याने सैन्यामध्ये गेलेल्यांचे कौतुक केले जाते आणि गावातील निवृत्त कॅप्टन, सुभेदार यांचा आदर्श जपण्याचे सांगण्यात येते. सत्यनारायणाची पूजा त्या दिवशी ठेवण्यात येते व कुलस्वामीनी भवानी आईने या सर्व सैनिकांना दिर्घायुष्य द्यावे त्यांच्या नोकरीत त्यांची उच्च स्थानापर्यंत प्रगती व्हावी यासाठी प्रार्थना केली जाते.

आजपर्यंत आमच्या गावात मिलिटरी आणि एअरफोर्स यामध्ये सात लोक कॅप्टनच्या हुद्यापर्यंत जाऊन निवृत्त झाले. त्यामध्ये कै. रामचंद्रराव चंद्रराव कदम, श्री. राजाराम दादाजीराव कदम, श्री. भगवान बाबूराव कदम, श्री. आबाजी शंकरराव कदम, श्री. विश्वनाथ पांडुरंगराव कदम (एअर फोर्स), श्री. रामचंद्रराव बाबाजीराव कदम व श्री. भरत शिवाजीराव कदम यांचा समावेश आहे.

याशिवाय सुभेदार मेजर झालेल्यामध्ये कै. नरसिंगराव बाबाजीराव कदम, कै. प्रभाकरराव यशवंतराव कदम, श्री. शहाजी जानराव कदम व श्री. दत्ताराव रामचंद्र कदम यांचा समावेश आहे.

सुभेदारच्या हुद्यापर्यंत जाऊन निवृत्त झालेल्यामध्ये कै. अंबाजीराव कदम, कै. नारायण मानाजी साळवी, कै. दत्ताराम बाबू मेंगे, श्री. शांताराम तातोजी कदम, श्री. सुदाम रामचंद्र साळवी यांचा समावेश आहे.

या शिवाय नाईक सुभेदार म्हणून श्री. प्रमोद भरतराव कदम व रविंद्र गंगाराम मेंगे यांचा समावेश आहे. आज या संस्थेचे ९७ आजी-माजी सदस्य आहेत. या संस्थेच्या वतीने कुलस्वामिनी भवानी, वाघजाई मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार आम्हा सैनिकांच्या वतीने बांधले आहेत. त्यामुळे त्या मंदिराची शोभा वाढली आहे.

## जयभवानी ग्रामोउन्नती मंडळ, मुंबई

मुंबई मध्ये आमच्या गावातील मंडळींनी एक संस्था १९३८ साली स्थापन केली. या संस्थेचे संस्थापक आमचे चुलत वडील बंधू कै. सखाराम यशवंतराव उर्फ मामासाहेब कदम व दत्तवाडीतील कै. गणपतराव कदम या मातब्बर मंडळानी केली आणि त्यांना गावातील सर्व लोकांनी साहाय्य केले. या संस्थेने आता पन्नास वर्षे पूर्ण केली आहेत आणि ही संस्था गावाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी तसेच गावातील शाळेच्या प्रगतीसाठी आर्थिक तसेच इतरही कार्य करीत आहे. आज या संस्थेमध्ये श्री. हणंमतराव केशवराव कदम हे आमच्या गावातील पहिले पदवीधर गृहस्थ. तसेच माझे पुतणे श्री. लक्ष्मणराव शिवरामराव कदम, वसंतराव गणपतराव कदम, जे. बी. कदम, श्री. लक्ष्मणराव शंकरराव कदम. यासारखे कार्यकर्ते काम करीत आहे. ही संस्था नव्या पिढीला सर्वतोपरी मार्गदर्शन करीत आहे. अशा तऱ्हेने ही संस्था सर्वोत्तम वाटचाल करीत आहे. ही गावाला एक अभिमानस्पद गोष्ट आहे. आम्ही आणि आमची सर्व मुले या संस्थेच्या कार्यामध्ये सहभागी आहोत.

या आमच्या संस्थेमध्ये ज्या व्यक्तींनी संस्थेसाठी योगदान दिले त्याचा नामोल्लेख करणे जरुरीचे आहे. त्यांच्यामध्ये कै. नारायण रामाजीराव कदम, कै. गंगाराम बजाजीराव कदम, कै. तातोजीराव दिनकरराव कदम, कै. भाऊ भिकाजीराव कदम, श्री. उद्धवराव बाबुराव कदम, श्री. रघुनाथ तोताजीराव कदम व श्री. काशिराम बाबुराव कदम.

वरील मातब्बर मंडळीपैकी कै. मामासाहेब कदम यांचे नांव मुंबईतील बोरीवली भागात एका चौकाला नाव दिले गेले आहे तसेच कै. गणपतराव कदम यांच्या नावाचा एक रस्ता लोअर परेल स्टेशन ते वरळी असा आहे.

## माझे निष्कलंक जीवन

मी माझे संपूर्ण जीवन निष्कलंकपणे जगलो. व्यसनांपासून पूर्णपणे दूर राहिलो. कोणताही भ्रष्टाचार केला नाही. कोणाच्याही एका पैशाला शिवलो नाही. कोणाचाही द्वेष केला नाही. परिणामी कोणाचीही दुश्मनी झाली नाही, शक्यतो असे वातावरण निर्माण झाल्यास त्यापासून दूर राहण्याचा प्रयत्न केला. सदा परमेश्वर, स्मरण, ध्यान यातच रमलो. मृगजळाच्या मागे कधी धावलो नाही. एक पैश्याचे कर्ज घेतले नाही. आणि कुणाला दिले नाही. आहे त्याच प्राप्त परिस्थितीत प्रपंचाची चौकट नीटनेटकी करण्याचा प्रयत्न केला. हाच धडा मुलांनाही दिला. आहे त्यातच समाधान माना. पैशाचे संबंध अत्यंत पारदर्शक ठेवा. कुणाचे नुकसान करू नका. आपले दोन पैसे गेले तरी चालतील पण कुणाचाही एक पैसा बुडवू नका. मी स्वतः असाच वागलो. पैशाच्या व्यवहारातून संबंध बिघडतात, दुरावा निर्माण होतो. म्हणून वरील नियम पाळा असे मुलांना सांगत आलो. आणि त्यांनीही हे नियम काटेकोरपणे पाळले.

## कुटुंबाबद्दल थोडेसे

हे सारे लिहित असताना माझ्या कुटुंबाबद्दल थोडे लिहिणे जरूरीचे आहे. माझा मोठा मुलगा यशवंत त्यानंतर कुसुम व त्यानंतर संध्या या दोन कन्या असे आमचे कुटुंब. कुसुमचे लग्न पेढांब्यातील नानीचे चिरंजीव तुकाराम यांच्या बरोबर १९७१ साली झाले. माझा जेष्ठ चिरंजीव यशवंत याने मुंबईला येऊन एस.एस.सी. नंतरचे आपले शिक्षण छोट्या मोठ्या नोकऱ्या करीत आपल्या पायावर उभे राहून केले. जे माझ्या तुटपुंज्या पगारात शक्य नव्हते. त्याला त्याचा स्वतःचा मार्ग चोखाळण्यास सांगितले. आणि तोही त्या सर्व प्रयत्नात यशस्वी झाला. नाईट कॉलेज, मॉर्निंग कॉलेज करून त्यांने आपले शिक्षण बी.ए., एल.एल.बी.पर्यत पूर्ण केले व आयकर खात्यात उत्तम प्रकारची नोकरी करीत आहे. यशवंतचा विवाह ५ जून १९७२ साली झाला. त्याची पत्नी सुजाता पूर्वीची शालिनी सुर्वे ही देखील तशीच माझ्या पत्नीसारखीच अत्यंत प्रेमळ सेवाभावी व कुटुंबवत्सल आहे. त्यांच्या लग्नानंतर सप्टेंबर १९७२ साली संध्याचा जन्म झाला.

संध्या हिचा जन्म हा एक चमत्कारच म्हणावा लागेल. ध्यानीमनी नसताना तिचा गर्भ राहिला. अनेक प्रयत्न करूनही तो गर्भ पाडता आला नाही. आणि संध्याचा जन्म झाला. अत्यंत हुशार अशी ही मुलगी जन्माला आली, जिने आमची दोघांची उतार वयात उत्तम सेवा केली. आपले शिक्षण संभाळून तिने मोठ्या कष्टाने यश संपादन केले. गावात आपला आईसारखाच एक आदर्श निर्माण केला. हे तिच्यावर झालेल्या आमच्या संस्कारातून घडले.

यशवंतचा मुलगा आता डेन्टीस्ट म्हणून शिकत आहे. संध्या ही चिपळूणला कॉलेजमध्ये शिकत आहे.

## वडीलांचा मृत्यू

दि. ४ फेब्रुवारी १९६२ साली माझे वडील सद्गुरू अनंतराव कदम यांचे निधन झाले. त्यावेळी त्यांचे वय जवळजवळ ९७ वर्षाचे होते. वृद्धत्वामुळे अनेक आजारांनी त्यांना ग्रासले होते. अंधत्व आले होते. फार विचित्र वागत, पण या सर्व काळात माझी पत्नी सौ. लक्ष्मी हिने अत्यंत प्रेमाने त्यांची सेवा केली. त्यांचे सगळे हट्ट पुरविले. ते तिच्यावर खूप रागवत पण ती मात्र कधीही त्यांच्यावर रागवली नाही. जेव्हा कधी ते चांगल्या मनःस्थितीत असत तेव्हा तत्त्वज्ञानाचे, भक्तीचे धडे देत व मार्गदर्शन करीत. त्यांचा हा स्वभाव माहित असल्यामुळे त्यांचा सगळा त्रास माझ्या तळेवाडीतील व आमच्या शेजारच्या घरातील लोक सहन करीत असत. त्यांना चालता येत नसे म्हणून ते सरपटत - सरपटत घरापासून हनुमंताच्या देवळापर्यंत जात. त्यांना पुन्हा उचलून घरी आणावे लागे. त्यांना अध्यात्माचे ज्ञान होते. तसाच आपला मृत्यु केव्हा होईल याचेही ज्ञान होते. दि. ४ फेब्रुवारी १९६२ साली जेव्हा त्यांनी देह ठेवला. तेव्हा घरातील सर्वांना त्यांनी बोलावून घेतले. माझ्या पत्नीला त्यांचे डोके मांडीवर ठेवण्यास सांगितले आणि तिला सांगितले जे काय पहाशील त्याने घाबरून जाऊ नकोस. नामस्मरण चालू करण्यास सांगितले व आपला देह सोडला. त्यावेळी त्यांच्या शरीरामधून बाहेर पडलेल्या प्रचंड विजेसारख्या प्रकाशाची ज्योत माझ्या पत्नीने पाहिली. या अनोख्या अनुभवाने ती क्षणभर भांबावली. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांची एक सुंदरशी समाधी बांधली आहे. ते एक सत्पुरुष होते. आमच्या गावात व गावाबाहेर त्यांचे शेकडो शिष्य होते. गोकुळाष्टमी व

गुरुपौर्णिमा ह्या दिवशी आमच्या घरात मांड भरले जात व अनेक लोकांना अनुग्रह दिला जाई. ते म्हणत "कशाला जाता दूर माझे इथेच पंढरपूर" याचा अर्थ असा की, परमेश्वर आपल्याजवळ आहे, त्याला ओळखा. तिर्थयात्रेची पायपीट करण्याची काहीही जरूरी नाही.

खरेतर आमच्या वाडीत म्हणजे तळेवाडीतील परंपराच तशी होती. माझे वडील सद्गुरू अनंतराव महाराज, सद्गुरू जिजाबा महाराज व नंतरच्या काळात सद्गुरू बाबाजीराव महाराज अशा सत्पुरुषांनी या वाडीतील तसेच गावातील भक्तिमय वातावरण वाढवण्याचा प्रयत्न केला. बाबाजीराव कदमांनी लावलेला प्रचंड पिंपळवृक्ष आजही याची साक्ष देत आहे. या पिंपळवृक्षावर हजारो पक्षी गुण्यागोविंदाने येतात, चिवचिवाट करतात आणि सगळे वातावरण जिवंत करतात. हा अनुभव फार वेगळा आहे. या पिंपळाच्या मागील बाजूला एक हनुमंताचे देऊळ होते. नंतर ते कुलस्वामीनी भवानी देवीच्या आवारात नेण्यात आले.

## पोलीस खात्यातून निवृत्ती

मी ३० जून १९७६ साली पोलीस खात्यातून हवालदार म्हणून निवृत्त झालो. मला खरेतर नोकरीचा वीट आला होता. पोलीस खात्यातील ही नोकरी ही देखील एक गुलामगिरीचाच अनुभव होता. लवकरच निवृत्त होऊन गावाला जावे तेथे कायम वास्तव्य करावे. असेच मला सारखे वाटत होते. म्हणून निवृत्त झाल्याच्या दुसऱ्या दिवशी तडक गाव गाठले. त्यावेळी माझी पत्नी पेढांबे मुक्कामी होती. तिचे वडील वृद्धत्वाकडे झुकले होते व एकटेच होते. त्यांना सांभाळण्यासाठी ती तेथेच थांबली होती. मीही तेथे गेलो पण माझे मन काही तेथे लागत नव्हते. माझ्या पत्नीच्या वडीलांच्या मृत्युनंतर आम्ही परत टेरव मुक्कामी आलो व शेवटपर्यंत माझे वास्तव्य याच गावात होते. माझ्या मिळणाऱ्या पोलीस व मिलीटरीच्या पेन्शनवर माझे उत्तम चालले आहे. मी कोणावरही विसंबून नाही. स्वावलंबी आहे.

## पुनः तांडव सुरू

जीवनाच्या सायंकाळी जसे सूर्याचे प्रतिबिंब मावळताना लालबुंद होते बस्स, तसाच काहीसा अनुभव मला आला. त्याच्या तांडवात अगदी थकून गेलो. त्या आघाताची प्रखरता माझ्या मनाच्या कणखर पणावर झेलतानाही अंर्तमनावर खोलवर आघात होत गेले. माझी पत्नी लक्ष्मी जिने जीवनभर मला साथ दिली. ती माझ्यापेक्षा वयाने खरे तर जवळजवळ दहा वर्षांने लहान पण काळाने तिला माझ्यापासून दूर नेले. ७-९-१९९१ या दिवशी.

तिला असाध्य असा कॅन्सरचा आजार झाला होता. मुंबई हॉस्पिटलमध्ये तिच्यावर उपचार करण्यात आले. शस्त्रक्रिया करण्यात आल्या. पण आजाराचे निदान खूप उशिरा झाल्याने डॉक्टरांनी त्याही काळात तिला दोन वेळा मुंबई हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यात आले. पण काहीही उपयोग झाला नाही. शेवटी हॉस्पिटलमधून बाहेर पडताना त्यांनी माझ्या मुलाला बजावले, की आता येथे आणण्याची जरूर पडणार नाही. ती उभी आहे तोपर्यंत ठीक आहे. पण जर कधी तिने अंथरूण धरले तर मात्र दहा दिवसाचेच तिचे आयुष्य असेल आणि हा अंदाज खरा ठरला. गणपतीचे दिवस होते आणि तिने अंथरूण धरले. आम्ही घाबरलो. मुलांना बोलावून घेतले. आणि सारे काही आटोपले. आम्ही सर्वजण त्यावेळी हजर होतो. फक्त नितीन तिला भेटू शकला नाही.

तिच्याबद्दल काय लिहावे, ती खरेतर माझ्या प्रेमाची सावली होती. तिने उभे आयुष्य माझ्यासाठी कष्ट आणि कष्टच केले. माझ्या आईवडीलांची सेवा केली. ज्या पद्धतीने केली त्याला जगात तोड नाही. माझे वडील अत्यंत खाष्ट होते. भडक स्वभावाचे पण त्यानाही तिने प्रेमाने सांभाळले. तसेच आईलाही. आपला एक आदर्श गावात निर्माण केला. ती आमच्या गावातही 'बबी' याच माहेरच्या नावाने सर्वांना ज्ञात होती. सर्वांशी ती अत्यंत प्रेमाने वागणारी मृदु स्वभावाची होती. बाजूच्या घरात जरी भांडण झाले तर तिला दुःख होई. डोळे पाणावत व स्वतः कधी कुणाशी भांडली नाही. अशा मृदु व सत्शील पत्नीचा वियोग. आणि मी अगदी उतार वयाकडे ७४ वर्षाचे वय असताना व्हावा याचा मला फार मोठा धक्का बसला. घरात छोटी मुलगी, तिला सांभाळणे व तिला आईची उणीव भासू न देण्याची जबाबदारी माझ्यावर होती. माझ्या प्रिय पत्नीच्या वियोगाने माझ्या जीवनात मोठी पोकळी निर्माण झाली. तिच्या देवतुल्य सहवासाची आता जाणिव होते आणि डोळे पाणावतात. जीवनभर तिच्या स्मृती संभाळणे एवढेच आता बाकी आहे.

## मला लिहीते केले

माझी पत्नी गेली तेव्हा माझी नजर पार अधू झाली होती. दोन्ही डोळ्यांना मोतीबिंदूने ग्रासले होते. मला घरात एकट्याने वावरणेही कठीण झाले होते. तेव्हा माझ्या मुलाने मी नाही नाही म्हणत असतानाही मुंबईला नेऊन मुंबई हॉस्पिटलमध्ये एका डोळ्याचे ऑपरेशन करून घेतले. लेन्स घातली. त्यामुळे मला चांगले दिसू लागले.

मी ऑपरेशन करून गावाला आलो तर गाडीतून उतरल्यावर धोकट्याचा डोंगर पाहिला. जो गेल्या चार वर्षात पाहिला नव्हता. आश्चर्यचकीत झालो. चक्क खाली वाकून अत्यंत आनंदाने मी गावाच्या भूमीचे चुंबन घेतले.

काहीतरी हरवलेले सापडल्याचा भास झाला. घरात स्वतंत्रपणे वावरू लागलो पण वेळ काही जाईना. काय करावे समजेना. पत्नीच्या आठवणीशिवाय दुसरे विचार डोक्यात येत नव्हते.

मी हे सारे माझ्या मुलाला बोलून दाखविले. त्याने चक्क एक वही व पेन आणून माझ्या हातात दिले. सांगितले आजपर्यंत तुम्ही आम्हाला जे सांगत आलात त्या तुमच्या जीवनाविषयी युद्धाच्या शौर्याविषयी, सारे काही लिहून काढा. आमच्या पुढच्या पिढीला हे सारे कळायला हवे.

बस्स! तो धागा पकडून मी लिहायला लागलो. जे जे आठवेल तसे लिहून काढले. माझा भूतकाळ मी माझ्या डोळ्यासमोर जिवंत केला. आणि तो सारा जसाच्या तसा चित्रीत करण्याचा प्रयत्न केला. त्या काळात यशवंत दर पंधरा दिवसांनी येऊन ते वाचत असे. शेकड्यानी प्रश्न विचारीत असे. व सुटलेले सर्व संदर्भ सांधण्याचा प्रयत्न करीत असे. नंतर लिहीणे कठीण होऊ लागले. हात चालेना. हाताला पेटके येत म्हणून मी कधी यशवंतला कधी संध्याला हे सांगत गेलो व त्याने ते लिहून घेतले. त्यानंतर त्याने हे सारे सलगपणे लिहून काढले. ही घटना १९९२ सालची आहे. यानंतर मी एक मनोगतही लिहिले आहे व त्याखाली चक्क सही केली आहे. लिहण्याचा त्रास होत होता तरीही.

आता माझी प्रकृती खुपच ढासळली आहे. अनेक व्याधीनी ग्रस्त आहे. हिंडणे-फिरणे जवळजवळ थांबले आहे. आणि पत्नीच्या आठवणीशिवाय आता काहीही सुचत नाही. आता हे एकाकी जगणे नकोसे झाले आहे. मृत्युने कवटाळावे असे वाटते. पण ते आपल्या हाती नाही. पण परमेश्वराचे स्मरण मात्र चालू आहे. साऱ्या जुन्या आठवणी समोर येऊन सतवतात. पण खंबीर मनाने त्याही सहन करीत आहे.

आता उघड्या डोळ्यांनी हे वैचारिक 'तांडव' आणखी किती काळ पहायचे?



कै. बाबूराव अनंतराव कदम यांचा युद्धावर जाताना फोटो